नोव्हेंबर २०२१/पाने ६०/किंमत ₹१०

लोकराज्य

पुनरीक्षण कार्यक्रम

नोंदणी करा, मतदार व्हा!

भारताचे संविधान

उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय**;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य**;
दर्जाची व संधीची **समानता**;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

६ लोकशाही बळकट करणारा पुनरीक्षण कार्यक्रम

बहुसंख्य वाचकांना लेखाच्या शीर्षकातील 'पुनरीक्षण' हा शब्द टंकलेखनाची चूक वाटण्याची शक्यता आहे; आणि ज्यासाठी हा शब्द वापरला जातो, तो कार्यक्रमही बऱ्याच जणांना माहीत नसेल, तर या लेखाच्या अनुषंगाने मला भारत निवडणूक आयोग राबवत असलेल्या या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाबद्दल विशेषत्वाने सांगायचे आहे.

२८ रक्तदान श्रेष्ठदान

रक्तदान चळवळीत महाराष्ट्र देशात सदैव आघाडीवर आहे. महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषदेची स्थापना २२ जानेवारी १९९७ रोजी झाली. यानंतरच खऱ्या अर्थाने राज्यात रक्त संकलनाच्या क्रांतीला सुरुवात झाली. गेल्या पंचवीस वर्षात योजनाबद्ध प्रयत्न करून रक्तदानाबाबत महाराष्ट्र राज्याने रक्त संकलनात क्रांती घडवली आहे. केंद्रीय धोरणानुसार 'शंभर टक्के ऐच्छिक रक्तदान' ही संकल्पना निश्चित करण्यात आली होती.

पुन्हा गजबजल्या शाळा १४

मार्च २०२० पासून कोविड-१९ चा संसर्ग लक्षात घेता लॉकडाऊनमुळे शाळा तडकाफडकी बंद कराव्या लागल्या. परंतु शिक्षण विभागाने ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीने शिक्षणाचे अत्यंत परिणामकारक उपक्रम राबवले. कोविड-१९ चा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर योग्य उपाययोजना करत आता प्रत्यक्ष शाळा सुरू करण्यात आल्या आहेत.

जिद्द, अभ्यास आणि सचोटी ३३

लोकसेवा आणि त्या माध्यमातून देशसेवा करण्याची संधी लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून मिळालेल्या पदांतून साकारता येते. अखिल भारतीय असलेल्या या पदांकडे महाराष्ट्रीय तरुण अधिक सजगतेने आणि जागरूकतेने बघू लागले आहेत. अभ्यास, सचोटी आणि सातत्य यामुळे या पदांवर गवसणी घालत आहेत.

२१ ई-पीक पाहणी क्रांतिकारी पाऊल

१० सप्टेंबर २०१८ च्या शासन निर्णयानुसार पीक पेरणीची माहिती भ्रमणध्वनीवरील ॲपद्वारे गाव नमुना नंबर १२ मध्ये नोंदवण्यासाठी स्वतः शेतकऱ्यांनी उपलब्ध करून देण्याचा पथदर्शी कार्यक्रम राबवणे व त्यासाठी कार्यपद्धती निश्चित करून दिली आहे.

३६ राज्याचा अर्थसंकल्प : माझ्या मतदारसंघाच्या संदर्भात...

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे विविध प्रबोधनात्मक उपक्रम आयोजित केले जातात. संसदीय लोकशाही अधिक मजबूत व्हावी आणि विविध समाजघटकांचा त्यातील सहभाग वाढावा, या दृष्टीने अशा उपक्रमांचे विशेष महत्त्व आहे.

लोकशाही बळकट करणारा पुनरीक्षण कार्यक्रम	६
वंचितांनाही नोंदणीची सुविधा	१०
व्हा सजग मतदार...	१२
पुन्हा गजबजल्या शाळा	१४
शाळा सुरू; आनंदाला उधाण	१७
लसीकरणाला गती	१९
ई-पीक पाहणी क्रांतिकारी पाऊल	२१
सीताफळाने फेडले पांग	२४
खजुराची शेती	२५
सौरऊर्जेतून महावीज निर्मिती	२६
रक्तदान श्रेष्ठदान	२८
समृद्ध नाट्यपरंपरा...	३०
जिद्द, अभ्यास आणि सचोटी	३३
राज्याचा अर्थसंकल्प : माझ्या मतदारसंघाच्या संदर्भात	३६
करू या साजरे पर्यावरणस्नेही सण	३८
पाऊल पडते पुढे	४०
मंत्रिमंडळात ठरले	५५

वर्ष ७३ वे | अंक ५ | नोव्हेंबर २०२१

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — डॉ. दिलीप पांढरपट्टे
- प्रबंध संपादक — गणेश रामदासी, दयानंद कांबळे
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, गजानन पाटील, राजाराम देवकर
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. प्रिंट प्लस प्रा.लि., पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

औरंगाबाद खंडपीठाच्या इमारतीचे उद्घाटन

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या विस्तारित इमारतीच्या 'बी' आणि 'सी' विंगचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले. या कार्यक्रमास सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश एन.व्ही.रमणा, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, केंद्रीय विधी आणि न्यायमंत्री किरेन रिजिजू, पालकमंत्री तथा उद्योगमंत्री सुभाष देसाई, रोजगार हमी योजना मंत्री संदीपानराव भुमरे, खासदार इम्तियाज जलील, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उदय लळित, न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती भूषण गवई, न्यायमूर्ती अभय ओक, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती दीपंकर दत्ता, न्या. ए ए सय्यद, न्या. एस एस शिंदे, न्या. एस. व्ही. गंगापूरवाला, राज्य सरकारचे महाधिवक्ता आशुतोष कुंभकोणी, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अनिल सिंग, अजय तल्हारी आदींची या वेळी उपस्थिती होती.

न्यायालये ही महत्त्वपूर्ण संस्था

देशातील न्यायदानाची प्रक्रिया अधिक गतिमान आणि लोकाभिमुख होणे ही काळाची गरज असून, न्यायालयीन व्यवस्थेला पुरेशा मनुष्यबळासह आवश्यक त्या पायाभूत सुविधा देऊन यंत्रणेचे बळकटीकरण होणे अत्यावश्यक आहे. सर्वसामान्य माणसाला अनेक प्रश्नांचा सामना करावा लागतो. त्यांनी या संदर्भात नि:संकोचपणे न्यायालयांशी संपर्क साधावा. समाजासाठी न्यायालये गरजेची आहेत. न्यायालये ही दगडविटांची निर्जीव वास्तू नसून त्यांनी सर्वसामान्यांना न्यायाची एक सांविधानिक हमी द्यावी. न्यायालये ही कायदा व सुव्यवस्थेवर आधारित समाजातील महत्त्वपूर्ण संस्था असून जनसामान्यांना आर्थिक आणि सामाजिक न्याय देणारी महत्त्वपूर्ण यंत्रणा म्हणून तिच्याकडे बघण्याची आवश्यकता आहे, असे सरन्यायाधीश एन.व्ही.रमणा यांनी या वेळी सांगितले.

अप्रतिम न्यायमंदिर

औरंगाबाद खंडपीठ हे अप्रतिम न्यायमंदिर आहे. या खंडपीठाच्या विस्तारित इमारतीचे कामही लवकरच पूर्ण केले जाईल, न्यायदान ही सर्व घटकांची एकत्रित जबाबदारी आहे. मात्र, गुन्हा घडूच नये यासाठी सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे. राज्यात शासन स्तरावरूनही आम्ही विविध पातळ्यांवर कार्यवाही केली आहे. डीएनए आणि वन्यजीव प्रयोगशाळांचे लोकार्पण करण्यात आले आहे. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठीही निवाऱ्याची सोय करण्यासारखे काही विशेष प्रयत्न केले जात आहेत. कायदा सुव्यवस्था उत्तम प्रकारे राखली जावी, याकरिता पोलीस विभागाचे सक्षमीकरण करण्याचा आमचा निर्धार आहे, त्यासाठी काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत, असे मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी सांगितले.

लोकशाहीच्या महाउत्सवात सहभागी व्हा...

लोकशाहीत प्रत्येक मताला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अनेक निवडणुकांमधून त्याची प्रचीती आली आहे. अगदी एका मताच्या फरकाने पराभूत झाले आणि निवडून आलेले उमेदवार आपण पाहिले आहेत. त्यामुळे आपले एक मत किती महत्त्वाचे आहे, याची जाणीव सर्वांना असणे आवश्यक आहे. भारत निवडणूक आयोग आणि राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्यामार्फत होत असलेल्या जाणीवजागृतीमुळे आता मतदानातील टक्केवारी वाढताना दिसत आहे. यामध्ये स्त्रिया, अल्पसंख्याक, दिव्यांग आदींची संख्याही लक्षणीय वाढताना दिसत आहे.

मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या जनजागृतीमुळे मतदात्यांची संख्या आता वाढत असली तरी लोकशाही मजबूत करण्यासाठी १०० टक्के सहभाग महत्त्वाचा आहे. त्या दृष्टीने निवडणूक आयोग प्रयत्न करत आहे. वयाची १८ वर्षे पूर्ण झाली की, प्रत्येक भारतीय नागरिकाला मताधिकार प्राप्त होतो, मात्र १८ वर्षे झाली तरी बरेचजण मतदार नोंदणीपासून दूर असतात. १८ ते १९ या वयोगटाची लोकसंख्येतील टक्केवारी ३.५ टक्के एवढी आहे, तर त्यांची मतदार नोंदणीतील टक्केवारी केवळ सव्वा टक्क्याच्या आसपास आहे. २० ते २९ या वयोगटाची लोकसंख्येतली टक्केवारी १८ टक्के आहे, पण मतदार यादीतील या गटाची टक्केवारी १३.५ टक्के एवढी आहे. गेल्या काही वर्षांत तरुणांच्या टक्केवारीतील ही तफावत कमी करण्यात निवडणूक आयोगाला यश आले आहे. मात्र ही टक्केवारी जेव्हा १०० टक्के मतदार यादीमध्ये प्रतिबिंबित होईल, तेव्हाच आजच्या युवा पिढीने लोकशाही व्यवस्थेत सहभागी होण्याची पहिली पायरी पूर्ण केली आहे, असे म्हणता येईल. येत्या काळात युवा पिढी लोकशाहीचा जागर घालतील, असा विश्वास आहे.

लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी पहिला टप्पा म्हणजे आपण १८ वर्षे पूर्ण होताच आपली नावनोंदणी करून घेणे आणि दुसरा टप्पा म्हणजे प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर जाऊन, आपल्याला योग्य वाटणाऱ्या लोकप्रतिनिधीला, लोकशाही मूल्यांची जपणूक करणाऱ्या लोकप्रतिनिधीला मत देणे.

आपले नाव मतदार यादीत नोंदवण्यासाठी तसेच दाखल असलेल्या नावात, पत्त्यात बदल करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने अनेक पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे नोंदणी प्रक्रिया सहज आणि सुलभ झाली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या एनव्हीएसपी, वोटर पोर्टल या संकेतस्थळावर आणि वोटर हेल्पलाइन या ॲपवरही नाव नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. १८ वर्षे पूर्ण झालेल्या तरुणांच्या नावनोंदणीसाठी भारत निवडणूक आयोग विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबवत आहे. त्याअंतर्गत १ जानेवारी २०२२ रोजी ज्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होत आहेत, त्यांच्या नावाची नोंदणी १ ते ३० नोव्हेंबर २०२१ दरम्यान केली जाणार आहे. त्यासाठी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे जनजागृती व नोंदणीबाबत योग्य नियोजन करण्यात आले आहे. त्याबाबतचा आढावा या अंकात घेण्यात आला आहे. या पुनरीक्षण कार्यक्रमात तरुणांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन लोकशाहीच्या या महाउत्सवात सहभागी व्हावे.

कोरोना संकटाच्या संक्रमणातून आता आपण बाहेर पडत आहोत. अजूनही धोका टळलेला नाही. मात्र रुग्णसंख्या लक्षणीयरीत्या कमी झाल्याने आता बहुतांश बाबी खुल्या करण्यात आल्या आहेत. त्यामुळे निश्चितच सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शाळा, महाविद्यालये सुरू करण्यात आल्याने विद्यार्थी, शिक्षक व पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. धार्मिक स्थळे, नाट्यगृहे, चित्रपटगृहे खुली करण्यात आली आहेत. बाजारपेठा खुल्या झाल्या आहेत. खरेदीसाठी मॉल्स व बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोरोना संकटापासून आपले आणि राष्ट्राचे रक्षण करायचे असेल, तर आपणही जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. अजूनही सतत हात धूत राहणे, मास्क वापरणे आणि एकमेकांमध्ये योग्य अंतर राखणे या त्रिसूत्रीबरोबरच कोविड प्रतिबंधक लसीचे दोन्ही डोस पूर्ण करणे अनिवार्य आहे.

लोकराज्यच्या या अंकात पुनरीक्षण कार्यक्रमासोबतच, शाळा पुन्हा सुरू, ई-पीक पाहणी, यूपीएससी, लसीकरण, मराठी रंगभूमी दिन आदी विषयांच्या लेखांचा समावेश आहे. त्याचबरोबर नेहमीप्रमाणे मंत्रिमंडळ निर्णय तसेच महत्त्वपूर्ण घडामोडींचा अंकात समावेश आहे.

हा वैविध्यपूर्ण अंक सर्वांना आवडेल अशी आशा आहे.

डॉ. दिलीप पांढरपट्टे
(मुख्य संपादक)

लोकशाही बळकट करणारा
पुनरीक्षण कार्यक्रम

बहुसंख्य वाचकांना लेखाच्या शीर्षकातील 'पुनरीक्षण' हा शब्द टंकलेखनाची चूक वाटण्याची शक्यता आहे; आणि ज्यासाठी हा शब्द वापरला जातो, तो कार्यक्रमही बऱ्याच जणांना माहीत नसेल, तर या लेखाच्या अनुषंगाने मला भारत निवडणूक आयोग राबवत असलेल्या या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाबद्दल विशेषत्वाने सांगायचे आहे, कारण १८ वर्षे पूर्ण केलेल्या प्रत्येकाशी त्याचा जवळचा संबंध आहे. जाणून घेऊ या मतदात्याचा हक्काचा आणि लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या पुनरीक्षण कार्यक्रमाविषयी...

श्रीकांत देशपांडे

भारत निवडणूक आयोग

या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाविषयी सांगताना मला आधी आपल्या देशात आणि राज्यात कार्यरत असणाऱ्या निवडणूक आयोगाविषयी सांगायला हवे. भारत निवडणूक आयोग लोकसभा, राज्यसभा, विधानसभा आणि विधानपरिषद यांच्या निवडणुका घेते. भारत निवडणूक आयोग या निवडणुका मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत पार पाडत असते. प्रत्येक राज्यातील मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय हे भारत निवडणूक आयोगाच्या अधीनस्थ कार्यरत असते. तर ग्रामपंचायत, जिल्हापरिषद, महानगरपालिका, नगरपरिषद, पंचायत समिती यांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोग घेते. हे दोन्ही आयोग ज्या निवडणुका घेतात, त्यातील समान धागा म्हणजे मतदार याद्या. या मतदार याद्या तयार करण्याचे काम मात्र भारत निवडणूक आयोगामार्फत मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय करत असते. याच मतदार याद्या राज्य निवडणूक आयोगही त्यांच्या निवडणुकांसाठी वापरत असते.

मतदार नोंदणी

कोणत्याही निवडणुकीच्या काळात निवडणूक आयोग आणि निवडणूक कार्यालयांचे काम फार जोमाने सुरू असते. पण जेव्हा कुठल्याही निवडणुका नसतात, त्या काळातही निवडणूक कार्यालये मतदार नोंदणीचे कार्य करत असते. आणि हे काम अव्याहतपणे वर्षभर सुरू असते. पुनरीक्षण कार्यक्रमाचा संबंध या मतदार याद्यांशीच आहे. भारत निवडणूक आयोग दरवर्षी पुनरीक्षण कार्यक्रम राबवते. यंदा हा कार्यक्रम १ ते ३० नोव्हेंबर २०२१ या कालावधीत राबवण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

नोंदणीस पात्र दिनांक

विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम, ज्याला इंग्रजीत स्पेसिअल समरी रिव्हिजन (एसएसआर) म्हटले जाते. पुनरीक्षण म्हणजे उजळणी. थोडक्यात सांगायचे तर, मतदार अर्हता दिनांक बदलणे, हे या कार्यक्रमाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. उदा. सध्या चालू असलेला मतदार अर्हता दिनांक हा १ जानेवारी २०२१ आहे. म्हणजे या दिवशी १८ किंवा त्यापेक्षा अधिक वय असलेले नागरीक

तृतीयपंथीयांसोबत त्यांच्या मतदार यादीतील अडचणी समजून घेताना मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे.

मतदार म्हणून नाव नोंदणी करण्यास पात्र आहेत. दरवर्षी होणाऱ्या या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमात हा पात्रता दिनांक बदलतो. आता आपण नोव्हेंबरमध्ये जो पुनरीक्षणाचा कार्यक्रम राबवणार आहोत, त्यानुसार हा दिनांक १ जानेवारी २०२२ असेल. या दिवशी जे नागरिक १८ किंवा त्यापेक्षा अधिक वयाचे होतील, त्यांना मतदार म्हणून नोंदणी करता येईल.

पुनरीक्षण कार्यक्रमाचे स्वरूप

या कार्यक्रमात काय केले जाते? तर निश्चित केलेल्या तारखेला (यंदा १ नोव्हेंबर २०२१रोजी) आपण प्रारूप यादी प्रकाशित करतो. ही यादी प्रकाशित करण्यापूर्वी आपण सध्याच्या मतदार यादीचे शुद्धीकरण करतो. म्हणजे, दुबार नावे वगळतो, कायमस्वरूपी स्थलांतर झालेल्यांची वगळणी करतो, मयत झालेल्यांची वगळणी करतो, नावांतील दुरुस्त्या केल्या जातात. तसेच मतदार केंद्रांचेही सुसूत्रीकरण केले जाते. हे सगळे झाल्यावर वेळोवेळी अद्ययावतीकरण झालेल्या ज्या याद्या आहेत, त्यांचे एकत्रीकरण आणि सुसूत्रीकरण केले जाते आणि मग ती एकत्रित प्रारूप यादी प्रकाशित केली जाते. मग मतदारांचे दावे आणि हरकती यासाठी एक निश्चित कालावधी (यंदा १ ते ३० नोव्हेंबर २०२१) घोषित केला जातो. त्यानंतर एका विशिष्ट काळात (यंदा १ ते २० डिसेंबर २०२१) हे दावे आणि हरकती निकालात काढले जातात. त्यासाठी बीएलओ त्या-त्या पत्त्यावर जाऊन पडताळणी, पाहणी करतात, कागदपत्रे तपासली जातात. त्याचे अहवाल मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडे सादर केले जातात. मग मतदार नोंदणी अधिकारी ते नाव ठेवायचे की काढायचे याचा निर्णय घेतात. हे सगळे झाल्यानंतर सुधारित अंतिम यादी प्रकाशित (यंदा ५ जानेवारी २०२२ रोजी) केली जाते, तिथे या पुनरीक्षण कार्यक्रमाची सांगता होते. अर्थात, प्रत्येक वर्षी या कार्यक्रमाच्या तारखा वेगवेगळ्या असतात आणि या तारखा भारत निवडणूक आयोग ठरवते.

मतदाराची नोंदणीपूर्वी शहानिशा

एखाद्या नागरिकाने नाव नोंदणीचा अर्ज केल्यानंतर त्यावर निवडणूक कार्यालयाकडून काय प्रकारची प्रक्रिया केली जाते, तेही पाहू या. मतदार म्हणून नाव नोंदवण्यासाठी अर्ज क्रमांक ६ आहे. ज्याला आपले नाव नोंदवायचे आहे, त्याने हा अर्ज भरणे आवश्यक आहे. या अर्जासाठी चार दस्तऐवज आवश्यक असतात; फोटो, वयाचा एक पुरावा, निवासाचा एक पुरावा, आणि कुठल्या मतदारसंघात अद्याप नाव नोंदणी झालेली नाही याचे प्रतिज्ञापत्र लागते. असे हे एकूण चार दस्तऐवज आहेत. तसेच, ती व्यक्ती भारताचा नागरिक असणे अनिवार्य आहे. हा अर्ज ऑनलाईन भरता येतो किंवा आपल्या जवळच्या मतदार नोंदणी कार्यालयातही जाऊन भरता येतो.

हा अर्ज कार्यालयाला प्राप्त झाल्यानंतर कायदेशीर प्रक्रिया साधारण अशी आहे : त्या अर्जाची माहिती नोंदणी कार्यालयाच्या सूचना फलकावर लावली जाते. तशीच ती माहिती राजकीय पक्षांनाही दिली जाते, आणि मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावरही प्रकाशित केली जाते. ही माहिती एवढ्याचसाठी दिली जाते की, सर्वांना या नावाविषयी कळावे आणि त्या नावाविषयी काही हरकत घ्यायची असेल तर ती घेता यावी. हा कालावधी साधारण ७ दिवसांचा असतो. या काळात बीएलओ अर्जात दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष भेट देऊन ती व्यक्ती खरंच तिथे राहते का, याची खात्री करतो आणि त्याचा अहवाल मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना देतो. या पडताळणीचे कारण असे की, मतदार होण्यासाठी तो तिथला रहिवासी असला पाहिजे. तो तिथे राहत नसेल आणि फक्त अर्जापुरता त्याने तिथला पत्ता दिला असेल, तर त्याला मतदार म्हणून नोंदणी करता येत नाही.

हे सगळे झाल्यानंतर मतदार नोंदणी अधिकारी त्याचे नाव मतदार यादीत नोंदवतात. पण जर काही वेळेला त्या नावाबद्दल कुणाची हरकत आली, तर निर्णय अधिकाऱ्याला त्याची सुनावणी घ्यावी लागते. सुनावणीमध्ये दोन्ही पक्षाची बाजू ऐकून, कागदपत्रे तपासून नोंदणी अधिकारी आपला निर्णय देतात. एकूण अर्ज दाखल झाल्यानंतर १५ ते ४५ दिवसांत मतदाराला मतदार ओळखपत्र मिळते.

अर्जांची माहिती

- प्रथम नाव नोंदणी करणाऱ्या मतदारांसाठी / एका मतदारसंघातून इतर मतदारसंघात स्थलांतर झाल्यामुळे मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी **- अर्ज क्र. ६**
- अनिवासी मतदारांचे मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी **- अर्ज क्र. ६ अ**
- इतर व्यक्तीचे नाव समाविष्ट करण्याबाबत आक्षेप घेण्यासाठी/स्वतःचे नाव वगळण्यासाठी/इतर कोणत्याही व्यक्तीचे नाव मृत्यू किंवा स्थलांतर झाल्यामुळे वगळण्यासाठी **- अर्ज क्र. ७**
- मतदार यादीतील तपशिलामध्ये करावयाच्या दुरुस्त्यांसाठी **- अर्ज क्र. ८**
- ज्या वेळी एकाच मतदारसंघात निवासस्थान एका ठिकाणाहून इतर ठिकाणी स्थानांतरित झाले असल्यास - **अर्ज क्र. ८ अ**

मतदार कार्डवरील दुरुस्ती

एकूण, विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमात विविध निकषांच्या आधारे मतदार याद्यांचे सुसूत्रीकरण, एकत्रीकरण केले जाते. दुबार नावे वगळण्याबरोबरच विविध प्रकारच्या दुरुस्त्या केल्या जातात. स्त्रीऐवजी पुरुष किंवा पुरुषऐवजी स्त्री असे झाले असेल, तर ती दुरुस्ती केली जाते. तृतीयपंथीयांना आता तृतीयपंथीय या वर्गीकरणात नोंदणी करता येते, त्यामुळे त्यांनी पूर्वी केलेली स्त्री किंवा पुरुष ही नोंदणी दुरुस्त करून तृतीयपंथीय अशी नोंद करता येते. दिव्यांग मतदारांना ते दिव्यांग असल्याचे चिन्हांकित करता येते. दिव्यांग मतदारांनी आपले दिव्यांगत्व असे चिन्हांकित केले असेल, तर मतदानाच्या वेळी त्यांना सोयी-सुविधा देणे सुलभ होते.

मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण

असे हे सगळे बदल झाल्यानंतर याद्यांचे एकत्रीकरण केले जाते. मूळ यादी व पुरवणी

जनजागृती करताना 'मतदार मित्र'..

यादी यांचे एकत्रीकरण करताना एका भागात राहणारे, एका सोसायटीत राहणारे, एका कुटुंबात राहणारे मतदार हे एकाच मतदान केंद्राच्या अधीनस्थ येतील, असे पाहिले जाते. तसेच, काही वेळा एखाद्या भागातील मतदार संख्या वाढली तर मतदान केंद्राची रचना बदलावी लागते. शहरांत एका मतदान केंद्रावर १५०० मतदारांचा समावेश होतो, तर ग्रामीण भागात १२०० मतदारांचा समावेश होतो.

याद्या दुरुस्त करताना जर असे आढळून आले की, एखाद्या मतदान केंद्रावर यापेक्षा अधिक संख्या झालेली आहे, तर वाढ झालेल्या मतदान केंद्रातून जिथे मतदार संख्या कमी आहे, अशा केंद्रात त्यांच्या नावांचा समावेश केला जातो. किंवा तसे शक्य नसेल तर नवीन केंद्रही तयार केले जाते. तसेच एखादे मतदान केंद्र नादुरुस्त अवस्थेत आहे असे आढळून आले, तर ते मतदान केंद्रही बदलले जाते. म्हणजे, विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमात आपण मतदार याद्यांबरोबर मतदान केंद्राचेही सुसूत्रीकरण करत असतो.

दावे आणि हरकती

१ ते ३० नोव्हेंबर २०२१ हा कालावधी दावे आणि हरकती स्वीकारण्याचा कालावधी आहे. दावे म्हणजे काय? तर नवीन अर्हता दिनांकावर जे नागरिक मतदार म्हणून पात्र होतात आणि जे नाव नोंदणीसाठी अर्ज करतात, त्यांना दावे म्हटले जाते. पण या नावांवर कुणाचे आक्षेप असतील, उदा. एखादा अमुक पत्त्यावर राहत नाही असा कुणी आक्षेप घेतला तर त्यांना हरकती म्हटले जाते.

नोंदणी प्रक्रिया अखंड

या पुनरीक्षण कार्यक्रमात नावनोंदणीची अर्हता तारीख बदलते. त्यामुळे लोकांना ही तारीख माहीत होण्यासाठी आयोग नवीन मतदारांच्या नोंदणीसाठी मोठ्या प्रमाणात मोहीम आखते. त्यामुळे बरेचदा लोकांना असे वाटते की, नावनोंदणी फक्त याच काळात होते. पण तसे नाही. सुधारित अंतिम यादी प्रकाशित झाल्यानंतरही वर्षभर नवीन मतदार नोंदणी सातत्याने केली जाते आणि त्यांचे अद्ययावतीकरणही केले जाते. त्या वर्षभरात हाच अर्हता दिनांक प्रमाण मानून नाव नोंदणी करून घेतली जाते. ज्यांची नोव्हेंबरमध्ये संधी जाईल, त्यांना नंतरही नोंदणी करता येईल.

आवाहन

जे युवा १ जानेवारी २०२२ रोजी १८ वर्षे पूर्ण करणार आहेत. त्यांनी १ ते ३१ नोव्हेंबर २०२१ या कालावधीत नावनोंदणी केल्यास त्यांचे नाव याच मतदार यादीत घेतले जाईल. २०२२ मध्ये महाराष्ट्रातील बऱ्याच महानगरपालिका आणि जिल्हापरिषदा यांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. १ जानेवारी २०२२ रोजी जे नागरिक १८ किंवा अधिक वयाचे असतील, त्यांनी या काळात नाव नोंदणी केली तर त्यांचे नाव अंतिम यादीत समाविष्ट होऊन त्यांना येत्या निवडणुकीत मताधिकार बजावता येईल.

१ नोव्हेंबर २०२१ रोजी आमच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर आणि मतदार नोंदणी कार्यालयांमध्ये प्रारूप यादी प्रकाशित झाल्यानंतर, मतदारांनी आपले नाव, जन्मतारीख, वय, छायाचित्र, ओळखपत्र क्रमांक, लिंग, पत्ता, मतदारसंघ, नातेवाईकाचे नाव, त्यांच्याशी असलेले नाते इ. गोष्टी मतदार यादीत अचूक आणि योग्य आहेत का, याची पडताळणी करावी. काही बदल करायचे असतील, तर तातडीने त्यासाठीचे अर्ज भरून आपापल्या नजीकच्या मतदार नोंदणी कार्यालयात द्यावेत किंवा ऑनलाइन पद्धतीने सादर करावेत. त्याचबरोबर आपल्या मृत नातेवाईकांचे नाव वगळण्यासाठी, दोन ठिकाणी नावे नोंदवले असल्यास एक नाव रद्द करण्यासाठी त्वरित अर्ज क्र. ७ भरावा.

निवडणुकांचा प्राण

या पुनरीक्षण कार्यक्रमाच्या निमित्ताने आणि वर्षभरही आम्ही लोकांना नावनोंदणी, वगळणी, ओळखपत्रावरील फोटोची अनिवार्यता आदी बाबी अद्ययावत करण्यासाठी विविध माध्यमांतून आवाहन करत असतो. पण कदाचित, आता तर निवडणुका नाहीत, मग नाव नोंदणी-वगळणीची काय एवढी घाई आहे, असा विचार नागरिक करतात किंवा रोजच्या

कामाच्या धबडग्यात हे काम अनेकांना महत्त्वाचेही वाटत नसेल. पण, लोकशाही शासन पद्धतीचे अंगभूत आणि पहिले वैशिष्ट्य आहे निवडणुका; आणि मतदार याद्या या निवडणुकांचा प्राण आहेत. मतदार याद्या जेवढ्या निर्दोष, अचूक, शास्त्रीय तेवढ्या निवडणुका पारदर्शक होणार, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. तेव्हा निवडणुकांमध्ये आणि पर्यायाने लोकशाही शासन व्यवस्थेत सक्रिय भाग घेण्याची पहिली पायरी म्हणून प्रत्येक पात्र नागरिकाने आपली नावनोंदणी करायला हवी.

निवडणूक साक्षरता मंडळ

पुनरीक्षण कार्यक्रमात नवीन अर्हता दिनांकावर नव्याने मतदार म्हणून पात्र युवा पिढीचे शाळा-महाविद्यालयांमध्ये जाऊन त्यांची नाव नोंदणी केली जाईल, त्यासाठी शिबिरे भरवून तसेच ऑनलाईन फॉर्म भरण्याविषयी मार्गदर्शन करून आम्ही त्यांच्यापर्यंत पोहोचणार आहोत. यंदा आम्ही शाळा-महाविद्यालयांसाठी निवडणूक साक्षरता मंडळे स्थापन केली आहेत. त्याकरिता उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, कृषी शिक्षण विभाग, शालेय विभाग यांच्यामार्फत परिपत्रकेही काढली आहेत. या व्यासपीठामार्फत आणि एनएसएसमार्फतही तरुणांच्या नाव नोंदणीसाठी प्रयत्न केले जातात. त्यांतर्गत विविध चर्चासत्रे, व्याख्याने आयोजित करून नावनोंदणीबाबत जागरूकता निर्माण केली जाते. नवी पिढी टेक्नोसॅव्ही आहे, त्याप्रमाणे तिने डेमोक्रसीसॅव्ही व्हावे, असे मला वाटते.

राज्यव्यापी विशेष ग्रामसभा

आपली निम्मी लोकसंख्या स्त्रियांची आहे. त्यामुळे त्यांच्या नावनोंदणीसाठी विशेष प्रयत्न केले जातात. विशेष प्रयत्न यासाठी की, स्त्रियांचे लग्नानंतर नाव बदलते, राहण्याचे ठिकाण बदलते; तर त्यांनी बदललेले नाव आणि ठिकाण यांमध्ये दुरुस्त्या करणे आवश्यक असते. १६ नोव्हेंबर रोजी राज्यव्यापी विशेष ग्रामसभेचे आयोजन केले जाणार आहे. त्या दिवशी गावकऱ्यांसमोर मतदार याद्यांचे वाचन केले जाईल. त्या अंतर्गत गावात नव्याने पात्र नागरिकांची नोंदणी, मयत झालेल्यांची वगळणी, गावात नव्याने लग्न होऊन आलेल्या स्त्रिया आणि कायमस्वरूपी वास्तव्यास आलेले नागरिक यांची नोंदणी, लग्न होऊन इतरत्र गेलेल्या स्त्रिया आणि कायमस्वरूपी गाव सोडून गेलेले नागरिक यांच्या नावांची वगळणी, नाव, पत्ता इ. दुरुस्त्या, यासाठी आवाहन केले जाईल. स्त्रियांसाठी कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांमार्फतही आम्ही नाव नोंदणीची शिबिरे आयोजित करतो. बचतगटातील स्त्रिया, अंगणवाडी सेविका यांच्यामध्ये जागृती केली जाते. तसेच, यंदा देहविक्री करणाऱ्या स्त्रिया, तृतीयपंथीय यांच्या नावनोंदणीसाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

लेखाच्या सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे, विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम दरवर्षी राबवला जातो, पण हा कार्यक्रम केवळ निवडणूक कार्यालयांनी राबवायचा कार्यक्रम आहे, अशी समाजाची मानसिकता आहे. पण, सक्षम लोकशाहीसाठी निवडणुका हा अपरिहार्य टप्पा आहे आणि पारदर्शक निवडणुकांसाठी मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण अत्यंत आवश्यक आहे. आणि त्यासाठी हा पुनरीक्षण कार्यक्रम लोकांच्या परिपूर्ण सहभागाने अमलात येणे आवश्यक आहे. दरवर्षी येणाऱ्या दिवाळी सणाची लोक जितक्या आतुरतेने वाट पाहतात, तितक्याच आतुरतेने त्यांनी लोकशाहीचे सक्षमीकरण घडवून आणणाऱ्या पुनरीक्षण कार्यक्रमाचीही वाट पाहावी. दिवाळीत लोक एकमेकांना शुभेच्छा देतात, एकमेकांच्या भेटीगाठी घेतात; त्याप्रमाणे पुनरीक्षण कार्यक्रम चालू असताना एकमेकांना मतदार यादी पाहण्याविषयीची विचारपूस करणे, नात्यात-मित्रमंडळीत १८ वर्षे पूर्ण केलेल्यांना नावनोंदणीसाठी आवाहन करणे, या प्रकारे नागरिकांनी थोडा अधिक जिव्हाळ्याने या प्रक्रियेत पुढाकार घेतला, तर ती सक्षम लोकशाहीच्या प्रवासाची एक भक्कम सुरुवात होईल.

सावित्रबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसोबत लोकशाही गप्पा कार्यक्रम.

प्रधान सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

वंचितांनाही नोंदणीची सुविधा

बेघर किंवा फूटपाथवर राहणाऱ्या व्यक्ती, देहविक्री करणाऱ्या स्त्रिया आणि तृतीयपंथी यांनाही संविधानाने समान मताधिकार दिला आहे. पण, कधी आवश्यक दस्तऐवजांच्या कमतरतेमुळे, कधी अपुऱ्या माहितीमुळे ते या घटनात्मक अधिकाराला मुकतात. खरंतर भारत निवडणूक आयोगाने त्यांच्या जगण्याचा विचार करून त्यांच्यासाठी दस्तऐवजांची विशेष सवलत दिलेली आहे. त्यांच्यासाठी असणाऱ्या खास सवलतींचा, दस्तांचा परिचय या लेखाच्या माध्यमातून करून देण्याचा हा प्रयत्न..

अनिल ना. वळवी

'मताधिकार हा प्रत्येक नागरिकाचा कायदेशीर अधिकार आहे', 'प्रत्येक मत अमूल्य आहे', अशा प्रकारची वाक्ये आपण अनेकदा वाचतो. आपण सामान्य परिस्थितीत राहत असू तर कदाचित संविधानाने देऊ केलेल्या या अधिकाराचे मूल्य आणि या वाक्यांचे सत्त्व आपल्याला जाणवेलच असे नाही. पण ज्यांच्या पुढे रोजच्या जगण्याविषयी अनंत प्रश्न आहेत, अशा समाज घटकांसाठी हा अधिकार मिळवणे किंवा प्राप्त होणे, ही तुम्हा-आम्हांला वाटते तितकी सोपी बाब नसते. लोकशाही व्यवस्थेत सहभागी होण्याची पहिली पायरी मतदार नोंदणी असते हे मान्य केले, तर आपले अनेक बंधु-भगिनी या प्राथमिक हक्कांपासून वंचित राहताना आढळून येतात. कुणीही मताधिकाराच्या हक्कापासून वंचित राहू नये, याची काळजी निवडणूक आयोग घेत आहे.

नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

मतदार म्हणून नावनोंदणी करू इच्छिणाऱ्या नागरिकाने अर्ज क्रमांक ६ भरणे आवश्यक आहे. या अर्जानुसार संबंधित नागरिकाने पुढील पाच गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक आहे : १) अर्जदार भारताचा नागरिक असावा. २) स्वतःचे छायाचित्र. ३) इतर कोणत्याही मतदार यादीत नाव नाही याविषयीचे प्रतिज्ञापत्र, जे अर्ज क्रमांक ६ मध्येच अंतर्भूत असते. ४) वयाचा दाखला. ५) निवासाचा पुरावा.. या पाच दस्तऐवजांपैकी पहिल्या तीन दस्तऐवजांची पूर्तता करण्यात बेघर किंवा पदपथावर राहणाऱ्या व्यक्ती, देहविक्री करणाऱ्या स्त्रिया आणि तृतीयपंथी यांना शक्यतो अडचणी येत नाहीत. त्यांना अडचण येते ती चार आणि पाच क्रमांकांच्या दस्तऐवजांबाबत.

सुजाण नागरिक आम्ही
आमची ही जबाबदारी
मतदार यादीत नाव नोंदवणार
सर्व किन्नर, नर आणि नारी

वयाचा पुरावा

मतदार यादीत नावनोंदणी करताना वयाचा पुरावा म्हणून पुढीलपैकी कोणत्याही एका दस्तऐवजाची आवश्यकता असते : १) जन्म दाखला, २) शाळा सोडल्याचा दाखला, ३) जन्मतारखेची नोंद असलेली पाचवी/आठवी/दहावी/बारावी यांपैकी एका इयत्तेची गुणपत्रिका, ४) पॅन कार्ड, ५) वाहन चालक परवाना, ६) भारतीय पासपोर्ट, ७) आधार कार्ड. मात्र, बेघर किंवा पदपथावर राहणाऱ्या व्यक्ती, देहविक्री करणाऱ्या स्त्रिया आणि तृतीयपंथी यांची जीवनशैली पाहता, त्यांना या दस्तऐवजांची पूर्तता करणे कठीणच नव्हे, तर जवळजवळ अशक्य आहे. अपुरे शिक्षण आणि त्याचीही कागदोपत्री नोंद नसणे, ही या घटकांबाबत सर्रास आढळून येणारी बाब आहे. मग या घटकांना वयाच्या दस्तऐवजाची पूर्तता कशी करता येईल? वयाच्या दस्तऐवजाची पूर्तता करताना दोन भाग आहेत : एक आहे १८ ते २१ वय असणाऱ्यांसाठी, तर दुसरा आहे २१च्या पुढे वय असलेल्यांसाठी.

१८ ते २१ वय असणाऱ्यांसाठी : १८ ते २१ या दरम्यान वय असेल आणि त्या व्यक्तीकडे वयाचे वरीलपैकी कोणतेही दस्तऐवज नसतील, तर त्या व्यक्तीच्या पालकाने त्या व्यक्तीचे वय अमुक आहे, असे लेखी प्रतिज्ञापत्र दिले तर ते ग्राह्य धरले जाते. किंवा तृतीयपंथीयांमध्ये गुरू पद्धत आहे. त्यांच्या गुरूंनी अर्ज क्रमांक ६ मध्ये दिलेले जोडपत्र दोन भरून दिले, तर तेही ग्राह्य धरले जाते. हे दोन्ही पर्याय शक्य नसल्यास अर्जदार ग्रामपंचायतीचे सरपंच, महानगरपालिका/नगरपालिका यांच्या

तृतीयपंथीय आणि देहविक्री व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया यांच्यासाठी कार्य करणाऱ्या संस्थांसोबत चर्चासत्र.

समितीचे सदस्य यांचेही वयाबाबतचे प्रमाणपत्र घेऊ शकतात.

२१ वर्षांच्या पुढे वय असल्यास : जेव्हा अर्जदार २१ पेक्षा जास्त वयाचा असेल व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याला म्हणजेच बीएलओला, साहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (एईआरओ) यांना शारीरिकदृष्ट्या तो त्या वयाचा वाटत असेल, तेव्हा अर्जदाराने सादर केलेले वयाचे प्रतिज्ञापत्र (जोडपत्र तीन) वयाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरले जाते. अशा परिस्थितीत वयाचा पुरावा म्हणून अन्य कोणत्याही कागदोपत्री पुराव्याचा आग्रह धरला जात नाही.

निवासाच्या पुराव्याची पूर्तता

सर्वसामान्य परिस्थितीत मतदार नाव नोंदणी करताना निवासाचा पुरावा म्हणून पुढील दस्तऐवजांपैकी कोणतेही एक आवश्यक असतं : १) बँक/किसान/टपाल यांचे चालू खातेपुस्तक, २) रेशनकार्ड, ३) भारतीय पासपोर्ट, ४) वाहन चालक परवाना, ५) अलीकडील भाडेकरार, ६) पाणी/टेलिफोन/वीज/गॅस यांचे अलीकडचे देयक म्हणजेच बिल (हे देयक तुमच्या स्वतःच्या नावे नसेल, तर तुमच्या जवळच्या नात्यातल्या व्यक्ती - आई/वडील/पती/पत्नी - यांच्या नावे असले तरी चालू शकते. तृतीयपंथीयांच्या बाबतीत ही बिले गुरूच्या नावे असतील तरी चालू शकते.), ७) प्राप्तीकर निर्देशपत्रिका म्हणजेच इन्कम टॅक्स असेसमेंट ऑर्डर, ८) भारतीय टपाल विभागाद्वारे अर्जदाराच्या सध्याच्या निवासस्थानाच्या पत्त्यावर प्राप्त झालेले कोणतेही टपालपत्र.

मात्र, बेघर किंवा पदपथावर भारतीय नागरिक, तृतीयपंथी, शरीर व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया यांना सातत्याने आपला निवास बदलावा लागण्याची शक्यता असते. त्यांना मतदार म्हणून नावनोंदणी करताना सर्वसामान्य नागरिकांना जे पुरावे द्यावे लागतात ते देण्याची आवश्यकता नाही. मतदार ओळखपत्र हे कायदेशीर ओळखपत्र असल्याने सामान्यपणे व्यक्ती ज्या पत्त्यावर जेवते, झोपते तो पत्ता इथे महत्त्वाचा मानला जातो. अर्ज करणारी व्यक्ती सतत पत्ता बदलत असली तरीही सामान्यपणे नाव नोंदणी करताना, ज्या पत्त्यावर तिचे वास्तव्य असेल, तिथे जाऊन सदर व्यक्ती दिलेल्या पत्त्यावरच राहत आहे, याबाबत मतदान केंद्रस्तर अधिकारी दोन-तीन वेळा भेटी देऊन खात्री करून घेतात. तेव्हा अशा वंचित घटकांनी ते जिथे कुठे राहतात, तो पत्ता अर्जात नमूद करून अर्ज दाखल करणे महत्त्वाचे आहे.

आता नाही चिंता पुराव्याची
वय-निवास यांच्या दस्ताची
गरज फक्त प्रतिज्ञापत्राची!

नावनोंदणीनंतर पत्ता बदलल्यास काय करावं? : कायमस्वरूपी कुठेही वास्तव्य नसलेल्या व्यक्तींचे निवास सतत बदलण्याची शक्यता असते. जर अशी व्यक्तीचा नवा पत्ता आधीच्याच मतदारसंघातला असेल, तर तिला अर्ज क्र. ८अ भरून नव्या पत्त्याची नोंद करावी लागेल. पण, जर ती व्यक्ती अन्य मतदारसंघात वास्तव्यास गेली असेल, तर तिला आधीच्या मतदारसंघातील नाव वगळावं लागेल. ते वगळण्यासाठी तिला अर्ज क्रमांक ७ भरावा लागेल आणि मग नव्या मतदारसंघात नाव नोंदणी करण्यासाठी अर्ज क्रमांक ६ भरावा लागेल.

नाव, लिंग किंवा इतर तपशिलांच्या दुरुस्तींसाठी काय करावं? : बरेचदा तृतीयपंथियांनी आधी स्त्री किंवा पुरुष म्हणून नोंदणी केलेली असते आणि अशी नोंदणी करताना त्यांची आधीची नावे मतदार यादीत नोंदवलेली असतात. अशा वेळी त्यांना अर्ज क्रमांक ८ भरून त्यांचे नाव आणि लिंग यांमध्ये दुरुस्ती करता येईल.

दिव्यांग मतदारांसाठी सुविधा

दिव्यांग मतदारांसाठी खास PWD या ॲपची सोय केलेली आहे. या ॲपवरून दिव्यांग मतदारांना नावनोंदणी करता येईल. तसेच, त्यांनी आधी नोंदणी केली असेल, पण दिव्यांगत्व म्हणून नोंद केली नसेल, अशा व्यक्तींनाही या ॲपवरून त्यांचे दिव्यांगत्व चिन्हांकित करता येईल. एकदा असे दिव्यांगत्व चिन्हांकित झाले की, त्यांना मतदानाच्या वेळी आवश्यक सुविधा - पोस्टल मतपत्रिका, तीन चाकी वाहन या सुविधा पुरवणे निवडणूक कार्यालयाला सोयीचे होते.

दिव्यांगत्व आपले चिन्हांकित करू या
मतदानदिनी सुविधा मिळवू या!!!

नावनोंदणीच्या सुविधा

मतदार नाव नोंदणीसाठी खालील ऑनलाईन किंवा ऑफलाईन पर्याय वापरता येतील :

- National Voter Service Portal (www.nvsp.in)
- Voter Portal Beta (https://voterportal.eci.gov.in/)
- Voters Helpline App (VHA) मोबाइल ॲप
- संबंधित मतदार नोंदणी कार्यालय

वरील माहितीवरून आपल्या लक्षात आले असेल की, मतदार नावनोंदणी किती सोपी आहे! नावनोंदणी प्रत्यक्ष मतदार नोंदणी कार्यालयात जाऊन करता येते, तशी ती ऑनलाईनही करता येते. मात्र, ज्या अर्जदारांकडे वयाचा किंवा निवासाचा पत्ता म्हणून भारत निवडणूक आयोगाने सांगितलेली कागदपत्रे उपलब्ध नाहीत, त्यांनी ऑनलाइन अर्ज करताना, तीच प्रमाणपत्रे हाताने लिहून सह्या घेऊन, ऑनलाइन अर्जात उल्लेख केल्याप्रमाणे सादर करायची आहेत. मतदार केंद्रस्तर अधिकारी (BLO) घरी येऊन पत्त्याची पडताळणी करतील. तेव्हा आधी अर्ज करणे ही सर्वात महत्त्वाची आणि अनिवार्य पायरी आहे. ऑनलाईन पद्धतीने मतदार नोंदणी कशी करावी, नाव वगळणी कशी करावी यांबाबतचे व्हिडिओ आमच्या CEO Maharashtra या यु-ट्यूब चॅनलवर उपलब्ध आहेत.

वंचित घटकांसाठी कार्य करणाऱ्या सामाजिक संस्था आणि संघटना यांनी या घटकांच्या नाव नोंदणीसाठी पुढाकार घेतला, तर त्यांच्यासाठी राज्यभर मोठ्या प्रमाणात नावनोंदणीची मोहीम राबवता येईल. लक्षात घ्या, सक्षम लोकशाहीची पहिली पायरी मतदार नोंदणी आहे. चला, आधी ती पूर्ण करू आणि मग सारे मिळून मताधिकार बजावू!

उप सचिव आणि सह मुख्य
निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य

व्हा सजग मतदार...

लोकशाहीचे सक्षमीकरण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे आणि ती आपल्या रोजच्या जगण्याशी संबंधित आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी पहिला टप्पा म्हणजे आपण १८ वर्षे पूर्ण होताच नावनोंदणी करायला हवी. दुसरा टप्पा म्हणजे प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर जाऊन, आपल्याला योग्य वाटणाऱ्या लोकप्रतिनिधीला, लोकशाही मूल्यांची जपणूक करणाऱ्या लोकप्रतिनिधीला मत देणे. राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रूपांतर करण्यासाठी सजग मतदार होणे गरजेचे आहे.

शरद दळवी

काही महिन्यांपूर्वी ओटीटी प्लॅटफॉर्मवर 'मंडेला' नावाचा तमिळ भाषेतला सिनेमा पाहिला. या सिनेमातला हिरो अजिबातच हिरो या कॅटेगरीत न बसणारा, ना दिसायला ना वागायला. कसलंही कला-कौशल्य नसणाऱ्या या सिनेमातल्या नायकाने एका झाडाच्या बेचक्यात आपला सगळा संसार थाटला आहे. व्यवसायाने न्हावी असणारा हा नायक, अगदीच तुटपुंज्या, कालबाह्य साहित्याने न्हाव्याचा धंदा करत असल्यामुळे गावातले अडलं-नडलेलं गिऱ्हाईकच त्याच्याकडे येते. त्यामुळे त्याची बरेचदा उपासमार होते. मग तो गावकऱ्यांची पडेल ती कामे करतो, बदल्यात त्यांनी दिलेले शिळंपाकं खातो. असा हा नायक कुणाच्याही खिजगणतीत नसलेला, सामान्याहून सामान्य! अन् तरीही हा सिनेमा आपल्याला खिळवून ठेवतो. कारण, या सामान्याहून सामान्य नायकाला मिळालेला मताधिकार आणि त्याने त्या अधिकाराचा गावाच्या विकासासाठी केलेला उपयोग, या विषयाभोवती गुंफलेले सिनेमाचे कथानक तुमच्या-माझ्या आसपास घडणारे आहे. एका मतदानाचे मूल्य किती असू शकते, याचे महत्त्व हा सिनेमा ठसवतोच. शिवाय, मतदान ही किती विचारपूर्वक करायची गोष्ट आहे, याचीही जाणीव करून देतो.

बहुतांश जणांना आपल्या आजूबाजूची व्यवस्था भ्रष्ट आहे आणि ती बदलायला हवी असे वाटत असते. परंतु व्यवस्था एका रात्रीत तयार होत नाहीत; तशी ती एका रात्रीत बदलताही येत नाहीत. या बदलाची पहिली पायरी आहे, मतदार यादीत आपले नाव नोंदवणे. सिनेमातल्या व्यवस्था-बदलाची गोष्टही याच पायरीने सुरू झालेली आहे.

युवकांनी जागृक व्हावे

वयाची अठरा वर्षं पूर्ण झाली की, प्रत्येक भारतीय नागरिकाला मताधिकाराचा अधिकार प्राप्त होतो, हे मी आणि तुम्हीही नागरिकशास्त्राच्या पुस्तकात शिकलेलो आहोत. पण, पुस्तकातून शिकलेले फक्त परीक्षेपुरते वापरायचे असते, या संस्कारामुळे अठरा वर्ष झाली तरी बरेचजण मतदार म्हणून नावनोंदणी करत नाही. या वयोगटाची अगदी आकडेवारीच समोर ठेवायची, तर असे दिसते की, १८ ते १९ या वयोगटाची लोकसंख्येतील टक्केवारी साडेतीन टक्के आहे, तर त्यांची मतदार नोंदणीतील टक्केवारी केवळ सव्वा टक्क्याच्या आसपास आहे.

२० ते २९ या वयोगटाची लोकसंख्येतील टक्केवारी १८ टक्के आहे, पण मतदार यादीतील या गटाची टक्केवारी फक्त साडे तेरा टक्केच आहे. तरुणांच्या टक्केवारीतील ही तफावत बरीच बोलकी आहे. तरुणांची लोकसंख्येची टक्केवारी जेव्हा शंभर टक्के मतदार यादीमध्ये प्रतिबिंबित होईल, तेव्हाच आजच्या युवा पिढीने लोकशाही व्यवस्थेत सहभागी होण्याची पहिली पायरी पूर्ण केली आहे, असे म्हणता येईल.

नोंदणी सहज-सोपी

आजची पिढी मोठ्या प्रमाणात टेक्नोसॅव्ही आहे, तेवढेच तिने डेमोक्रसीसॅव्हीही व्हायला हवे. आता तर नावनोंदणीची सुविधा ऑनलाइनही उपलब्ध आहे. आमच्या NVSP, Voter Portal या संकेतस्थळावर आणि Voter Helpline या ॲपवरही नावनोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे घरबसल्या नोंदणी करू शकता. ज्यांच्याकडे स्मार्ट फोन नाही किंवा इंटरनेटची सुविधा नाही, अशा तरुण-तरुणींना आपापल्या परिसरातील मतदार नोंदणी कार्यालयात जाऊन अर्ज क्र. ६ भरून नावनोंदणी करण्याचा पर्याय उपलब्ध आहेच. तुम्ही ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष कशाही प्रकारे नावनोंदणीचा अर्ज भरताना, तुम्हाला काही अडचण आली, एखादा मुद्दा समजला नाही,

तर तुम्ही CEO Maharashtra या आमच्या यु-ट्यूब चॅनलला भेट देऊन, अर्ज क्रमांक ६ पाहू शकता. त्यामध्ये अर्ज कसा भरायचा, याविषयी तपशिलात माहिती देण्यात आलेली आहे.

प्रत्यक्ष सहभागी व्हा...

हे झाले नाव नोंदणीविषयी; लोकशाही व्यवस्थेत सहभागी होण्याचा हा फक्त पहिला टप्पा आहे. यानंतरचा दुसरा टप्पा आहे, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर जाऊन, आपल्याला योग्य वाटणाऱ्या लोकप्रतिनिधीला मत देणे. आपल्या काही मित्रमैत्रिणींनी वयाची १८ वर्षे पूर्ण होऊनही नावनोंदणी केलेली नाही, त्याप्रमाणे काहीजण नाव नोंदणी करूनही प्रत्यक्ष मतदान मात्र करत नाहीत. म्हणून तर आपली संसदेच्या किंवा विधानसभेच्या निवडणुकांमधील मतदानाची टक्केवारी ५०-६० टक्क्यांच्या आसपासच असते. आधीच्या पिढीप्रमाणे तुम्ही ही चूक करू नये आणि लोकशाही प्रक्रियेत पूर्णपणे सहभागी होण्यासाठी हा दुसरा टप्पा पूर्ण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

योग्य प्रतिनिधीची निवड

लोकशाहीचे सक्षमीकरण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे आणि ती आपल्या रोजच्या जगण्याशी संबंधित आहे. कशी? भारताचा प्रत्येक नागरिक, मग तो गावात-शहरात, बंगल्यात-झोपडीत कुठेही राहणारा असो, दररोज अनेक नागरी आणि राजकीय प्रश्नांशी सातत्याने जोडलेला असतो. पाणी, सार्वजनिक स्वच्छता, खड्डेमुक्त रस्ते, गुणवत्तापूर्ण शिक्षण, चांगली आणि परवडणारी घरे, गर्दीमुक्त रेल्वेप्रवास, प्रसन्न बागा, सुसज्ज आणि प्रसन्न इस्पितळे, पात्रतेनुसार रोजगार, अशा अनेक सार्वजनिक सुविधा नागरिकांना विनासायास मिळणे, हे सक्षम आणि सुदृढ लोकशाहीचे लक्षण आहे. आपल्याला न्याय्य कायदे आणि नियम हवे असतील तर आपण संसदेत आणि विधानमंडळात योग्य प्रतिनिधी निवडून दिले पाहिजेत. त्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपला मताधिकार बजावला पाहिजे आणि तो बजावताना पैसे, वैयक्तिक वापराच्या वस्तू, तात्पुरत्या आमिषांना बळी न पडता आपल्या परिसराच्या कायमस्वरूपी विकासाला प्राधान्य दिले पाहिजे. अशा सुजाण नागरिकांनी बजावलेल्या मताधिकारामुळेच लोकप्रतिनिधींवर दबाव निर्माण होईल आणि खऱ्या अर्थाने लोकांनी लोकांची लोकांसाठी चालवलेली लोकशाही व्यवस्था अस्तित्वात येईल. अर्थात, प्रत्येक नागरिकाने ही कर्तव्ये सातत्याने पार पाडायची असतात.

नोंदणीसाठी आवश्यक बाबी

- **वयाच्या पुराव्यासाठी यापैकी कोणताही एक दस्तऐवज** : जन्मदाखला, शाळा सोडल्याचा दाखला, जन्मतारखेची नोंद असलेली पाचवी/आठवी/दहावी/बारावी यांपैकी एका इयत्तेची गुणपत्रिका, पॅन कार्ड, वाहन चालक परवाना, भारतीय पासपोर्ट व आधार कार्ड.
- **निवासाच्या पुराव्यासाठी यापैकी कोणताही एक दस्तऐवज** : बँक/किसान/टपाल यांचे चालू खातेपुस्तक म्हणजे पासबुक, शिधावाटपपत्रिका म्हणजेच रेशनकार्ड, भारतीय पासपोर्ट, वाहन चालक परवाना, अलीकडील भाडेकरार, पाणी/टेलिफोन/वीज/गॅस यांचे अलीकडचे देयक म्हणजेच बिल (हे देयक तुमच्या स्वतःच्या नावे नसेल, तर तुमच्या जवळच्या नात्यातल्या व्यक्ती - आई/वडील/पती/पत्नी - यांच्या नावे असले तरी चालू शकते. तृतीयपंथीयांच्या बाबतीत ही बिले गुरूच्या नावे असतील तरी चालू शकते.), प्राप्तिकर निर्देशपत्रिका म्हणजेच इन्कम टॅक्स असेसमेंट ऑर्डर, भारतीय टपाल विभागाद्वारे तुमच्या सध्याच्या निवासस्थानाच्या पत्त्यावर तुम्हाला प्राप्त झालेले कोणतेही टपालपत्र.

लोकशाही साक्षरता मंडळ

लोकशाही सक्षमीकरणाच्या या प्रक्रियेत तरुणांनी सजग होऊन मोठ्या प्रमाणात भाग घेतला पाहिजे, यासाठी भारत निवडणूक आयोगाने प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयामध्ये लोकशाही साक्षरता मंडळ स्थापन करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार महाराष्ट्रातील मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने सुचवल्याप्रमाणे शालेय विभाग आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाने त्यासंबंधीची परिपत्रकेही काढली आहेत. तरुणांनो, लोकशाही व्यवस्थेत सहभागाची सुरुवात म्हणून तुम्हाला आपापल्या शाळा-महाविद्यालयातील लोकशाही साक्षरता मंडळामध्ये सक्रिय सहभाग घेता येईल. तुमच्या शाळा-महाविद्यालयामध्ये लोकशाही साक्षरता मंडळ स्थापन झालेले नसेल, तर तुमच्या शिक्षकांशी चर्चा करून असे मंडळ स्थापन करण्यात पुढाकार घेता येईल. आपल्या देशाच्या लोकशाही सक्षमीकरणात युवा पिढी पुढाकार घेणार नाही, तोवर अशी मंडळे खऱ्या अर्थाने सक्रिय होणार नाहीत. आणि दुसरीकडे, अशी मंडळे सक्रिय होणार नाहीत, तोवर आपली शाळा-महाविद्यालयांत शिकणारी उद्याची पिढी लोकशाही साक्षर होणार नाही.

सामाजिक लोकशाही

लोकशाही म्हणजे केवळ मतदान, निवडणुका, शासनव्यवहार, न्यायालय नव्हे; हे लोकशाहीचे केवळ राजकीय स्वरूप आहे. लोकशाही जर एक जीवनमार्ग व्हायचा असेल, तर लोकशाही समाजाच्या विभिन्न क्षेत्रांत पोहोचली पाहिजे, अगदी आपल्या कुटुंबातसुद्धा! आज भारतीय लोकशाहीपुढे अनेक आव्हाने आहेत. जातीय-धार्मिक राजकारण, राजकीय घराणेशाही, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, भ्रष्टाचार इ. आव्हाने भारतीय लोकशाहीपुढे आ वासून उभी आहेत. या आव्हानांचा बीमोड करायचा तर नागरिकांनी लोकशाही मूल्ये म्हणजेच स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, शांतता, विकास, मानवतावाद या मूल्यांना प्राधान्य देणाऱ्या लोकप्रतिनिधींची निवड केली पाहिजे. तसे झाले तरच घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रूपांतर होऊ शकेल.

अवर सचिव आणि उप मुख्य
निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य

पुन्हा गजबजल्या शाळा

मार्च २०२० पासून कोविड-१९ चा संसर्ग लक्षात घेता लॉकडाऊनमुळे शाळा तडकाफडकी बंद कराव्या लागल्या. परंतु शिक्षण विभागाने ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीने शिक्षणाचे अत्यंत परिणामकारक उपक्रम राबवले. कोविड-१९ चा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर योग्य उपाययोजना करत आता प्रत्यक्ष शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या वाटा पुन्हा खुल्या झाल्या आहेत.

ब्रिजकिशोर झंवर

शिक्षणाची ज्ञानगंगा अविरत वाहती राहायला हवी. ज्ञान हे वाटल्याने वाढत जाते तसे ते ग्रहण करणारे ज्ञानार्थी, विद्यार्थीदेखील असायला हवेत. या पार्श्वभूमीवर ज्ञान देणारे आणि घेणारे यांच्यासाठी शिक्षण विभाग सतत दक्ष आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे यात खंड पडतो की काय अशी भीती अनेकांना वाटत होती; मात्र राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने अथक परिश्रम घेऊन ऑनलाईन पद्धतीने ही शिक्षणाची गंगा वाहती ठेवली.

आता कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत असल्याने सर्व प्रकारची दक्षता घेऊन शाळा टप्प्याटप्प्याने पुन्हा एकदा प्रत्यक्ष सुरू होऊन विद्यार्थ्यांच्या किलकिलाटाने शाळा गजबजल्या आहेत.

पालक व संस्थांशी चर्चा

शाळा सुरू कराव्यात या निर्णयापर्यंत पोहोचणे खरंतर अवघड होते. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेची भीती तर होतीच त्याचबरोबर बालकांच्या आरोग्याची काळजी घेणेही आवश्यक होते. या दोन्ही बाबींचा विचार करून निर्णय घेण्यासाठी पालक, शिक्षक, अधिकारी, सामाजिक संस्था, युनिसेफसारख्या संस्था, इतर मंडळातील शाळा आदींशी शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी स्वत: सर्वांसोबत चर्चा करून त्यांचे मत व सूचना मागवल्या.

मुख्यमंत्र्यांचा विद्यार्थ्यांशी संवाद

'माझे विद्यार्थी, माझी जबाबदारी' या बोधचिन्हाचे अनावरण करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, सोबत शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड आदी.

सुरू झालेल्या शाळा परत बंद करायच्या नाहीत अशा निर्धाराने शिक्षण सुरू ठेवू, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शाळा सुरू होताना राज्यातील सर्व विद्यार्थी, शिक्षक यांच्याशी दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून संवाद साधताना सांगितले. त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. शाळा सुरू करून आपण मुलांसाठी विकासाचे, प्रगतीचे दार उघडतो आहोत. मात्र मुलांची अधिक काळजी घेणे ही आपली जबाबदारी असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

कोरोनासाठीचे निर्बंध शिथिल करून राज्यातील शाळांची प्रत्यक्ष सुरुवात करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड, अपर मुख्य सचिव वंदना कृष्णा आदींनी विद्यार्थी आणि शिक्षकांशी संवाद साधला. या वेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'माझे विद्यार्थी, माझी जबाबदारी' या बोधचिन्हाचे अनावरणही करण्यात आले.

मार्गदर्शक सूचना

आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करत शाळा सुरू करताना घ्यावयाची काळजी या विषयावरही सर्व स्तरातून सूचना मागवण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या वाहतुकीच्या नियोजनाचा आराखडा, विद्यार्थ्यांच्या बेंचवर बसण्याची व्यवस्था, दोन शिफ्टमध्ये शाळा सुरू करणे या सर्व बाबींचा अंतर्भाव करून शाळा सुरू करण्यासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे (एसओपी) तयार करण्यात आली. विद्यार्थ्यांनी मास्क वापरावे, सोशल डिस्टन्सिंग पाळावे यावर भर देण्यात आला.

प्रत्यक्ष शाळा सुरू

पहिल्या टप्प्यात शंभर टक्के कोरोनामुक्त गावांमधून ७ जुलै २०२१ पासून शाळा सुरू करण्यात आल्या. ग्रामीण भागातील आठवी ते दहावीचे सुमारे सहा लाख विद्यार्थी शाळेत येऊन शिक्षण घेऊ लागले. यात गडचिरोली, चंद्रपूर, सांगली, नंदुरबार, हिंगोली, परभणी, नांदेड या भागाचा समावेश होता. महत्त्वाच्या विषयांवर लक्ष केंद्रित करून ऑफलाईन वर्ग सुरू करण्यात आले. कोरोनाची दुसरी लाट ओसरते आहे असे वाटू लागले होते.

या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून १० ऑगस्ट २०२१ पासून शहरी भागातही शाळा सुरू करण्यासाठीचे नियोजन करण्यात आले, मात्र त्यानंतर तिसऱ्या लाटेची शक्यता वर्तवण्यात आल्यामुळे बालकांच्या आरोग्याचा विचार करता शाळा सुरू करण्याचा पुढचा टप्पा स्थगित करण्यात आला.

आरोग्य विभागाच्या टास्क फोर्ससोबत, लहान मुलांच्या आरोग्यासाठीच्या पेडियाट्रिक टास्क फोर्ससोबत तसेच लहान मुलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याशी संबधित तज्ज्ञ मंडळींसोबत चर्चा करून सुधारित मार्गदर्शक सूचना तयार कराव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. पालकांना विश्वासात घेऊन नव्या मार्गदर्शक सूचनांचा अंतर्भाव करून २४ सप्टेंबर २०२१ रोजी ग्रामीण भागात पाचवी ते बारावी आणि महानगरपालिका क्षेत्रात आठवी ते बारावीपर्यंतच्या शाळा प्रत्यक्ष सुरू झाल्या.

प्रा. वर्षा गायकवाड
शालेय शिक्षण मंत्री

शिक्षण, आरोग्याला प्राधान्य

शाळा सुरू करत असताना बालकांचे आरोग्य, त्यांच्या सुरक्षिततेचा प्राधान्याने विचार करण्यात आला. अभ्यासासोबतच त्यांच्यासोबत भावनिक संवाद साधण्यात आला. या काळात जी मुले शाळेच्या प्रवाहातून बाहेर पडली, त्यांना पुन्हा प्रवाहात आणले जाणार आहे. कोरोनामुळे पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, शालेय पोषण आहार, मोफत गणवेश देण्यात येणार आहे. स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून अशा मुलांना दत्तक घेण्यात येईल. नावीन्यपूर्ण प्रयत्नांसह शिक्षण अखंड सुरू ठेवण्याचा राज्य शासनाचा सदैव प्रयत्न असेन.

मागील काही महिन्यांमध्ये कोविड-१९ ची तीव्रता लक्षात घेता विद्यार्थी व शिक्षकांच्या आरोग्याचा विचार करून आपण प्रत्यक्षपणे शाळा सुरू करू शकलो नाही. तथापि आता ग्रामीण भागातील पाचवी ते बारावीचे आणि शहरी भागातील आठवी ते बारावीचे वर्ग सुरू झाले आहेत.

सातत्यपूर्ण अध्ययन आराखडा

आता ग्रामीण आणि शहरी भागातील काही शाळा सुरू झाल्या असल्या तरी ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीने त्यांचे शिक्षण सुरू राहण्यासाठी 'माझे विद्यार्थी, माझी जबाबदारी' या अभियानाच्या माध्यमातून सातत्यपूर्ण अध्ययन आराखड्याचा शुभारंभ करण्यात आला. विद्यार्थीनिहाय सर्वेक्षण करून त्याच्या गुणवत्ता वृद्धीसाठी नियोजनपूर्वक प्रयत्न करण्यात येणार आहेत. यामध्ये अध्यापनाचे नियोजन, वेळापत्रक, उपस्थिती, साहित्य, पालक सहभाग, मूल्यमापन, अभ्यासेतर नियोजन, शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, शैक्षणिक सुविधा, शारीरिक आरोग्य व मानसिक स्वास्थ्यासाठीचे विशेष नियोजन करण्यात येणार आहे.

कोविड काळातील शिक्षण

मार्च २०२० पासून कोविड-१९ चा संसर्ग लक्षात घेता लॉकडाऊनमुळे शाळा तडकाफडकी बंद कराव्या लागल्या. पण आपला शिक्षण विभाग मात्र विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचावे म्हणून निरंतर कार्यरत राहिला आहे.

विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीने शिक्षणाचे अत्यंत परिणामकारक उपक्रम राबवले आहेत. यासाठी रेडिओ, दूरदर्शन, व्हॉट्सॲप, यु-ट्यूब, फेसबुक, गुगल क्लासरूम या सर्व समाज माध्यमांचा प्रभावी वापर केला.

शाळेसाठी मार्गदर्शक सूचना

शाळा सुरू करण्यासाठी : प्रत्येक विद्यार्थ्याचे नियमितपणे शारीरिक तापमान तपासावे; शक्य असल्यास यासाठी इच्छुक डॉक्टर पालकांची मदत घ्यावी; सर्व शाळा आरोग्य केंद्राशी संलग्न कराव्यात; स्थानिक आरोग्य केंद्रामधील डॉक्टर व परिचारिकांची मदत घ्यावी; उपरोक्त कामासाठी (सामाजिक दायित्व निधी) सीएसआर किंवा स्थानिक निधीतून खर्च करण्यात यावा.

शाळेत येताना घ्यावयाची काळजी : मुलांना शाळेत पायी येण्यासाठी शिक्षकांनी प्रोत्साहित करावे. ज्या शाळांमध्ये स्कूल बस/ खासगी वाहनाद्वारे विद्यार्थी येतात. अशा वाहनांमध्ये एका सीटवर एकच विद्यार्थी बसून प्रवास करेल, याची दक्षता घ्यावी. बसमध्ये चढताना व उतरताना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी वाहन चालक/वाहक यांनी सॅनिटायझरचा वापर करण्यास प्रोत्साहित करावे.

शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी : विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षण आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही काळजी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांनी साबण किंवा सॅनिटायझरने हात धुण्याबाबत विद्यार्थ्यांना सतत सूचना द्याव्यात. विद्यार्थ्यांमध्ये पुस्तकांची अदलाबदल होऊ नये यासाठी विद्यार्थ्यांनी गृहपाठ ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याबाबत निर्देश द्यावेत, वेळ असल्यास गृहपाठ शक्यतो वर्गामध्येच करून घ्यावा.

खेळाच्या मैदानाबाबत : अभ्यासाबरोबरच खेळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. तथापि, सद्य:स्थितीत कोणत्याही प्रकारचे खेळ घेण्यात येऊ नयेत. कोरोनाविषयक परिस्थिती सर्वसामान्य झाल्यानंतर काही खेळ घेण्यास हरकत नाही. तथापि असे खेळ घेत असताना पुढीलप्रमाणे काळजी घेण्यात यावी : खेळाचे साहित्य नियमित सॅनिटाईज करावे, खेळ खेळणाऱ्या विद्यार्थ्यांकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे, विशेषत: थकलेल्या व दमलेल्या विद्यार्थ्यांकडे लक्ष असावे, विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर मास्क असावा व त्यांच्यामध्ये दोन मीटरचे अंतर असावे. अंतर कमी असणारे, गर्दी होणारे खेळ टाळावेत.

आजारी विद्यार्थी शोधणे : आजारी असलेले विद्यार्थी वर्गात असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांना डॉक्टरांकडे नेण्याची व्यवस्था करावी व डॉक्टरांच्या सल्ल्याने विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत निर्णय घ्यावे. विद्यार्थ्यांवरील मनोसामाजिक परिणामांबाबत शिक्षकांना अवगत करावे, याबरोबरच जास्त चिडचिड करणारे, रागीट व छोट्याशा गोष्टीने निराश होणारे, वर्गात नेहमी शांत बसणारे व कोणत्याही गोष्टीत स्वारस्य न दाखवणारे, वयाशी विसंगत वर्तणूक दर्शवणारे, खाण्याच्या व झोपण्याच्या सवयीत बदल दर्शवणारे, शालेय शिक्षणात असामान्य घट दर्शवणारे, असाहाय्य झालेले व सतत रडणारे अशी लक्षणे असणाऱ्या विद्यार्थ्यांची विशेष काळजी घ्यावी व त्यांच्याशी संवाद साधावा.

ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू
शालेय शिक्षण, राज्यमंत्री

पुन्हा 'स्कूल चले हम'!

विद्यार्थ्यांच्या आरोग्याची सुरक्षितता मुख्य मानून आम्ही शक्य त्या प्रकारे राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षण कसे देता येईल, याचा परिपूर्ण विचार केला. कोरोनासाठीचे निर्बंध शिथील करून राज्यातील शाळांची प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली. शाळा सुरू झाल्याने आता मुलांच्या विकासाचे, प्रगतीचे दार मुलांसाठी उघडल्या गेले आहे. सुरू होत असलेल्या शाळा परत बंद करायच्या नाहीत, हा संकल्प आम्ही घेतला आहे. आता कोरोना प्रादुर्भाव संपून पुर्वीचेच दिवस पुन्हा येतील, असा मला विश्वास आहे.

विद्यार्थ्यांच्या मनोसामाजिक स्वास्थ्याबाबत : पहिल्या एक दोन आठवड्यामध्ये थेट शिक्षणावर भर न देता विद्यार्थ्यांस शाळेची सवय होऊ द्यावी. प्रत्येक विद्यार्थ्याची पार्श्वभूमी अवगत करून त्यानुसार विद्यार्थ्यांशी परस्पर संवाद साधावा. कोविड होऊन गेलेल्या विद्यार्थ्याशी सर्वसामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे वागावे. विद्यार्थी व पालकांशी ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने संपर्कात राहावे.

शिक्षक-पालक बैठकीत चर्चा : शिक्षक-पालक बैठकीत कोविड आजाराबाबत तसेच हा आजार टाळण्यासंबंधीची माहिती द्यावी. पालकांच्या प्रश्नांना योग्य संवादाने उत्तर द्यावे. पालकांनी पुरेसे मास्क तयार करावेत व ते मास्क दररोज धुवावेत. मुलांना कमीत कमी पुस्तके/वह्या न्याव्या लागतील अशी व्यवस्था असावी, घरात आल्यानंतर स्नान करावे, अंघोळीनंतर युनिफॉर्म साबणाच्या पाण्यात बुडवून ठेवावा किंवा संबंधित शाळेने विद्यार्थ्यांना युनिफॉर्म ऐच्छिक करावा, मास्क साबणाच्या पाण्याने धुवावा, पालकांनी मुलांना शाळेच्या उपक्रमाबाबत अवगत करून त्यांना पुढील दिवसासाठी तयार करावे आदी विषयांवर शिक्षक-पालक भेटीमध्ये चर्चा करण्यात यावी.

कोविड काळात ऑनलाईन शिक्षणाद्वारे ज्ञानाची कवाडे उघडे ठेवण्याची जबाबदारी शिक्षण विभागाने पेलली मात्र शिक्षणाची खरी मजा विद्यार्थ्यांना शाळेत जाऊनच घेता येते. सरकारही या बाबतीत सकारात्मक असून दिवाळीनंतर आता 'सर्वांसाठी शाळा' आणि शाळेत जाऊन शिक्षण घेता येईल. एकंदरीत, देशाच्या भावी पिढीचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेऊन कोरोनाचा प्रादुर्भाव असताना ऑनलाईन पद्धतीनंतर आता प्रत्यक्ष शाळा सुरू करून शालेय शिक्षण विभागाने ज्ञानगंगा वाहती ठेवण्याचा प्रयत्न केला आहे, हे निश्चित..

प्रत्यक्ष शाळेत जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड. सोबत संबंधित अधिकारी व शिक्षक.

विभागीय संपर्क अधिकारी

शाळा सुरू; आनंदाला उधाण

शाळेची घंटा पुन्हा वाजली आणि मुलांच्या किलबिलाटाने सारा परिसर फुलून गेला. कोरोनाचे संकट दूर करून पुढे जात असताना शाळा सुरू करणे हा राज्य शासनाचा निश्चितच धाडसी निर्णय म्हणायला हवा. यामुळे पालक, शिक्षक, प्रशासन आनंदी आहेच पण मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद काही औरच आहे.

रणजितसिंह डिसले

कोरोनामुळे तब्बल दीड वर्षे मुलांना प्रत्यक्ष वर्गात येता आले नाही. ऑनलाईन शिक्षण सुरू होतेच, पण प्रत्यक्ष वर्गात बसून, मित्रांसोबत मस्ती करत शिक्षण घेण्याच्या आनंदाला मुले मुकली होती. अशा प्रतिकूल परिस्थितीतदेखील राज्यातील अनेक शिक्षकांनी नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून शिक्षण देणे सुरूच ठेवले.

कोरोनाच्या काळात डॉक्टरांनी लाखो नागरिकांचे प्राण वाचवले, मात्र याच काळात शिक्षकांनी देशाचे भविष्य वाचवले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. खेड्यापाड्यांत जिथे विजेची सुविधा नाही, इंटरनेटची सोय नाही अशा प्रतिकूल परिस्थितीतही अनेक शिक्षकांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडले.

नावीन्यपूर्ण होमवर्क बोर्ड

परभणी जिल्ह्यातील कातनेश्वर हे एक छोटसं गाव. शेतकरी आणि मजूर मोठ्या संख्येने गावात राहतात. गावकऱ्यांची आर्थिक परिस्थिती पाहता ऑनलाईन शिक्षणासाठी लागणारा मोबाईल आणि इंटरनेट शाळेतील सर्वच मुलांकडे नव्हते. मग काय, कातनेश्वर गावात कोरोनाच्या काळात ऑनलाईन नव्हे, तर ऑफलाईन पद्धतीने शाळा सुरू झाली. कातनेश्वरच्या जिल्हा परिषद शाळेने वेगळाच प्रयोग केला. मुलांचे शिक्षण सुरू राहावे, म्हणून शाळेतील शिक्षकांनी होमवर्क बोर्डची कल्पना मांडली आणि ती प्रत्यक्षात आणली देखील. मोठ्या भिंती, मुलांच्या खेळण्याच्या जागा, किराणा दुकाने अशा ठिकाणी हे होमवर्क बोर्ड रंगवण्यात आले आणि रोज त्यावर गृहपाठ दिला जाऊ लागला. गावातील ३०० मुलांसाठी हा प्रयोग राबवण्यात आलाय. पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व मुलांचे शिक्षण या उपक्रमामुळे सुरू राहिले. या होमवर्क बोर्डकरिता लागणारा निधी देखील गावकऱ्यांनीच गोळा केला. म्हणतात नं 'गाव करी ते राव करील काय', याचीच प्रचिती या गावात येते.

अभ्यासाचे गाव

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील म्हाळवडी गावाने तर याच्यापुढे एक पाऊल टाकले. त्यांनी संपूर्ण गावाचे रूपांतर शाळेत करून टाकले. गावातल्या सर्व भिंती त्यांनी

शाळेच्या अभ्यासक्रमाने रंगवून टाकल्या आहेत. त्यामुळे गावातील मुले आता खेळता-खेळता अभ्यासही करत आहेत. खेळता-खेळता मुले आता पाढे पाठ करू लागली आहेत. अनेकांना तर गप्पा मारत मारत छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आत्मसात होतोय. किचकट समीकरणे सतत पाहिल्यामुळे लक्षात राहायला लागली आहेत. या उपक्रमामुळे शिक्षकांनादेखील मुलांना शिकवणे सोपे झाले आहे. या अभ्यासक्रमामध्ये सर्वच आवश्यक माहिती असल्याने स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुणांचीदेखील

उजळणी यातून होत आहे. काही मुले या भिंतींच्या समोर जाऊन बसून अभ्यास करतात. मुलांच्या सोबत पालक असतील तर ते देखील भिंतीवर काय लिहिलंय? त्याला जमतंय का? हे पाहातात. अभ्यासाचे गाव म्हणून म्हाळवडीची नवी ओळख निर्माण झालीय.

शिक्षकांची तळमळ

कातनेश्वरमधील शिक्षक मुलांच्या अभ्यासाबाबत काळजीत होते, तर तिकडे नागपुरातील शिक्षक मुलांच्या आहाराबाबत काळजीत होते. कोरोनाच्या काळात मुलांना पोषण आहार कसा द्यावा? या विवंचनेत असणाऱ्या नूतन भारत विद्यालयाच्या शिक्षकांनी स्वतःच हे धान्य मुलांच्या घरी पोहोचवण्याचा निर्णय घेतला. शिक्षकांनी स्वतःच्या गाडीतून हे सारे धान्य ४०० हून अधिक मुलांच्या घरी पोहचवले. या शाळेत शिकणाऱ्या बहुतांश मुलांच्या आईवडिलांना कोरोनाच्या काळात नोकरी सोडावी लागली. मात्र सरकारकडून दिले जाणारे धान्य वेळेत पोहोचल्याने अनेक विद्यार्थ्यांना हायसे वाटले. पुढे जाऊन या शाळेतील शिक्षकांनी मुलांना शालेय वस्तू, मोबाईलदेखील दिले. ज्यामुळे या मुलांचे शिक्षण सुरू राहिले.

मुख्याध्यापिकेचे शिक्षणासाठी प्रयत्न

मुलींचे शिक्षण, दिव्यांग मुलांचे शिक्षण अशा विपरित परिस्थितीत अधिक प्रभावित होत असते. अशी संकटे आली की, सर्वात पहिल्यांदा मुली शिक्षण प्रवाहाच्या बाहेर जातात. मुलींचे शिक्षण सुरू राहावे म्हणून सोलापूरच्या भूम पुल्ली प्रशालेच्या मुख्याध्यापिका गीता सादूल यांनी विशेष प्रयत्न केले. मार्च २०२० मध्येच त्यांनी शाळेतील सर्व शिक्षकांना त्यांच्या वर्गातील सर्व मुलींच्या आर्थिक स्थितीबद्दल माहिती घेण्यास सांगितले. तसेच किती मुली ऑनलाईन शिक्षणात सहभागी होवू शकतील, याचा अंदाज घेतला. यांच्या शाळेतील सर्व मुलीचे पालक या विडी कारखान्यात काम करत असल्याने ऑनलाईन शिक्षण कितपत यशस्वी होईल, याबाबत त्या साशंक होत्या. मात्र सुयोग्य नियोजनामुळे आणि पालकांच्या पाठिंब्यामुळे या मुलींचे शिक्षण अविरत सुरू राहिले. पालक घरी आले की, रात्रीसुद्धा यांच्या शाळेतील मुलींचे ऑनलाईन क्लास सुरू व्हायचे.

खरी परीक्षा सुरू...

लेखात ज्यांच्या कार्याबद्दल उल्लेख केला असे शिक्षक आणि यांच्यासारखे अनेक शिक्षक राज्यभर कार्यरत आहेत. या सर्वांच्या प्रयत्नांमुळे मुलांचे शिक्षण सुरू राहिले. शाळा लवकरात लवकर सुरू करा, असा दबाव वाढत असताना मुलांच्या आरोग्याला सर्वाधिक महत्त्व दिले जाणे गरजेचे होते, आणि त्यामुळेच कोरोनानंतर शाळा सुरू होऊन देखील एकही मुलगा बाधित झाल्याचे उदाहरण वाचनात आले नाही. पण एवढ्यावर समाधान मानून चालणार नाही. खरी परीक्षा आता इथून पुढेच सुरू झाली आहे.

भविष्यासाठी यंत्रणा आणि अपेक्षा

भविष्यात येणाऱ्या संकटाना सामोरे जाण्यासाठी शिक्षण यंत्रणेला अधिक सक्षम करण्याची गरज आहे. कोरोनासारख्या संकटाना भविष्यात दिला जाणारा प्रतिसाद अधिक संरचित असायला हवा आणि यासाठीच यंत्रणेची सक्षमता अधिक महत्त्वाची आहे. भविष्यात अशी परिस्थिती पुन्हा उद्‌भवली तर काय करावे याचे उत्तर दीर्घकालीन उपाययोजनांमध्ये आहे. डी.एड. व बी.एड.च्या अभ्यासक्रमात ऑनलाइन शिक्षण हा विषय समाविष्ट करण्यात यावा, जेणेकरून त्या माध्यमातून शिक्षण देणारे शिक्षक घडवले जातील.

सध्या सेवेत असणाऱ्या शिक्षकांना दिली जाणारी प्रशिक्षणे फेस टू फेस पद्धतीने न देता ब्लेंडेड मोडमध्ये देण्यात यावी. त्यामुळे सेवेतील शिक्षकांनादेखील ऑनलाइन शिक्षण देण्याचा अधिक सराव होईल. पारंपरिक शिक्षण पद्धतीसोबतच ऑनलाईन शिक्षणाला महत्त्व देण्याची सुरुवात प्राथमिक स्तरावरून करण्यात यावी. तंत्रज्ञानाचा पूर्ण क्षमतेने वापर करण्यासाठी शिक्षकांना अधिक सक्षम करण्याची गरज निर्माण झाली आहे.

आजघडीला काही शिक्षकांनी आपापल्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे ग्रुप तयार करून त्याद्वारा ऑनलाइन परीक्षा घ्यायला सुरुवात केली आहे. काही जणांनी यु-ट्यूबच्या माध्यमातून शिकवणे सुरू केले आहे. या शिक्षकांचे प्रयत्न आणि त्याची यशस्विता पाहता त्यांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण दिले जाणे गरजेचे आहे. यामुळे त्यांच्यातील नवनिर्मितीला चालना मिळेल. असे प्रयत्नशील शिक्षक किती आहेत? किती जणांनी पालकांचे ग्रुप बनवले आहेत? किती जण ऑनलाईन परीक्षा घेत आहेत? याची माहिती शिक्षण खात्याने गोळा करून त्याच्या आधारे धोरणात्मक निर्णय घेणे उचित ठरेल.

संपूर्ण जगभरातील शिक्षण व्यवस्था आजच्या घडीला संक्रमणावस्थेतून जात आहे. काही देशांनी ऑनलाईन शिक्षण देण्याची सुविधा कित्येक वर्षापासून उपलब्ध करून दिली आहे. गुरुकूल शिक्षण पद्धतीपासून सुरू झालेला हा प्रवास आता सर्व मर्यादा ओलांडून नव्या वळणावर पोहोचला आहे. २१व्या शतकातील मुलांच्या गरजा, जाणिवा आणि शिकण्याच्या पद्धती अतिशय आधुनिक आहेत. मात्र आजही या २१व्या शतकातील मुलांना २०व्या शतकातील शिक्षक १९व्या शतकातील अभ्यासक्रम शिकवण्यासाठी १८व्या शतकातील तंत्रे वापरत आहेत. शिकण्या-शिकवण्याच्या प्रक्रियेतील ही दरी कमी करण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग अधिक प्रभावी ठरतो. आता ती वेळ आली आहे, जिथे प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या इच्छेने व त्याच्या गतीने शिकण्याची संधी मिळेल. गरज आहे ती शिक्षक व शिक्षण खाते यांच्या इच्छाशक्तीची.

लेखक हे जि.प. शाळा, परितेवाडी, ता. माढा, जि. सोलापूर येथे शिक्षक आहेत.

लसीकरणाला गती

देशातील शंभर कोटीहून अधिक नागरिकांचे लसीकरण करण्यात यश आले आहे. या लसीकरणात महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. लसीकरण मोहिमेत राज्य कायमच अव्वल राहिले आहे. राज्य शासनाने राबवलेल्या विविध प्रकारच्या उपाययोजनांमुळे राज्यात कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण झालेल्या नागरिकांची संख्या नऊ कोटींहून अधिक झाली आहे.

रवींद्र राऊत

कोविड-१९ च्या महामारीमुळे अवघे जग हैराण झाले आहे. मात्र लसीकरण मोहिमेमुळे या कोरोनावर आता मात केली जात आहे. देशभारात युद्धपाततळीवर लसीकरकण मोहीम राबवण्यात आल्याने शंभर कोटींहून अधिक नागरिकांना कोरोना प्रतिबंधात्मक लसीचा पहिला डोस देण्यात यश आले आहे. देशाच्या या कामगिरीत महाराष्ट्राचा मोलाचा वाटा राहिला आहे. लसीचे दोन डोस देण्यात राज्याने देशात आघाडी घेतली आहे.

देशाची आर्थिक राजधानी मुंबई असल्याने आणि राज्य उद्योग व व्यवसायामध्ये आघाडीवर असल्याने देशभरातून नागरिकांचा येथे ओढा आहे. त्यामुळे कोरोनासारख्या जागतिक संकटामध्ये आरोग्य व प्रशासकीय यंत्रणांवर मोठा ताण येणे साहजिक होते. परंतु कोरोना प्रतिबंधात्मक उपायोजनांमध्ये राज्य सदैव आघाडीवर राहिल्याने कोरोनाची तिसरी लाट थोपवण्यात राज्य सरकारला यश आले आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकारने कोरोना आटोक्यात आणण्यासाठी केलेल्या विविध प्रकारच्या उपाययोजनांमुळे हे शक्य झाले आहे. लसीकरण मोहिमेला सुरुवात झाल्यापासून लसीकरणात राज्य अव्वल राहिले आहे.

मिशन कवच कुंडल

लसीकरणाचा वेग आणखी वाढावा यासाठी राज्य शासनाने विविध स्तरावर प्रयत्न सुरू केले आहेत. कारण १०० टक्के लसीकरणाच्या माध्यमातूनच आपण कोरोनाला अटकाव करू शकतो. राज्यातील ग्रामीण भागातील लसीकरणाच्या वेगाच्या तुलनेत शहरी आणि निमशहरी भागात लसीकरणाची गती थोडी कमी होती. ही गती वाढवण्यासाठी मिशन कवच कुंडल अभियान राबवण्यात आले. ८ ते १४ ऑक्टोबर दरम्यान आयोजित या अभियानात राज्यातील दररोज १५ लाख नागरिकांना लस देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्या अंतर्गत मिशन कवच कुंडल कालावधीत ५०,७६,०२६ एवढे लसीकरण करण्यात आले.

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये आणि सर्व महानगरपालिका क्षेत्रात कवच कुंडल हे अभियान सार्वजनिक आरोग्य विभाग, महसूल विभाग, जिल्हा परिषद, नगरविकास, शिक्षण आणि गृह विभाग यांच्या संयुक्त समन्वयाने राबवण्यात आले.

लसीकरण मोहिमेला वेग

कोरोनाच्या परिस्थितीमध्ये राज्याची घडी पूर्वपदावर येण्यासाठी व सर्वसामान्यांना

राजेश टोपे
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

सर्व नागरिकांचे लसीकरण

सुमारे नऊ कोटींहून अधिक नागरिकांना कोविड-१९ प्रतिबंधात्मक लस देण्यात आली आहे. त्यापैकी सुमारे सहा कोटींहून अधिक नागरिकांना पहिला डोस देण्यात आला आहे, तर तीन कोटींहून अधिक नागरिकांना दोन्ही डोस देण्यात आले आहेत. दोन्ही डोस घेतलेल्या नागरिकांची संख्या इतर कोणत्याही राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वाधिक आहे. लसीकरणाचा वेग वाढवण्यासाठी मिशन कवच कुंडल, मिशन युवा स्वास्थ्य उपयुक्त ठरले. हा वेग असाच कायम ठेवून राज्यातील सर्व पात्र नागरिकांचे लसीकरण करण्याचा प्रयत्न आहे.

दिलासा मिळण्यासाठी निर्बंध शिथिल केले जात आहेत. निर्बंध शिथिल केल्यामुळे नागरिकांची सर्वत्र जा-ये वाढली आहे, कार्यक्रमांतील सहभाग वाढला आहे. यामुळे कोरोनाचा संभाव्य प्रसार रोखण्यासाठी शहरात लसीकरणाचा वेग वाढवण्यावर भर दिला जात आहे. यासाठी विशेष प्रयत्न केले जात असून अपर मुख्य सचिव डॉ. प्रदीप व्यास यांनी राज्यातील सर्व महापालिका आयुक्तांना पत्र लिहून लसीकरणाचा वेग वाढवण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार सर्व महापालिका क्षेत्रात विविध उपक्रम हाती घेऊन लसीकरण वाढवण्यात आले आहे. नागरिकांनी या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग घ्यावा, यासाठी जनजागृती मोहीमही राबवण्यात येत आहे.

मिशन युवा स्वास्थ्य

मिशन युवा स्वास्थ्य राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात उपस्थित राहण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे जास्तीत जास्त तरुणांना महाविद्यालयात जाता यावे, यासाठी मिशन युवा स्वास्थ्य राबवण्यात येत आहे. राज्यातील सर्व महाविद्यालये, सार्वजनिक आणि खासगी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठांच्या परिसरात लसीकरण उपक्रम राबवण्यात येत आहेत.

उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी या अभिनासाठी पुढाकार घेतला. युवकांना लवकरात लवकर महाविद्यालयात उपस्थित राहता यावे, त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी युवकांचे लसीकरण युद्धपातळीवर व्हायला हवे, अशी पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी भूमिका मांडली होती. या भूमिकेतूनच सार्वजनिक आरोग्य आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने मिशन युवास्वास्थ्य हे अभियान सुरू करण्यात आले.

महाविद्यालयातच लसीकरण

या अभियानांतर्गत युवकांना महाविद्यालय परिसरात लसीकरणची सुविधा उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. लसीकरणाबाबतची नोंदणी महाविद्यालयातर्फे केली जाणार आहे. जेणेकरून युवक, युवतींना त्यांची नोंदणी करणे सोयीस्कर होईल. राज्यात उच्च शिक्षण आणि तंत्रशिक्षण विभागाच्या सुमारे पाच हजार संस्था आहेत. या संस्थात सुमारे ४० लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या अभियानांतर्गत सर्व विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्याचे राज्य शासनाचे उद्दिष्ट आहे.

नवी मुंबई महापालिकेची कामगिरी

१६ जानेवारी २०२१ रोजी कोविड-१९ प्रतिबंधात्मक लसीकरणाला सुरुवात झाल्यापासून नवी मुंबई महानगरपालिकेने प्रत्येक टप्प्यावर लसीकरणाचे सुयोग्य नियोजन केले. यामुळे पहिल्या डोसचे १०० टक्के लसीकरण पूर्ण करणारी नवी मुंबई हे मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील पहिले शहर ठरले आहे.

कोविड-१९ च्या संभाव्य तिसऱ्या लाटेपूर्वी जास्तीत जास्त नागरिक लस संरक्षित व्हावेत, याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक अभिजीत बांगर यांच्यामार्फत बारकाईने लक्ष दिले जात होते. दररोज संध्याकाळी ७ ते १० या वेळेत नियमितपणे आयुक्तांमार्फत वेबसंवादाद्वारे घेतल्या जाणाऱ्या वैद्यकीय अधिकारी यांच्या कोविडविषयक आढावा बैठकीत लसीकरण वाढवण्यावर भर देण्याच्या दृष्टीने कृती आराखडा तयार करण्यात आला. त्यामध्ये प्रत्येक टप्प्यावर अनुषांगिक बदलही करण्यात आले. यामध्ये विशेषत्वाने नागरिकांना सुलभपणे आपल्या घराजवळच लस मिळावी, यासाठी लसीकरण केंद्र वाढवण्यात आली. सद्य:स्थितीत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात १०२ इतक्या मोठ्या संख्येने लसीकरण केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

सूत्रबद्ध नियोजन

नागरिकांची एकाच ठिकाणी गर्दी होऊ नये, कोविड सुरक्षा नियमांचे पूर्णत: पालन व्हावे व नागरिकांना विनासायास लसीकरणाची सुविधा उपलब्ध व्हावी याकरिता महानगरपालिकेची रुग्णालये, प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रे याशिवाय शाळा, समाज मंदिरे, रेल्वे आरोग्य केंद्र, सांस्कृतिक भवन आदी सार्वजनिक ठिकाणी लसीकरण केंद्रे सुरू करण्यात आली. महापालिका रुग्णालयांतील लसीकरण केंद्रे नागरिकांच्या सोयीसाठी २४ तास कार्यान्वित करण्यात आली होती. अगदी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही रुग्णालयांतील लसीकरण केंद्रे सुरू ठेवून लसीकरणात एकही दिवस खंड पडला नाही. या सर्वांचा परिपाक म्हणजे नवी मुंबई हे १८ वर्षांवरील १०० टक्के नागरिकांचा पहिला डोस पूर्ण करणारे एम.एम.आर. क्षेत्रातील पहिले शहर ठरले. नागरिकांना लसीकरणाची माहिती सहजपणे मिळावी याकरिता www.nmmccovidcare.com या संकेतस्थळावर लसीकरण केंद्रांच्या गुगल मॅपसह दैनंदिन लसीकरण वेळापत्रक उपलब्ध करून दिले जात आहे. फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, व्हॉट्सॲप अशा समाज माध्यमांवरूनही दररोज व्यापक प्रसिद्धी दिली जात आहे.

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या 'मिशन कवच कुंडल' मोहिमेंतर्गतही १२ रुग्णवाहिकांद्वारे शहरातील विविध स्पॉट्सवर जाऊन 'लसीकरण आपल्या दारी' उपक्रम यशस्वीपणे राबवण्यात आला. त्याचप्रमाणे आधारकार्ड नसल्यामुळे कोणताही व्यक्ती लसीकरणापासून वंचित राहू नये, याची दक्षता घेत अशा नागरिकांकरिता विशेष लसीकरण सत्रे राबवण्यात येत आहेत. आतापर्यंत कोविड प्रतिबंधात्मक लसीचे एकूण १७ लक्ष १० हजार ०८८ डोस नागरिकांना देण्यात आले आहेत.

विभागीय संपर्क अधिकारी

ई-पीक पाहणी
क्रांतिकारी पाऊल

महसूल मंत्री बाळासाहेब थोरात व महसूल राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वाखाली महसूल विभागाने शेतकऱ्यांना सक्षम करणारा अत्यंत क्रांतिकारी असा ई-पीक पाहणी कार्यक्रम कृषी विभागाच्या मदतीने राज्यभर कार्यान्वित केला आहे. १० सप्टेंबर २०१८ च्या शासन निर्णयानुसार पीक पेरणीची माहिती भ्रमणध्वनीवरील ॲपद्वारे गाव नमुना नंबर १२ मध्ये नोंदवण्यासाठी स्वतः शेतकऱ्यांनी उपलब्ध करून देण्याचा पथदर्शी कार्यक्रम राबवणे व त्यासाठी कार्यपद्धती निश्चित करून दिली आहे. त्यानुसार टाटा ट्रस्ट व महसूल विभागात झालेल्या सामंजस्य करारान्वये टाटा ट्रस्टच्या मदतीने ई-पीक पाहणी हे मोबाईल ॲप महसूल विभागाने विकसित केले आहे.

रामदास जगताप

राज्यातील संपूर्ण जमिनीचे अधिकार अभिलेख जतन करण्याची जबाबदारी महसूल विभागाकडे असून महसूल विभागाने राष्ट्रीय भूमी अभिलेखांचे आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील सर्व अधिकार अभिलेख संगणकीकृत केले असून, ते आता सामान्य जनतेला ऑनलाईन पद्धतीने डिजिटल स्वाक्षरी स्वरूपात महाभूमी पोर्टलद्वारे उपलब्ध आहेत. त्यासाठी महसूल विभागाने राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राच्या (एनआयसी) मदतीने ई-फेरफार प्रणाली विकसित केली असून, त्याद्वारे सुमारे १ कोटी ३० लक्ष फेरफार ऑनलाईन पद्धतीने नोंदवून प्रमाणित केले आहेत. ज्याप्रमाणे जमिनीचे अधिकार अभिलेख अर्थात गाव नमुना नं. ७ ऑनलाईन पद्धतीने अचूकरीत्या अद्ययावत केला जातो त्याप्रमाणे गाव नमुना नं. १२ मध्ये जतन केली जात असलेली पिकांची नोंदवहीदेखील ऑनलाईन पद्धतीने अचूकरीत्या अद्ययावत करण्याची आवश्यकता होती व त्यासाठीच महसूल विभागाने टाटा ट्रस्टच्या मदतीने ई-पीक पाहणी हे मोबाईल ॲप विकसित केले आहे.

मागील काही दशकात तलाठी यांचेकडील वाढलेल्या कामाचा बोजा विचारात घेता, पिकांच्या नोंदी करण्यासाठी त्यांना आटोकाट परिश्रम करावे लागत असत. तलाठ्यांच्या कामाचा बोजा कमी करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांच्या सहभागाने मोबाईल ॲपच्या आधारे शेतकऱ्यांनी स्वतः पीकपेरणीची माहिती तलाठ्याकडे ऑनलाइन पाठवण्यासाठी ई-पीक पाहणी नावाचे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे.

प्रकल्पाचे उद्दिष्ट

महसूल विभागाच्या ३० जुलै २०२१

रोजीच्या शासन निर्णयान्वये ई-पीक पाहणी प्रकल्प १५ ऑगस्ट २०२१ पासून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते लोकार्पण करून राज्यव्यापी करण्यात आला आहे. क्षेत्रीय स्तरावरून रिअल टाईम क्रॉप डेटा संकलित करणे, तसेच हा डेटा संकलित करताना पारदर्शकता आणणे, पीक पाहणी प्रक्रियेत शेतकऱ्यांचा सहभाग वाढवणे, शेतकऱ्यांच्या हितासाठी असलेल्या सरकारी योजनांच्या चांगल्या अंमलबजावणीसाठी हा डेटा वापरणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट हे आहे. राज्यभरात महसूल विभाग व कृषी विभागाच्या क्षेत्रीय कर्मचारी अधिकारी यांचे मार्फत व टाटा ट्रस्ट च्या मदतीने हा प्रकल्प राबवण्यात येत आहे.

ई-पीक पाहणीचे फायदे

- शेतकऱ्यांना देय असणाऱ्या कोणत्याही शासकीय योजनेचा थेट लाभ देण्यासाठी ई-पीक पाहणी प्रकल्पातील माहिती अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.
- खातेदारनिहाय पीक पाहणीमुळे खातेदारनिहाय पीक कर्ज अर्ज मंजुरी, पीक विमा योजनाची नोंदणी करणे किंवा पीक नुकसानभरपाई अचूकरीत्या अदा

करणे शक्य होणार आहे.

- राज्यभरामध्ये एकाच प्रकारच्या पिकासाठी एकच सांकेतांक क्र.(क्रॉप कोड) निश्चित करण्यात आला असलेने, गाव/तालुका/जिल्हा/विभागनिहाय कोणत्या पिकाखाली किती क्षेत्र आहे. याची निश्चित आकडेवारी सहज उपलब्ध होणार आहे.
- कृषी विभागाच्या विशिष्ट पिकासाठी देय असणाऱ्या योजना जसे की, ठिबक सिंचन, तुषार सिंचन योजना इत्यादीचे लाभ खातेधारकांना अचूकरीत्या देणे सहज शक्य होणार आहे.
- किमान आधारभूत किमतीवर धान/कापूस/हरभरा व तूर खरेदी इत्यादी योजनांसाठी देखील पीकनिहाय लागवडीचे क्षेत्र व उत्पन्नाचा अचूक अंदाज काढणे शक्य होणार आहे.
- खातेनिहाय व पीकनिहाय क्षेत्राची यादी उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे कोणत्या शेतकऱ्यांकडून किती रोजगार हमी योजना उपकर व किती शिक्षण कर देय ठरत आहे, हे निश्चित करता येणार असल्याने उपकर वसुलीत अचूकता व पारदर्शकता येईल.
- कृषी गणना अत्यंत सुलभ पद्धतीने व अचूकरीत्या गतीने पूर्ण करता येईल.

अंमलबजावणीचे महत्त्वाचे टप्पे

- महसूल व कृषी विभागाच्या मदतीने शेतकऱ्यांसाठी जागरूकता आणि क्षमता वृद्धीसाठी प्रचार, प्रसार, प्रबोधन व प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे. त्यासाठी डेमो ॲपदेखील उपलब्ध आहे.
- खातेदारांची नोंदणी (फक्त एकाच वेळी) करणे आवश्यक आहे.
- हंगामनिहाय निर्भेळ पिके व मिश्र/अंतरपिकांची माहिती अक्षांशरेखांशासह काढलेल्या पिकाच्या फोटोसह अपलोड करणे.
- मोबाईल ॲपमधून प्राप्त झालेल्या पिकांची माहिती अचूकता पडताळून पिकांची माहिती तलाठी यांनी कायम करणे अथवा दुरुस्त करून कायम करणे.
- खातेनिहाय पिकांची माहिती संबंधित डिजिटल स्वाक्षरीत ७/१२ मधील गाव नमुना नंबर १२ मध्ये उपलब्ध करून देणे.

अंमलबजावणी कालावधी

सर्वसाधारणपणे प्रत्येक हंगामातील सुरुवातीची दोन महिने शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकाची पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे अपलोड करावी व त्यानंतरचा एक महिना तलाठी व कृषी साहाय्यक यांनी १०% नमुना पडताळणी करावी आणि तद्नंतर तलाठी यांनी ई-पीक आज्ञावलीद्वारे पीक पाहणीला अंतिम मान्यता द्यावी.

भूमिका आणि जबाबदाऱ्या

ई-पीक पाहणीची अंमलबजावणी महसूल व कृषीसह संबंधित विभाग आणि क्षेत्रीय यंत्रणा यांनी संयुक्तपणे शेतकऱ्यांच्या सहकार्याने सुरू आहे. खरीप हंगामात १५ ऑगस्ट २०२१ पासून सुमारे ८८ लाख खातेदार शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी मोबाईल ॲपमध्ये नोंदणी करून पिकांच्या नोंदी अपलोड केल्या आहेत. कमी कालावधीत या ॲपमध्ये झालेली शेतकरी नोंदणी वरून हे ॲप शेतकऱ्यांनी स्वीकारले असल्याचे दिसून येत आहे.

महसूल विभाग

ई-पीक पाहणीच्या योग्य अंमलबजवणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुका स्थरावर अंमलबजावणी समित्या स्थापन करून कामाचा नियमित आढावा घेतला जातो. जिल्हास्तरावर अंमलबजावणीमध्ये समन्वय साधण्यासाठी उपजिल्हाधिकारी जिल्हा समन्वयक व कृषी विभागाचे कृषी अधिकारी सहजिल्हा समन्वयक म्हणून नियुक्त केले आहेत. तालुकास्तरीय समितीकडून ई-पीक पाहणीसाठी तलाठी व कृषी साहाय्यक यांच्यात गावांचे वाटप करून त्यांना गाव निहाय जबाबदारी देऊन शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण कार्यशाळा घेत आहेत. तलाठी यांच्याकडे जबाबदारी असलेल्या गावातील शेतकऱ्यांकडून ॲपद्वारे प्राप्त झालेली पिकांच्या माहितीची १०% नमुना पडताळणी तलाठी यांनी केल्यानंतर अशी पिकांची माहिती ऑनलाईन पद्धतीने आहे तशी मान्य करतात किंवा दुरुस्त करून मान्य करतात.

शेतकऱ्याला मोबाईलवर ई-पीक पाहणी ॲपची माहिती समजावून सांगताना महसूल मंत्री बाळासाहेब थोरात.

कृषी विभाग

ई-पीक पाहणीची प्रचार, प्रसिद्धी, जनजागृती करून अधिकारी-कर्मचारी व शेतकरी यांची क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यशाळा घेणे आणि प्रकल्पाच्या कामाचे पर्यवेक्षण करणे. शेतकरी खातेदाराची मोबाईल ॲपमध्ये नोंदणी करून घेणे व पीक पेऱ्याची माहिती अपलोड करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणे. कृषी साहाय्यकाकडे जबाबदारी असलेल्या गावातील खातेदार यांनी केलेल्या पीक पाहणीपैकी १०% पीक पेऱ्याची नमुना पडताळणी कृषी साहाय्यक करतात.

क्षेत्रीय स्तरावरील प्रकल्प अंमलबजावणीतील अडीअडचणी मांडण्यासाठी किंवा शेतकरी यांना मदत व मार्गदर्शन करण्यासाठी जमाबंदी आयुक्त कार्यालयात ०२०-२५ ७१२ ७१२ या क्रमांकाने मदत कक्ष सुरू केला आहे. ई-पीक पाहणीच्या अंमलबजावणीसाठी टाटा ट्रस्ट, महाआयटी व राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र पुणे यांची मदत घेण्यात येत आहे.

पिकांची स्वयं नोंदणी प्रक्रिया

- नोंदणी प्रक्रियेसाठी स्मार्ट मोबाईलद्वारे गुगल प्ले स्टोअरवरून ॲप डाऊनलोड करून स्थापित करावा.
- खातेदाराने ई-पीक पाहणी ॲपमध्ये मोबाईल क्रमांकाची नोंद करावी.
- ७/१२ मधील नावाप्रमाणे खातेदाराने त्यांच्या नावाची अचूकपणे नोंदणी करावी.
- खातेदार त्यांचे नाव किंवा खाते क्रमांक शोधून नोंदणी करू शकतील.
- ज्या खातेदाराचे एकाच महसुली गावात एकापेक्षा अधिक खाते क्रमांक आहेत, त्यांनी त्यांचे नाव नमूद केल्यास, त्या गावातील त्यांचे सर्व खाते क्रमांक व त्याखालील सर्व भूमापन/गट क्रमांक मोबाईल स्क्रीनवर नोंदणीसाठी उपलब्ध दिसतील.
- वरील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नोंदणीकृत मोबाईलवर एसएमएसद्वारे चार अंकी संकेतांक (पासवर्ड) प्राप्त होईल.
- प्राप्त झालेला चार अंकी संकेतांक चौकटीत अचूकपणे नोंदवल्यास खातेदाराची नोंदणी प्रक्रिया पूर्ण होईल.
- यशस्वी नोंदणी प्रक्रियेनंतर नोंदणीकृत मोबाईलवर खातेदाराचे नाव निवडून चार अंकी संकेतांक चौकटीत टाकून लॉगिन केल्यास पीक पाहणीची माहिती भरता येईल.

प्रकल्पाची वैशिष्ट्ये

- सामायिक मालकीच्या जमिनीसाठी, ज्याचे नाव गाव न.नं.७/१२ मध्ये सामायिक खातेदार म्हणून नोंदवलेले आहे, ते सर्व सामायिक खातेदार त्यांच्या वहिवाटीत असलेल्या क्षेत्रातील पिकांची स्वतंत्रपणे नोंदणी करू शकतील; मात्र त्यांनी वहिवाटीपेक्षा जास्त क्षेत्राची पीक पाहणी नोंदवू नये.
- अल्पवयीन खातेदाराच्या बाबतीत त्याचे पालक (अज्ञान पालककर्ता) नोंदणी करू शकतील.
- खातेदाराने पीक पाहणीची माहिती शेतामध्ये उभे राहून करायची असून पीक पाहणी भरून झाल्यावर त्या पिकाचा अक्षांश रेखांशासह (जीपीएस) फोटो व सर्व माहिती अपलोड करायची आहे. जर मोबाईल इंटरनेट सुविधेत अडचण येत असल्यास गावातील ज्या परिसरात इंटरनेट कनेक्शन मिळेल त्या ठिकाणी जाऊन पीक पाहणीची माहिती अपलोड करता येईल.
- एखाद्या शेतकऱ्याकडे स्वतःचा स्मार्टफोन नसेल, तर सहजरीत्या उपलब्ध होणारा मित्र, नातेवाईक किंवा शेजाऱ्याचा दुसरा स्मार्टफोन नोंदणीसाठी वापरू शकतात.
- एका स्मार्ट मोबाईलवरून एकूण ५० खातेदारांची नोंदणी करता येईल. फक्त ज्या खातेदाराची नोंदणी करावयाची आहे, त्यांचाच मोबाईल नंबर नोंदवावा म्हणजे ओटीपी/पासवर्ड त्याच फोनवर येईल व तो वापरून पूर्ण नोंदणी प्रक्रिया पूर्ण करता येईल.
- ज्या स्मार्टफोनवरून खातेदार नोंदणी केली, त्याच फोनवरून ई-पीक पाहणी करता येईल.
- फक्त खातेदार नोंदणी करताना व पीक पेरा अपलोड करताना इंटरनेट आवश्यक असते शेतावर जाऊन प्रत्यक्ष पिकाची माहिती भरून अक्षांशरेखांशासह (जीपीएस) फोटो घेताना इंटरनेटची आवश्यकता नसते हे या ॲपचे वैशिष्ट्ये आहे.

अन्य घटकांची मदत

शेतकऱ्यांना मदत मार्गदर्शन करण्यासाठी महसूल विभागातील तलाठी, मंडळ अधिकारी व अन्य महसूल अधिकारी, कृषी विभागाचे कृषी साहाय्यक, मंडळ कृषी अधिकारी व अन्य कृषी अधिकारी यांच्यासह १६० पेक्षा जास्त कृषी महाविद्यालयातील शेवटच्या वर्षाला असेलेले ९,५०० कृषी पदवीधारक विद्यार्थी (कृषिदूत) यांची मदत घेण्यात येत आहे. तसेच गावातील महाविद्यालयाचे विद्यार्थी, तरुण मंडळाचे कार्यकर्ते, स्वयंसेवक, पोलीस पाटील, कोतवाल, रास्त भाव धन्य दुकानदार, महा ई-सेवा केंद्राचे संचालक, सहकारी सोसायटीचे कर्मचारी, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे संचालक यांचीदेखील मदत होत आहे. काही भागात कृषी उत्पन्न बाजार समित्या व जिल्हा मध्यवर्ती बँकादेखील ई-पीक पाहणी प्रकल्पाची प्रचार प्रसिद्धी करत आहेत. या प्रकल्पातील क्षेत्रीय स्थरावरील महसूल विभागाचा महत्त्वाचा घटक असलेल्या तलाठी यांनी घेतलेल्या विशेष परिश्रमामुळे खरीप हंगामात ८८ लाखांपेक्षा जास्त खातेदार शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी प्रकल्पात नोंदणी करून सहभाग नोंदवल्याचे दिसून येते.

उपजिल्हाधिकारी तथा राज्य समन्वयक, ई-पीक पाहणी प्रकल्प, जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे

सीताफळाने फेडले पांग

लातूर जिल्ह्यातील जानवळ येथील 'येलाले' हे प्रयोगशील शेतकरी, ते खरे द्राक्ष बागायतदार पण काही वर्षांपूर्वी युरोप खंडात पाठवलेल्या द्राक्षात पेस्टीसाईडचा तांत्रिक दोष दाखवून ती द्राक्षे समुद्रात फेकून दिली. त्यामुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. त्यात 'येलाले' यांचाही माल होता. त्यामुळे त्यांनाही लाखोंचा फटका बसला. त्यातच त्यांनी द्राक्ष बाग मोडली. या लाखोंच्या तोट्यामुळे काय करावे या विवंचनेत ते सीताफळाकडे वळले आणि त्यांचे पांग फिटले!

युवराज पाटील

लातूर जिल्हा म्हणजे पक्क्या बेसाल्टवर बसलेला डेक्कन प्ल्याटूवरचा सगळ्यात टणक भाग... बोली भाषेत मांजरा खडक म्हणतो त्याच मांजरा नदीच्या खोऱ्याचा हा भाग... अशी भौगोलिक ओळख असलेल्या या भागात निसर्गाला पूरक असलेल्या अनेक फळापैकी एक फळ म्हणजे सिताफळ... हे उष्णकटीबंधीय फळ रानफळातील सगळ्यात गोड आणि आरोग्यदायी फळ म्हणून ओळखले जाते.

शेतकरी बाळकृष्ण नामदेव येलाले

प्रयोगशील तरुण शेतकरी बाळकृष्ण नामदेव येलाले यांना शेती आणि शेती मार्केट याचे चांगले ज्ञान आहे. कमी वयात अधिक अभ्यास करून त्यांनी शेतीत अनेक प्रयोग केले. त्यांच्या अनुभवातून त्यांनी सांगितलेली गोष्ट हजारो शेतकऱ्यांना नवी दृष्टी देऊ शकते. म्हणून त्यांच्या शेतात जाऊन त्यांच्याशी केलेला थेट संवाद तुमच्यासाठी...

सीताफळाचीच लागवड का?

'एनएमके गोल्डन' या जातीच्या सीताफळाची २०११ ला त्यांनी लागवड केली. या जातीच्या सीताफळाचे वैशिष्ट्य म्हणजे मोठ्या प्रमाणात फळ धारण क्षमता आणि फळ तयार झाले तरी देठ सोडत नाही. फळ तोडल्यानंतर चौथ्या दिवशी तयार होते. एक फळ ५०० ते ७०० ग्रॅम भरते. लागवडीनंतर फक्त चार वर्षात फळ लागायला सुरुवात होते. जानवळ हा डोंगरी भाग आहे. येथे उन्हाळ्यात पाण्याची टंचाई आणि तापमान अधिक असते. जानवळचा डोंगर जवळ आहे. त्यामुळे रानटी जनावरे मोठ्या प्रमाणात पिकाची नासाडी करतात. सीताफळाच्या पानाचा उग्रवास असल्यामुळे कोणतेही रानटी जनावर ते खात नाही. अत्यल्प पाणी हवे असलेले हे फळ आहे. पाणी जास्त झाले, तर फळ कमी लागतात. या वर्षी फूल धारण करताना सुरुवातीला पाऊस कमी झाला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात फळे धरली गेली. आता झाड फळांनी लगडले आहेत.

इतर पिकांपेक्षा परवडणारे फळ

२०११ ला सात एकर क्षेत्रात त्यांनी लागवड केली. त्यानंतर आतापर्यंत तीन ते चार सिझन मिळाले. सुरुवातीला तेजी होती म्हणून फार म्हणावा तसा भाव मिळाला नाही. त्यानंतर बाजारपेठेचा अभ्यास झाला. दलालाशिवाय स्वतः बाजारात जाऊ लागले. त्यामुळे देशभरातल्या मार्केटचा अभ्यास झाला. सिताफळाला एकरी दरवर्षी खर्च अधिकाधिक ५० हजार होतो. एकरी उत्पन्न ५ ते १० टन होते. कमीत कमी २५ रुपये किलोचा भाव मिळतो. मागच्या दोन वर्षात या सात एकरमध्ये ४० लाख रुपयांचे सिताफळ विकल्याचे बाळकृष्ण येलाले सांगतात.

आता शासनाचा कृषी विभाग 'विकेल ते पिकेल' या योजनेखाली प्रोत्साहन देत आहे. सीताफळ यासारख्या फळाला पल्प तयार करणाऱ्या कंपन्या हे मोठे मार्केट आहे.

सीताफळ मार्केट

हैद्राबाद, दिल्ली आणि नवी मुंबई (वाशी) हे देशातील मार्केट आहेत. यातील सर्वात मोठे मार्केट नवी मुंबई (वाशी) येथे आहे. अनेक पल्प तयार करणाऱ्या कंपन्या यातील सर्वात मोठे ग्राहक आहे. त्यामुळे चांगल्या जातीचे थोडे जास्त काळ राहणारे सिताफळ कोरडवाहू शेतीत बागायती शेतीचे उत्पन्न काढू शकतात तेही कमी खर्चात... ज्याला रानटी जनावरे खाणार नाहीत पण माणसे आवडीने खातात, ती शेती करा. एक फायद्याच्या शेतीचा हा उत्तम पर्याय असल्याचे श्री. येलाले आत्मविश्वासाने सांगतात.

जिल्हा माहिती अधिकारी, लातूर

खजुराची शेती

गंगापुर तालुक्यात पद्माकर मुळे यांनी गंगामाई कृषी उद्योग स्थापन केला आहे. नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून आदर्श शेती पिकवण्याला त्यांनी महत्त्व दिले आहे. गेल्या तीन वर्षांत वाळवंटात येणारे खजूर दुष्काळग्रस्त औरंगाबाद जिल्ह्यात ११ एकरावर पिकवण्याची किमया त्यांनी केली आहे. विशेष म्हणजे खजूर शेतीत अंतरपीक म्हणून मोसंबीही पिकवून नवा आदर्श शेतकऱ्यांसमोर निर्माण केला आहे. या आगळ्यावेगळ्या फलोत्पादन प्रयोगातून अनेक शेतकऱ्यांनी प्रेरणा घेत ही पीक पद्धती अवलंबली आहे.

संतोष देशमुख

नवीन कृषी तंत्रज्ञान, नवीन पिक पद्धती, अंतरपीक पद्धतीचा अवलंब, पाण्याची बँक व काटकसरीने वापर, लागवड ते विक्री व्यवस्थापन हे श्री. मुळे यांच्या शेती उद्योगाचे वैशिष्ट्य आहे. विकेल ते पिकवण्यावर भर देऊन त्यांनी शेती ही उद्योग म्हणून कशी करावी, याचा वस्तुपाठ प्रयोगशील शेतकऱ्यांसमोर ठेवला आहे.

पद्माकर मुळे

अशी केली लागवड

खजूर पीक वाळवंटी प्रदेशात येणारे पीक आहे. इराण, इराक, शारजा, जॉर्डन आदी देशात सर्वाधिक पिकते. येथून गुजरातच्या कच्छमध्ये याची लागवड झाली. आपल्याकडे ४३ अंशांपर्यंत (यंदाचे वर्ष त्याला अपवाद ठरले) तापमान जाते. उष्णकटिबद्ध विभाग आहे. येथे कापूस, सोयाबीन आणि मका पिकवण्यावरच सर्वाधिक भर असतो. परंतु जे विकेल ते पिकवण्यावर श्री. मुळे यांनी स्वत भर दिला.

२०१८ मध्ये पाण्याचा निचरा होणाऱ्या ११ एकरमध्ये कच्छमधून ३२०० रुपये प्रतिरोप विकत आणून २५ बाय २५ अंतरावर लागवड केली. प्रतिझाड २० ते ३० किलो शेणखत दिले. ठिबकद्वारे गरजेपूर्ते पाणी, रासायनिक खते दिली. तिसऱ्या वर्षी म्हणजे यंदा प्रतिझाडाला ७ ते २५ किलो खजूर लगडले आहेत. प्रथमच ९ टन उत्पादन हाती आले आहे. एकरी २ लाख ७५ हजार रुपये खर्च आला आहे. लागवड खर्च एकदाच करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. ४० ते ५० वर्षे एकरी ३ लाख रुपये हमखास उत्पन्न मिळते. तसेच अंतरपीक म्हणून त्यांनी मोसंबी लागवड केली आहे. त्यामुळे दोन पिकातून उत्पादन निघत असल्याने उत्पन्नही वाढले.

शेतकऱ्यांनी व्यावसायिक शेतीला प्राधान्य द्यावे, यासाठी ते शेतकऱ्यांना प्रोत्साहनही देतात. पिवळ्या खजूरसोबतच श्री. मुळे यांनी लिंबाच्या शेतात नागपुरची संत्रा अंतरपीक म्हणून घेतले आहे. तसेच ड्रॅगन फ्रुटची लागवडही त्यांनी मोठ्या प्रमाणात केली आहे. सेंद्रिय शेती करून विषमुक्त अन्न, फळांचे उत्पादन करण्यावर त्यांनी भर दिला आहे. सोलारद्वारे नैसर्गिक ऊर्जा निर्मिती व वापरासही त्यांनी प्राधान्य दिल्यामुळे पिकांना वेळेत पाणी मिळण्याची व्यवस्था झाली आहे. पाण्याच्या नियोजनासाठी मोठी शेततळी तयार केली आहेत. त्यामुळे वॉटर बँकेतून गरजेनुसार ठिबकद्वारे पिकांना पाणी दिले जाते.

परागीकरण अनिवार्य

खजूर शेती पिकवण्यासाठी नर व मादीची लागवड करून पोलन म्हणजेच परागीकरण करणे अनिवार्य आहे. तरच खजुराचे भरघोस उत्पादन मिळते.

खजुराला वर्षभर मागणी

खजूर खाल्याने मेंदू, हृदय, कंबर या अवयवांना बळ मिळते. ॲनेमिया, त्वचा आणि केस, वंध्यत्व, रक्तदाब कमी करणे, हाडांच्या आरोग्यासाठी, प्रसूती, जास्तीत जास्त पोषणमुल्य असल्याने आहारात त्याचा सर्वत्र वापर केला जातो. अ, ब, क जीवनसत्वे आणि लोह, फायबर, ॲण्टी ऑक्सिडंट्स भरपुर प्रमाणात आहेत. खजुराला वाळून खारीक व प्रक्रिया करून पेंडखजूर तयार होते. स्थानिक ते आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वर्षभर या बहुगुणी खजुराला मागणी असते. त्या तुलनेत उत्पादन होत नसल्याने ओल्या खजुराला ७० ते १०० रुपये प्रतिकिलो, खारीक व पेंड खजुरास ४०० ते ५०० रु प्रतिकिलो दर मिळतो.

सौरऊर्जेतून महावीज निर्मिती

पर्यावरणसंवर्धन हा विषय आता वैश्विक पटलावर प्रकर्षाने आला असल्याने जीवाश्म इंधनाचा वापर कमीतकमी असावा व वैश्विक तापमानवाढीवर नियंत्रण मिळवावे, यासाठी जगभरात अपारंपरिक ऊर्जास्रोतांना आता कमालीचे महत्त्व प्राप्त झाले आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने अपारंपरिक ऊर्जास्रोतांमधून वीजनिर्मिती करण्यावर भर दिला आहे. त्यासाठी ऊर्जा विभागांतर्गत 'महानिर्मिती'ने सौर क्षेत्रात मोठे नियोजन केले आहे. यामुळे महानिर्मितीची सध्याची १८४ मेगावॅट सौर ऊर्जा क्षमता ही नजीकच्या काळात किमान दहापटीने वाढणार आहे. ही वीज तुलनेने स्वस्त असल्याने वीजग्राहकांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

कैलास चिरूटकर

'महानिर्मिती'तर्फे विविध सौर ऊर्जा प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले आहे. खालील विविध प्रकारच्या मॉड्युल्समधून वीजनिर्मिती केली जाणार आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना

राज्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या सोयीनुसार दिवसा विजेचा पुरवठा उपलब्ध व्हावा, या दृष्टिकोनातून राज्यात 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' सुरू करण्यात आली आहे. महानिर्मितीमार्फत प्रभावीपणे ही योजना राबवण्यात येत आहे.

राळेगण सिद्धी व कोळंबी पथदर्शी प्रकल्प (एकूण ४ मेगावॅट) : राळेगण सिद्धी, जि. अहमदनगर व कोळंबी, जि. यवतमाळ येथे २४ ऑगस्ट २०१८ रोजी प्रत्येकी २ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प यशस्वीरीत्या कार्यान्वित करण्यात आले आहेत.

टप्पा एकमध्ये २०० मॅगावॅट निर्मिती : टप्पा एकमध्ये विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व उत्तर महाराष्ट्र येथे प्रत्येकी ५० मेगावॅट याप्रमाणे एकूण २०० मेगावॅट वीजनिर्मितीचे नियोजन करण्यात आले आहे. अमरावती जिल्ह्यातील गव्हाणकुंड येथील १६ मेगावॅट क्षमतेपैकी ३.१२५ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प ११ जानेवारी २०२१ रोजी व उर्वरित १२.८७५ मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प १० फेब्रुवारी २०२१ रोजी कार्यान्वित झाले आहे.

टप्पा दोनमध्ये १७९ मॅगावॅट निर्मिती : टप्पा - २ 'ब'मध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात सौर ऊर्जा प्रकल्प उभारून १७९ मेगावॅट वीज निर्मिती करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. महावितरण कंपनीने १३५० मेगावॅट क्षमतेचे प्रकाशित केलेल्या निविदेत 'महानिर्मिती' कंपनीने त्यांच्या ताब्यात असलेल्या जिल्हानिहाय जमिनीकरिता निविदेमध्ये भाग घेतला आहे. महावितरण कंपनीने महानिर्मिती कंपनीला विविध जिल्ह्यांत १७९ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पाकरिता इरादा पत्र दिले आहे. प्रकल्पाच्या विकासासाठी महानिर्मिती कंपनी EESL यांना जमीन भाडेतत्त्वावर देणार आहे. महानिर्मितीच्या ताब्यातील जमिनीवर प्रकल्पाचे पायाभूत सुविधा व वीज निष्काषण करण्याचे व्यवस्था M/s. EESL यांच्यातर्फे करण्यात येणार आहे. टप्पा - २ 'अ' उत्तर महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्र - 'अ' असे एकूण १०० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प उभारण्यात येणार आहे.

सौर पार्क प्रकल्प

धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा येथे २५० मेगामॅट निर्मिती प्रकल्प उभारण्यात येत आहे. येथे प्रकल्पासाठी ५०४.७१ हेक्टर खासगी जमीन महानिर्मितीच्या ताब्यात असून प्रकल्प उभारणीच्या कामाला वेग आला आहे.

ईपीसीअंतर्गत ६०२ मेगावॅट

ईपीसीतील प्रकल्पांतर्गत ६०२ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. विविध ठिकाणी हे प्रकल्प असून ते कार्यान्वित करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यातील कौडगाव येथे ५० मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. यासाठी महानिर्मितीतर्फे BHEL या कंपनीला प्रकल्प उभारणी व १० वर्ष संचलन व देखभाल करण्याकरिता इरादा पत्र देण्यात आले आहे. त्याचबरोबर प्रकल्पासाठी या कंपनीला जमिनीचा ताबा देण्यात आला असून प्रकल्प विकसित करण्याचे कामही सुरू करण्यात

राळेगण सिद्धी

आले आहे. महानिर्मिती कंपनीने वीज निष्कासन करण्यासाठी महावितरण कंपनीला १०.५७ कोटी रुपये इतकी रक्कम अदा केली आहे. महावितरण कंपनीने वीज निष्कासन करण्यासाठी अतिरिक्त खर्चाची मागणी केली असून ती महानिर्मिती कंपनीने मान्य केली आहे. महानिर्मिती कंपनीने BHEL यांच्या सोबत करारनामा केला आहे. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झाल्यामुळे प्रकल्प उभारणीच्या कामामध्ये विलंब झाला आहे. मात्र आता प्रकल्पाची अंमलबजावणी युद्धपातळीवर सुरू असून डिसेंबर २०२१ पर्यंत तो कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

महानिर्मिती कंपनीने साक्री - १ (२५ मेगावॅट), लातूर (६० मेगावॅट) व ४ औष्णिक विद्युत केंद्रातील जमिनीवरील (५२ मेगावॅट) सौर प्रकल्प ई.पी.सी. पद्धतीने विकसित करण्याकरिता व सोबत ५ वर्ष संचालन व देखभाल करण्याकरिता संबंधित ई.पी.सी. कंत्राटदारांना इरादा पत्र दिले आहे.

यवतमाळ (७५ मेगावॅट), वाशिम - १ (१३० मेगावॅट), वाशिम - २ (४० मेगावॅट) कचराळा (१४५ मेगावॅट) येथील सौर ऊर्जा प्रकल्प असे एकूण ३९० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. महानिर्मितीतर्फे आंतरराष्ट्रीय स्पर्धा निविदा अंतर्गत (ICB) यवतमाळ (७५ मेगावॅट), वाशिम - १ (१३० मेगावॅट), वाशिम - २ (४० मेगावॅट) कचराळा (१४५ मेगावॅट) येथील प्रकल्पांकरिता निविदा प्रकाशित करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. हा प्रकल्प KFW बँक जर्मनी यांच्या नवीन कर्ज योजनेअंतर्गत विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. ३९० मेगावॅट क्षमतेअंतर्गत प्रकाल्पाकरिता KFW बँक यांनी ERM मार्फत पर्यावरणीय आणि सामाजिक परिणाम मूल्यांकन (ESIA) करण्याची प्रक्रिया चालू केली गेली आहे.

८ सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये महानिर्मिती कंपनीच्या १८७ मेगावॅट व ३९० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाकरिता मान्यता देण्यात आली आहे. साक्री - २ येथे २५ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे.

युएमआरईपीपी अंतर्गत १२५० मेगावॅट

अल्ट्रा मेगा नवीकरणीय योग्य ऊर्जा प्रकल्प (युएमआरईपीपी) अंतर्गत १२५० मेगावॅट क्षमेतेचे प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. नवीकरणीय ऊर्जा विभागाच्या (MNRE) धोरणांतर्गत महानिर्मिती व नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन यांच्यात संयुक्त विद्यमाने कंपनी (JVC) स्थापित करून अल्ट्रा मेगा नवीकरणीय ऊर्जा पार्क विकसित करण्याचे नियोजित आहे. महानिर्मिती कंपनीतर्फे स्वारस्य निविदा (EOI) प्रकाशित करण्यात आली आहे. त्यामध्ये संभाव्य खासगी भूसंपत्ती मालक/शेतकरी/सहकारी संस्थांकडून जमीन विक्रीसाठी किंवा दीर्घ मुदतीच्या भाडेतत्त्वावर (२७ वर्षे) देण्यास इच्छुक असलेल्यांकडून प्रस्ताव मागवण्यात आले आहेत, त्यासाठी

१८ जणांकडून प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. जेव्हिसी पद्धतीत अल्ट्रा मेगा नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प स्थापित करण्याचे लक्ष्य ठेवून महानिर्मिती आणि नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन रिन्यूएबल एनर्जी लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार झाला आहे.

नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन रिन्यूएबल एनर्जी लिमिटेड यांच्यासोबत जेव्हिसी स्थापन करण्याची परवानगी मिळवण्यासाठीचा प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्यात आला आहे. त्यास मान्यता प्राप्त झाल्यानंतर महानिर्मिती व नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन रिन्यूएबल एनर्जी लिमिटेड यांच्यात संयुक्त विद्यमाने कंपनी (JVC) स्थापन केली जाईल.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित यांनी संयुक्त विद्यमाने कंपनी स्थापनेचा मंडळ ठराव पारित केला आहे. एनटीपीसी रिन्यूएबल एनर्जी लिमिटेडसह जेव्हीसी कराराची अंमलबजावणी ५०:५० च्या इक्विटी सहभागासह अल्ट्रा मेगा नवीकरणीय ऊर्जा पार्क विकसित करण्यात येणार आहे. नवीन व नवीकरणीय ऊर्जा विभागाच्या धोरणांतर्गत महानिर्मिती व नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन रिन्यूएबल एनर्जी लिमिटेड यांच्यात संयुक्त विद्यमाने कंपनी करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर महानिर्मिती व नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन रिन्यूएबल एनर्जी लिमिटेड यांच्यात संयुक्त विद्यमाने कंपनी स्थापन करण्यात येईल.

तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प

चंद्रपूर येथे इरई धरणावर १०५ मेगावॅट क्षमतेचा अभिनव तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. त्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल, निविदा बनवणे व इतर अनुषंगिक कार्यासाठी सल्लागार नियुक्त करण्यात आले आहेत. येत्या महिनाभरात सविस्तर प्रकल्प अहवाल तयार होणे अपेक्षित आहे.

वीज निष्कासन व्यवस्थेसाठी संयुक्तरीत्या महानिर्मिती व महापारेषण कंपनीतर्फे तांत्रिक सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. महापारेषण कंपनीकडून तांत्रिक व व्यावसायिक अहवाल लवकरच प्राप्त होईल. महानिर्मितीतर्फे ऊर्जा विभागाकडे सदरचा प्रकल्प UMREPP मोड-८ मध्ये समाविष्ट करण्यासाठी केंद्र शासनाचे नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाकडे अग्रेषित केले जाणार आहे. त्याचबरोबर या प्रकल्पासाठी लागणाऱ्या इतर मान्यता मिळवण्याची प्रक्रिया चालू आहे.

वरील नियोजनानुसार सौर ऊर्जा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर महानिर्मितीची सध्याची १८४ मेगावॅट सौर ऊर्जा क्षमता ही नजीकच्या काळात सध्यापेक्षा किमान दहापटीने वाढणार असून ही वीज तुलनेने स्वस्त असल्याने वीजग्राहकांनाही त्यातून मोठा दिलासा मिळणार आहे.

कार्यकारी संचालक (राख व सौर)
महानिर्मिती मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.

रक्तदान श्रेष्ठदान

रक्तदान चळवळीत महाराष्ट्र देशात सदैव आघाडीवर आहे. महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषदेची स्थापना २२ जानेवारी १९९७ रोजी झाली. यानंतरच खऱ्या अर्थाने राज्यात रक्त संकलनाच्या क्रांतीला सुरुवात झाली. गेल्या पंचवीस वर्षात योजनाबद्ध प्रयत्न करून रक्तदानाबाबत महाराष्ट्र राज्याने रक्त संकलनात क्रांती घडवली आहे. केंद्रीय धोरणानुसार 'शंभर टक्के ऐच्छिक रक्तदान' ही संकल्पना निश्चित करण्यात आली होती.

डॉ. शंकर मुगावे

ऐच्छिक रक्तदानाबाबत लोकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती करणे, शंभर टक्के रक्तदान ऐच्छिक स्वरूपात करून घेणे. या ऐच्छिक रक्तदानातून गरजू रुग्णांना सुरक्षित व चांगला रक्त पुरवठा करणे, नेहमीसाठी रक्तपेढीत पुरेसा रक्तसाठा उपलब्ध ठेवण्यासाठी ऐच्छिक रक्तदाते नियमित रक्तदाते बनले पाहिजे. तसेच ऐच्छिक रक्तदाता हा रक्तपेढीसाठी आणि रुग्णांसाठी प्रामुख्याने देवदूत असतो. रक्तदान करणे हे स्वतःचे आरोग्य चांगले राहण्यासाठीही उपयुक्त असते हे जेव्हा लोकांना कळेल तेव्हा ते ऐच्छिक रक्तदान करण्यास स्वतः प्रवृत्त होतील, यात शंका नाही. यामध्ये काही रक्तदाते स्वतःच्या नातेवाइकांसाठी आणि मित्रांसाठी ऐच्छिकरीत्या रक्तदानासाठी प्रवृत्त होताना पाहायला मिळतात. त्यांना नियमित रक्तदाते म्हणून कायम ठेवायचे असेल तर त्यांना आपुलकीने, प्रेमाने आणि सन्मानाने वागवले पाहिजे.

दातव्यं इतीयत दान दीयते नुउपकरणे,
देशे काले पात्रेत तत दान सात्विक स्मृतम

भगवान श्रीकृष्णाने 'गीता' या पवित्र ग्रंथात दान या शब्दाचा अर्थ मोठा आशयपूर्वक सांगितला आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीत दान करण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दान जे उपकाराच्या भावनेने केले जात नाही, योग्य स्थळी-योग्य वेळी केले जाते ते दान खऱ्या अर्थाने सात्विक दान होय. स्वार्थाकडून परमार्थाकडे नेण्याचा एकमेव मार्ग म्हणजे रक्तदान होय. इतर सर्वच दानांमधून देहाचे बाह्य स्वरूप सजवता येते, परंतु एखाद्या कमकुवत देहामध्ये नवचैतन्य निर्माण करणे अथवा त्या देहाचे कार्य पूर्ववत करणे हे कार्य फक्त रक्तदानातूनच करू शकतो हे तितकेच खरे. रक्त हे मानवाला विधात्याने दिलेली नैसर्गिक देणगी आहे. मानवी जीवनातील अनेक दानांपैकी उत्कृष्ट आणि पवित्र कार्य जर कोणते असेल तर त्यातील एक रक्तदान असेल, यात शंका नाही.

करू या रक्तदान...

मानवी रक्तदान ही एक चळवळ म्हणून उभी राहिली पाहिजे. या चळवळीची केवळ शहरातच नव्हे, तर ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात जाणीवजागृती झाली पाहिजे, ही काळाची गरज आहे. मानवी रक्त शुद्ध ठेवून वाढवण्यासाठी सर्वात मुख्य उपाय म्हणजे नियमित व्यायाम-प्राणायाम बरोबरच रक्तदान असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. रक्तदान हे एक परम कर्तव्य आणि सामाजिक बांधिलकी समजून प्रत्येकाने ऐच्छिक रक्तदान करावे. मानवी शरीरातील रक्त हा द्रव पदार्थ अतिशय महत्त्वाचा जीवनप्रवाह आहे. रक्त हे ६० टक्के द्रव पदार्थ आणि ४० टक्के पेशींनी बनलेले आहे. तुमच्या शरीरातील एकूण रक्तापैकी पाच-सहा टक्केच रक्त आपण दान करतो. सर्वसाधारणपणे सुदृढ माणसाच्या शरीरात पाच ते सहा लीटर रक्त असते. मानवाला नियमित हालचालीसाठी तीन लीटर रक्तच लागते, तर तीन लीटर रक्त प्रत्येक सक्षम आणि सुदृढ व्यक्तीच्या शरीरात राखीव असते.

यातूनच व्यक्ती रक्तदान करताना ३५० मिली. रक्तच दान करतो. रक्त हा मानवी शरीरातील परमेश्वरी घटक आहे. एकाच्या रक्तदानातून दोन ते तीन रुग्णांचा जीव वाचवू

पुणे महसूल विभागांतर्गत जिल्ह्याचे कोरोना कालावधीतील रक्तसंकलन

अ.क्र.	जिल्हा	रक्तपेढीची संख्या	जानेवारी ते डिसेंबर २०२० (युनिट्स)	जानेवारी ते जुलै २०२१ रक्तसंकलन (युनिट्स)
१	पुणे	३४	२०४४८८	१३११६५
२	सोलापूर	०९	३५८३३	१९८८१
३	सातारा	१५	१५१५१९	६८१२५
४	सांगली	११	४४६०४	२६१६५
५	कोल्हापूर	१७	६०१९९	३७८८६
एकूण रक्तसंकलन		**८६**	**४९६६४३**	**२८३२२२**

महाराष्ट्रातील विभागवार रक्तसंकलन		
विभाग	**जानेवारी ते डिसेंबर २०१९ चे रक्तसंकलन (युनिट्स)**	**जानेवारी ते डिसेंबर २०२० चे रक्तसंकलन (युनिट्स)**
पुणे	४१३१८४	३९१६९७
मुंबई	३१२०२९	२३१२२६
नाशिक	२१३८९४	१९७९१५
नागपूर	१८५२५२	१५३२२९
ठाणे	१५२७४४	१४३७२२
कोल्हापूर	१३९८३५	१२१३०६
अकोला	१०७३६३	११५४५०
लातूर	९८७७९	१०१९२६
औरंगाबाद	९९२८५	८९३५५
एकूण	**१७२३३६३**	**१५४५८२६**

शकतो. रक्तदानाद्वारे दिलेले रक्त कोणत्याही प्रकारचा थकवा न येता आठ ते चोवीस तासात मानवी शरीर भरून काढते. रक्तदानामुळे मानवाचे बोनम्यारो सक्षम होऊन नवीन रक्त निर्मितीस चालना मिळते आणि यामुळे आपली रोगप्रतिकारशक्ती वाढते. नियमित रक्तदान केल्याने रक्तशुद्धी होण्यास मदत होते. एकंदरीत रक्त गोठण्याचे विकार व आजार सहजासहजी होत नाहीत किंवा या आजारापासून धोका टाळता येऊ शकतो तो केवळ आणि केवळ रक्तदान केल्याने असे वैद्यकीय संशोधनातून समोर आले आहे.

प्रत्येक सुदृढ व्यक्तीला वर्षातून चार वेळेस म्हणजेच तीन महिन्याला एकदा रक्तदान करता येते. यासाठी तुमचे वय १८ ते ६५ वर्षापर्यंत आणि वजन ४५ ते ५० किलोच्या वर आणि रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण १२.५ ग्रॅमच्यावर असावे लागते. रक्तदानापूर्वी रक्तदात्यांची वैद्यकीय तपासणी केली जाते आणि नंतरच योग्यता पाहून रक्त घेतले जाते. रक्तदान केल्याचे आत्मिक समाधान मिळते. तसेच रक्तदात्याला निरोगी आणि सुदृढ राहण्यास मदतच होते.

मानवी रक्ताचे प्रमुख चार गट असतात. त्यात ए, बी, एबी आणि ओ यामध्ये आरएच पॉझिटिव्ह आणि आरएच निगेटिव्ह उपगट असतात. भारतात फक्त पाच टक्के लोक आरएच निगेटिव्ह आहेत. त्यामुळे अशा व्यक्तींनी रक्तदान केल्यास त्यांची नोंद रक्तपेढीत केलेली असते आणि भविष्यात गरज पडेल तेव्हा त्या व्यक्तींना तीन महिन्यानंतर रक्तदान करण्यास बोलावण्यात येऊन पुन्हा रक्तदान करण्याची विनंती केली जाते.

समाज प्रबोधनाची आवश्यकता

भारतात स्त्रियांचा व मुलींचा रक्तदानातील सहभाग केवळ सात टक्केच असल्याचे आढळून आले आहे. कारण त्याच्या आहाराचे योग्य व नियमित नियोजन नसल्यामुळे जास्तीत जास्त स्त्रिया व मुली या ॲनिमिक असल्याचे दिसून आले आहे. रक्त हे शरीराचे मूळ असते. शरीरातील महत्त्वाचे अवयव जसे हृदय, यकृत, स्वादुपिंड, फुफ्फुस, मेंदू यासारख्या सर्व अवयवांचे काम रक्तानेच व्यवस्थित चालते. रक्त हा मानवी जीवनाचा प्राण आहे. रक्त सतत शुद्ध ठेवण्यासाठी वा वाढवण्यासाठी सुदृढ आणि निरोगी व्यक्तीने रक्तदान करणे आवश्यक आहे. गरजू माणसाला रक्त हा जीवनप्रवाह असतो. रक्त पुरवठ्याची सामाजिक गरज जशी वाढत चालली तशी रक्तदात्याची प्रबोधन करण्याची आणि जास्तीत जास्त ऐच्छिक रक्तदान करून घेण्याची आवश्यकता आहे. समाज जागृतीची आणि रक्तदानाविषयी ऐच्छिक रक्तदाते तयार करण्यासाठी ऐच्छिक रक्तदानाबाबत समाज प्रबोधन, प्रचार आणि प्रसार याची आवश्यकता आहे. गेल्या शतकात मोठ्या प्रमाणावर झालेल्या सामाजिक बदलांमुळे अपघाताचे प्रमाण वाढू लागले आहे. तसेच वैद्यकीय शास्त्रातील नेत्रदीपक प्रगतीमुळे अवघड वाटणाऱ्या शस्त्रक्रिया होऊ लागल्या आहेत. त्यामुळे रक्ताची जास्त गरज भासत आहे. त्यातल्या त्यात थालेसेमियाच्या विकारात रक्त तयार करण्याची शारीरिक क्षमताच नष्ट झालेली असते. अशा वेळी सतत त्या रुग्णांना रक्त संक्रमण द्यावे लागते. या विकारात अशा रुग्णांना वारंवार रक्त भरण्याला पर्याय अद्याप सहज होण्याजोगा नाही.

रक्तदाते वाढवणे ही काळाची

भारतात आजमितीस २०१७ च्या आकडेवारीनुसार एकूण २६९० नोंदणीकृत रक्तपेढ्यांतर्गत एक करोड सहा लाख रक्त पिशव्या गोळा झाल्या होत्या. यामध्ये ८५ टक्के रक्त संकलन ऐच्छिक रक्तदान स्वरूपात झाले होते, तर महाराष्ट्रात ३५ जिल्ह्यांतून ३५० रक्तपेढ्यांतर्गत २०१९ मध्ये १७ लाख २३ हजार ३६३ ऐवढे युनिट्स रक्त संकलित झाले. यामध्ये ९७.५४ टक्के रक्त संकलन ऐच्छिक स्वरूपात होते, तर २०२० मध्ये करोना महामारीच्या संकटामुळे १५ लाख ४५ हजार ८२६ ऐवढे युनिट्स रक्त संकलन झाले आहे.

कोरोना संसर्गाचा रक्त संकलनाला फटका बसल्याने १ लाख ७७ हजार ५३७ ऐवढे युनिट्स रक्त संकलन घटले आहे. गेल्या दीड वर्षात म्हणजे कोरोना कालावधीत रक्त संकलनात पुणे महसूल विभागाने आघाडी घेतली असल्याचे दिसून येते. तरीही नवीन रक्तदात्यांसोबतच नियमित रक्तदाते वाढवणे ही काळाची गरज आहे, यासाठी जागरूक नागरिकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

वैद्यकीय समाजसेवा अधिक्षक, बै.जे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे तथा मुख्य समन्वयक (रक्तपेढी), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे.

समृद्ध नाट्यपरंपरा...

१७९ वर्षांचा देदीप्यमान आणि वैभवशाली इतिहास व परंपरा लाभलेली मराठी रंगभूमी आज देशातील सर्वोत्कृष्ट रंगभूमींमधील एक मानली जाते. आधुनिक दृक्श्राव्य कलेतील, जनमानसावर प्रभाव असलेल्या चित्रपट उद्योगाचा प्रारंभ आणि भरभराट महाराष्ट्रात होऊनही नाटक या रंगमंचीय प्रयोगात्मक कलाप्रकाराने महाराष्ट्रातील आपले महत्त्व कायम राखले आहे. पहिल्या मराठी नाट्यप्रयोगाचे स्मरण म्हणून दरवर्षी ५ नोव्हेंबर हा दिवस 'मराठी रंगभूमी दिन' म्हणून साजरा केला जातो.

मीनल जोगळेकर

सन १८४२. कर्नाटकातील करकी या गावची करकीमेळा नावाची एक मंडळी यक्षगानाचा खेळ करण्यासाठी सांगली येथे आली. तो खेळ पाहून सांगलीचे संस्थानिक चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांनी अशाच प्रकारचे खेळ लोकरंजनार्थ आपल्याकडे घडावेत, अशी इच्छा व्यक्त केली. कथा-कविता लिहिण्याचा छंद असलेल्या विष्णुदास भावे यांनी त्यांची ही इच्छा पूर्ण करत १८४३ साली सीतास्वयंवर हे मराठीतील पहिले गद्यपद्यमिश्रित नाटक सादर केले आणि मराठी नाट्यसृष्टीचा श्रीगणेशा केला.

श्री. भावे यांनी १८४३ ते १८५२ या काळात अनेक ठिकाणी आपल्या नाटकांचे खेळ करून रंगभूमीला प्रतिष्ठित केले, नाट्यव्यवसायाची कल्पना रुजवली, प्रेक्षकांची नाट्याभिरुची निर्माण करण्याचा जाणता यत्न केला, राजाश्रयी रंगभूमी लोकाभिमूख करण्याचा विशेष प्रयत्न केला, तिकीट काढून नाटक पाहण्याची सवय लोकांना लावली. म्हणूनच आधुनिक मराठी रंगभूमीचे आणि व्यावसायिक रंगभूमीचे जनक म्हणून देखील विष्णुदास भावे यांना ओळखले जाते. त्यांनी केलेल्या पहिल्या मराठी नाट्यप्रयोगाचे स्मरण म्हणून दरवर्षी ५ नोव्हेंबर हा दिवस 'मराठी रंगभूमी दिन' म्हणून साजरा केला जातो.

लोकमान्यता

सुरुवातीला सांगलीच्या तसेच राज्यातील इतर संस्थानिकांकडून मिळालेले प्रोत्साहन आणि आर्थिक पाठबळ यांच्या बळावर बहरलेल्या नाट्यकलेला पुढे लोकमान्यतेचीही साथ मिळाली आणि अनेक नाटक कंपन्या व्यावसायिक स्तरावर नावारूपाला आल्या आणि स्थिरावल्या. मराठी रंगभूमीची सुरुवात जरी संगीत नाटकांनी झाली असली तरी पद्य नाटके, प्रायोगिक नाटके, बालनाट्य, बोधी नाट्य अशा विविध प्रवाहांनी पुढे ती समृद्ध होत गेली.

महाराष्ट्र हे मराठी भाषक राज्य आणि प्रामुख्याने गोवा, कर्नाटक, गुजरात, मध्य प्रदेश, दिल्ली येथील मराठी भाषिक समूह ते अगदी अमेरिका, इंग्लंड, दुबई, कतार, ऑस्ट्रेलिया इ. परदेशस्थ भारतीय मराठी नाटकांचे प्रेक्षक आहेत. नाटक हा कलाप्रकार मराठी माणसाची जणू ओळख झाला आहे.

शासनमान्यता

१९६० साली संयुक्त महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर महाराष्ट्राला स्व. यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे सुसंस्कृत आणि रसिक नेतृत्व लाभल्यामुळे नाट्यकलेसह राज्यातील सर्वच कलांच्या जतन, संवर्धनाकडे विशेष लक्ष दिले गेले. नाट्यकलेच्या अभिवृद्धीसाठी अनेक उपयुक्त निर्णय घेतले गेले. राज्याच्या सांस्कृतिक कार्य अभिगांतर्गत येणाऱ्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून राज्य नाट्य स्पर्धा, नाट्य शिबिर, रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार, नाट्य संस्थांना अनुदान अशा विविध योजना, उपक्रम नाट्य कलेसाठी आयोजित करण्यात येऊ लागले.

राज्य नाट्यस्पर्धा; सोनेरी पान

मराठी रंगभूमीवरील उदयोन्मुख कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्या कलागुणांमधून व्यक्तिमत्त्व विकास घडवून आणावा, नाट्यकलेचा प्रचार व प्रसार सर्व स्तरांतून व्हावा, राज्यात एक चांगले सांस्कृतिक वातावरण तयार व्हावे, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून राज्य नाट्य स्पर्धा १९५५-५६ पासून सुरू करण्यात आल्या. थोड्याच कालावधीत राज्य नाट्य स्पर्धा, राज्यातील हजारो उदयोन्मुख रंगकर्मींचे सादरीकरणासाठीचे आणि नवनवीन नाटकं बघण्यासाठी आसुसलेल्या रसिकांचे हक्काचे व्यासपीठ म्हणून नावारूपाला आली.

सध्या दरवर्षी मराठी-हौशी, मराठी-व्यावसायिक, हिंदी, संगीत, संस्कृत, बाल व दिव्यांग अशा एकूण सात वेगवेगळ्या

नाट्यस्पर्धांचे आयोजन करण्यात येते. सुमारे दोन हजार नाट्य संस्थांमधील जवळपास ५० हजार रंगकर्मी सुमारे ६ ते ८ महिने राज्य नाट्य स्पर्धामय झालेले असतात. प्रेक्षकांनाही अत्यल्प तिकिटात नवनवीन नाटकं बघायला मिळतात. एक उत्तम सांस्कृतिक वातावरण या स्पर्धेमुळे राज्यात तयार होते. स्पर्धेत सहभागी संस्थांना निर्मिती खर्च, प्रवास, भोजन खर्च आणि मोठ्या रकमांचे पुरस्कार, पदके आणि प्रमाणपत्र देणारी ही देशातीलच नव्हे, तर जगभरातील सातत्यपूर्णता राखून असलेली स्पर्धा आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. दरवर्षी सुमारे १ कोटी ३१ लाख इतक्या मोठ्या रकमेची पारितोषिके राज्य नाट्य स्पर्धेत देण्यात येतात.

या स्पर्धेचा संपन्न अनुभव घेऊन, मराठी व्यावसायिक रंगभूमीसह इतर भाषांमधील रंगभूमी, चित्रपट, दूरचित्रवाणी ते अलीकडच्या वेब अशा विविध माध्यमांमध्ये कित्येक लेखक, दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ आपले स्थान निर्माण करतात, त्यांचा उचित सन्मानही या माध्यामांमधून राखला गेलेला दिसतो आणि राज्य नाट्यस्पर्धेचे हे ऋणानुबंध अगदी अभिमानाने ते मान्यही करतात. महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा, हे भारतीय रंगभूमीच्या इतिहासातील एक सोनेरी पान आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

नाट्य निर्मितीसाठी अनुदान

नाट्य निर्मिती करणाऱ्या संस्थांना नवीन नाटकांच्या निर्मितीसाठी अनुदान देण्याची योजना सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत राबवण्यात येते. नाट्य लेखनाला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने केवळ नवीन नाट्य संहिताच विचारात घेण्यात येतात. नाटकांचे परीक्षण करून नाटकांचा दर्जा निश्चित करण्यासाठी शासनामार्फत नाट्यक्षेत्रातील ज्येष्ठ मान्यवरांची समिती गठित करण्यात आलेली आहे.

अ दर्जा प्राप्त नाटकाला १०० प्रयोगांसाठी प्रत्येक प्रयोगाला रु.२५,०००/- प्रमाणे, तर ब दर्जा प्राप्त नाटकाला ७५ प्रयोगांसाठी प्रत्येक प्रयोगाला रु.२०,०००/- प्रमाणे अनुदान देण्यात येते. तसेच संगीत नाटकाची संहिता नवीन असल्यास रु.३०,०००/- प्रतिप्रयोग अनुदान देण्यात येते. अ दर्जा प्राप्त प्रायोगिक नाटकाला रु.१५,०००/- प्रतिप्रयोग प्रमाणे ५० प्रयोगांना अनुदान देण्यात येते. तसेच ब दर्जा प्राप्त प्रायोगिक नाटकाला रु.१०,०००/- प्रतिप्रयोग याप्रमाणे ३० प्रयोगांना अनुदान देण्यात येते.

रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार

नाट्यक्षेत्रात एकूण उल्लेखनीय कामगिरीसाठी ज्येष्ठ नाट्य कलाकारास २००६ पासून नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार आणि संगीत रंगभूमीची प्रदीर्घ सेवा केलेल्या ज्येष्ठ नाट्य कलाकार मान्यवरास संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कार संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार या पुरस्काराने २००९ पासून गौरवण्यात येत आहे. या दोन्ही पुरस्कारांचे स्वरूप ५ लाख रुपये, सन्मानचिन्ह, मानपत्र असे आहे.

प्रभाकर पणशीकर, विजया मेहता, भालचंद्र पेंढारकर, मधुकर तोरडमल, श्रीमती सुलभा देशपांडे, श्रीमती सुधा करमरकर, आत्माराम भेंडे, अरुण काकडे, श्रीकांत मोघे, रामकृष्ण नायक, लीलाधर कांबळी, बाबा पार्सेकर, जयंत सावरकर, रत्नाकर मतकरी या मान्यवरांना रंगभूमी जीवनगौरव पुरस्काराने तर श्रीमती फैय्याज, प्रसाद सावकार, जयमाला शिलेदार, अरविंद पिळगावकर, रामदास कामत, कीर्ती शिलेदार, रजनी जोशी, चंद्रकांत उर्फ चंदू डेगवेकर, निर्मला गोगटे, विनायक थोरात, मधुवंती दांडेकर या मान्यवरांना संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

नाट्य व बालनाट्य प्रशिक्षण शिबिरे

नाट्यक्षेत्रात काम करण्याची इच्छा असणाऱ्या आणि तसे कलागुण असणाऱ्या राज्यातील इच्छुक बाल तसेच प्रौढांसाठी नाट्यकलेचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देणाऱ्या २०-२० दिवसांच्या निवासी शिबिरांचे आयोजन करण्यात येते. नाट्य व्यवसायातील अनुभवी मान्यवरांकडून या शिबिरांमध्ये प्रशिक्षण देण्यात येते. २० शिबिरार्थींच्या राहण्याचा आणि भोजनाचा

खर्च शासनाकडून केला जातो.

नाट्य संमेलन अनुदान

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई यांच्यामार्फत आयोजित अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनासाठी सन २००६ पासून दरवर्षी २५ लाख रुपये इतके अनुदान देण्यात येत होते, त्यात दुपटीने वाढ करून २०१८-१९ वर्षापासून दरवर्षी ५० लाख रुपये इतके अनुदान देण्यात येत आहे.

साहित्यिक, कलावंतांना मानधन

सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने १९५४-५५ पासून वृद्ध मान्यवर कलाकार मानधन योजनेंतर्गत साहित्य व कला या क्षेत्रात ज्यांनी मोलाची भर घातली आहे. तसेच किमान १५ ते २० वर्षे इतक्या प्रदीर्घ काळासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे, अशा सुमारे ३० हजार साहित्यिक व कलाकारांना तहहयात दरमहा रु. ३१५०, रु. २७००, व रु. २२५० अशा तीन श्रेणींमध्ये मानधन देण्यात येते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसाला हे मानधन देण्यात येते. नाट्यक्षेत्रातील अनेक पात्र कलाकार या योजनेचा लाभ घेत आहेत.

कोरोनारूपी मध्यांतर

कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर, संपूर्ण जगभरात सार्वजनिक वावरावर, कार्यक्रमांवर अनेक बंधने आली. देशात आणि राज्यातही चित्रपट, नाट्य आणि इतर सांस्कृतिक घटक यांच्या सादरीकरणावर अकस्मात बंधने आली. अशा कठीण काळातही नाट्यसृष्टीने गरजू कलावंत आणि पडद्यामागील तंत्रज्ञ, कामगार यांना मदतीचा हात दिला. लॉकडाऊननंतर ५० टक्के क्षमतेसह सुरू झालेल्या नाट्यप्रयोगांना रसिकांनीही चांगला प्रतिसाद दिला. शासनानेही नाट्यगृह भाडे कपात करत मदतीचा हात पुढे केला.

कोरोना पार्श्वभूमीवर अर्थसाहाय्य

लॉकडाऊन शिथिल करण्यात आल्यानंतरही सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, नाट्यगृहे, चित्रपटगृहे यांच्यावर बंदी असल्याने केवळ कलेवर उपजीविका असणाऱ्या प्रयोगात्मक कला क्षेत्रातील कलाकारांची झालेली आर्थिक कुचंबणा लक्षात घेता, त्यांना आर्थिक साहाय्य करण्याचा निर्णय अलीकडेच राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला असून, राज्यातील प्रयोगात्मक कलांवर उदरनिर्वाह असलेल्या एकल कलावंतांना रुपये ५ हजार प्रतिकलाकार प्रमाणे व प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रातील पात्र संस्थांना आर्थिक साह्य देण्यात येणार आहे. यात पात्र रंगभूमी कलाकार व नाट्यनिर्मिती संस्थांचाही समावेश असल्याने नाट्यक्षेत्राला मोठा दिलासा मिळणार आहे.

कोविड-१९ : बंधने शिथिल

कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर, राज्यातील चित्रपट, नाट्य आणि इतर सांस्कृतिक घटक यांच्या सादरीकरणावर कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे पुन्हा एकदा घालण्यात आलेली बंधने राज्य शासनाने २२ ऑक्टोबर २०२१ पासून दूर केली आहेत. सांस्कृतिक कार्य विभागाने याविषयी मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून, नाट्य आणि सांस्कृतिक क्षेत्र सांस्कृतिक क्षेत्र पुन्हा एकदा बहरू लागले आहे.

परंपरा वाहत राहील...

१७९ वर्षांचा देदीप्यमान आणि वैभवशाली इतिहास व परंपरा लाभलेली मराठी रंगभूमी आज देशातील सर्वोत्कृष्ट रंगभूमींमधील एक मानली जाते. आधुनिक दृकश्राव्य कलेतील, जनमानसावर प्रभाव असलेल्या चित्रपट उद्योगाचा प्रारंभ आणि भरभराट महाराष्ट्रात होऊनही नाटक या रंगमंचीय प्रयोगात्मक कलाप्रकाराने महाराष्ट्रातील आपले महत्त्व कायम राखले आहे. नाटक ही जिवंत कला सादर करण्यासाठी रंगकर्मी आणि ती बघण्यासाठी रसिक प्रेक्षक आसुसलेला आहे. कोरोनाच्या या अचानक आलेल्या आणि दीर्घकाळ चाललेल्या मध्यांतरानंतर नाट्यसृष्टीची ही देदीप्यमान आणि वैभवशाली वाटचाल पूर्वीप्रमाणेच सुरू राहील, हीच या रंगभूमी दिनी शुभेच्छा.

सह संचालक, सांस्कृतिक कार्य

जिद्द, अभ्यास आणि सचोटी

लोकसेवा आणि त्या माध्यमातून देशसेवा करण्याची संधी लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून मिळालेल्या पदांतून साकारता येते. अखिल भारतीय असलेल्या या पदांकडे महाराष्ट्रीय तरुण अधिक सजगतेने आणि जागरूकतेने बघू लागले आहेत. अभ्यास, सचोटी आणि सातत्य यामुळे या पदांवर गवसणी घातल आहेत. जिद्द आणि अभ्यासातील सातत्य ही या परीक्षेत यश मिळवण्याची गुरुकिल्ली असल्याचे ही परीक्षा उत्तीर्ण झालेल्या परीक्षार्थींनी सांगितले.

अतुल गुणवंतराव पांडे

केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा परीक्षा ही देशातील एक अत्यंत प्रतिष्ठित व काठिण्य पातळी असलेली स्पर्धा परीक्षा मानली जाते. या सेवेच्या माध्यमातून अत्यंत महत्त्वाच्या पदावर तर काम करायला मिळतेच, पण त्याचबरोबर लोकसेवेची संधीही उपलब्ध होते. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या यंदा २४ सप्टेंबरला जाहीर झालेल्या नागरी सेवा परीक्षेत देशातील ७६१ परीक्षार्थ्यांची निवड ही विविध केंद्रीय सेवांसाठी झाली आहे. यात राज्यातील सुमारे ५४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. राज्यातील यशस्वितांपैकी यादीत पहिल्या शंभरात तिघांचा समावेश आहे. नागरी सेवेत राज्यातील परीक्षांर्थींचे पुढे पडत असलेले पाऊल नक्कीच उत्साहवर्धक आहे.

नागरी सेवेसाठी पूर्व, मुख्य आणि मुलाखत हे तीन टप्पे पार करावे लागतात. फ्रान्सच्या नागरी सेवेनंतर आपल्या देशातील नागरी सेवा परीक्षेचा क्रमांक लागतो, असे म्हणतात. यंदाच्या निकालात पहिल्या शंभरात मृणाली जोशी राज्यात प्रथम क्रमांकाने, तर देशात ३६ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत, तर विनायक नरवडे हे देशात ३७ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.

पूजा कदम यांनी दृष्टिदोषावर मात करत ५७७ वी रँक प्राप्त केली आहे, तर २१ वर्षीय नितीशा जगताप पहिल्याच प्रयत्नात नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण झाली आहे. काही वर्षांपूर्वी नागरी सेवेत महाराष्ट्राचे प्रमाण हे फार कमी होते. मात्र आता हे प्रमाण वाढू लागले आहे. यंदाच्या निकालात राज्यातील विविध शासकीय प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांमधून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे. या प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये मुंबईची राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC), पुणे येथील छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) या संस्थांचा प्रामुख्याने समावेश आहे.

शुभम कुमार देशात पहिला

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेत यंदा बिहारच्या शुभम कुमारने पहिला क्रमांक पटकावला. या परीक्षेमध्ये यंदा ७६१ उमेदवार यशस्वी झाले आहेत. भोपाळच्या जागृती अवस्थीने दुसरा, तर अंकिता जैन यांनी दुसरा क्रमांक पटकावला आहे. मुलींमध्ये जागृती देशात पहिला क्रमांकावर आहे.

मृणाली जोशी राज्यात प्रथम

राज्यातून प्रथम क्रमांकाने यंदा पुणे येथील मृणाली जोशी यांनी अव्वल क्रमांक पटकावला. देशपातळीवर त्यांना ३६ वी रँक (क्रमांक) मिळाला आहे, तर विनायक नरवडे यांनी दुसरा क्रमांक पटकावला. देशभरात विनायक नरवडे यांचा रँक (क्रमांक) हा ३७ वा आहे.

ग्रामीण भागातील मुलांचे यशाचे प्रमाण लक्षणीय

एके काळी गावाकडे स्पर्धा परीक्षेची फारशी जागरूकता नव्हती. मात्र, आता विविध माध्यमातून जागरूकता निर्माण झाली असून विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांकडे वळले आहेत. कधी काळी गावाकडे जिल्हाधिकाऱ्याची गाडी आली की, सर्वांना अप्रूप वाटायचे... पांढरी गाडी, पोलीस शिपाई...

अंबर दिवा... हा रुबाब वेगळाच असायचा... ही भुरळ काहींना पडली तर अनेकांनी या स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून लोकसेवेची सर्वाधिक संधी मिळते व काहीतरी विधायक करता येते म्हणून ते या परीक्षेकडे वळले. यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी या तालुक्याच्या ठिकाणच्या दर्शन दुगड यांनी १३८ या रँकने यश प्राप्त केले

मार्गदर्शन आवश्यक, मात्र पूर्णवेळ कोचिंगची गरज नाही..

माझे बी.ए. अर्थशास्त्रात झाले आहे. पदवीनंतर परीक्षेची तयारी सुरुवात केली. पुण्यात ज्ञानप्रबोधिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्रात अभ्यासाला सुरुवात केली. पहिल्या प्रयत्नात पूर्व परीक्षाच उत्तीर्ण होऊ शकले नाही. मात्र, त्यानंतर खचून न जाता पहिल्या प्रयत्नातील चुका सुधारून नियोजनबद्ध अभ्यास करून तसेच कोविडचा काळ सत्कारणी लावून फायदा करून घेतला. या परीक्षेचा अभ्यासक्रम व आवाका पाहता प्राथमिक मार्गदर्शन या परीक्षेसाठी आवश्यक आहे. इंटरनेटचा योग्य वापर करून घेतल्यास खूप फायदा होईल. अनेक प्रकारचे साहित्य हे इंटरनेटवर अवश्य आहे. मार्गदर्शन आवश्यक आहे, मात्र पूर्णवेळ प्रशिक्षणाची गरज नाही. ज्या भाषेतून परीक्षा द्यायची, त्यावर पूर्ण प्रभुत्व असणे आवश्यक आहे.

- मृणाली जोशी (रँक ३६)

'सेल्फ स्टडी' महत्त्वपूर्ण

अमेरिकेत नोकरी सोडून या परीक्षेची तयारी केली. अमेरिकेत असताना नोकरी सांभाळून या परीक्षेची सात तास तयारी केली. त्यानंतर परीक्षेसाठी भारतात आल्यानंतर पहिल्या प्रयत्नासाठी दररोज बारा तास अभ्यास करायचो. पूर्व परीक्षा उत्तीर्ण झालो. मात्र मुख्य परीक्षेत यश आले नाही. त्यामुळे दुसरी व शेवटची संधी असे स्वतःला बजावून सर्वंकष तयारी केली. पंधरा ते सोळा तास दररोज अभ्यास केला. या परीक्षेसाठी चांगले मार्दर्शन मिळाले तर उत्तमच. मात्र स्वअध्ययन हा घटक महत्त्वाचा आहे. माझ्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी कुटुंबीयाचा पूर्ण पाठिंबा होता. परदेशातील मोठ्या पदावर नोकरी सोडली तरी लोक काय म्हणतील याचा विचार न करता परीक्षेची तयारी करत यश संपादन केले.

- विनायक नरवडे (रँक ३७)

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी न्यूनगंड बाळगू नये..

कॉम्प्युटर सायन्स या विषयात इंजिनिअरिंग केले. मात्र, मानववंशशास्त्र (ॲन्थ्रॉपालॉजी) हा विषय आवडीचा असल्यामुळे हा विषय मुख्य परीक्षेसाठी घेतला. पदवीचा विषय नसल्यामुळे या विषयाच्या तयारीसाठी दिल्लीत राहून प्रशिक्षण घेत विषयाची ओळख करून घेतली. मात्र प्रत्येकाने दिल्लीत जायची गरज नाही. मुलाखतीमध्ये नकारात्मकता दिसणार नाही, याची काळजी घेतली. जेवढे सराव मुलाखती (मॉक इंटरव्ह्यू) देता येतील तेवढे दिले. युपीएससी परीक्षेच्या अभ्यासाचा ताण न घेता त्याचा आनंद घेत अभ्यास करणे गरजेचे आहे. या परीक्षांमध्ये अनिश्चितता खूप जास्त आहे. त्यामुळे तुमच्याकडे 'प्लॅन बी' तयार असणे गरजेचे आहे. युपीएससी परीक्षा द्यायचा निर्णय एका दिवसात घेऊ नका. अत्यंत विचारपूर्वक निर्णय घ्या. माहिती तंत्रज्ञानाचा काही वर्षांपूर्वी ग्रामीण भागात अभाव होता. मात्र आता ग्रामीण भागात तंत्रज्ञानाच्या व विविध सोशल मीडियाच्या माध्यमातून स्टडी मटेरिअल उपलब्ध होऊ शकले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कुठलाही न्यूनगंड न बाळगता परीक्षेची तयारी करणे गरजेचे आहे.

- प्रतीक धुमाळ (रँक १८३)

राज्यातील पहिल्या शंभरात आलेले विद्यार्थी

नाव	देशपातळीवरील क्रमांक (रँक)
मृणाली जोशी	रँक ३६
विनायक नरवडे	रँक ३७
विनायक महामुनी	९५

आहे, तर मूळच्या लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील असलेल्या पूजा कदम यांनी ५७७ वी रँक प्राप्त केली आहे. ही काही प्रातिनिधिक यशस्वितांची नावे असली राज्यातील अनेक ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या नागरी सेवा परीक्षेत यश संपादन केले आहे.

यशात शासकीय प्रशिक्षण संस्थांचा मोलाचा वाटा

राज्यात विविध शासकीय संस्थांच्या माध्यमातून युपीएससीच्या तयारीसाठी परीक्षार्थींना प्रशिक्षण दिले जाते. यात मुंबईची राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (एसआयएसी), पुणे येथील छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) या संस्थेत प्रशिक्षण घेऊन अनेक विद्यार्थ्यी यशस्वी झाले आहेत.

पुणे येथील छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या संस्थेतून प्रशिक्षण घेतलेले २२ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. अहमदनगर ते नांदेडपर्यंतच्या व ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या अनेक यशस्वितांनी या संस्थेत प्रशिक्षण घेतले आहे.

मुंबईतील राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेने (एसआयएसी) यंदाच्या नागरी सेवा परीक्षेत लक्षणीय यश मिळवले आहे. संस्थेचे एकूण १५ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. त्यात राकेश अकोलकर, पार्थ कश्यप, विनायक महामुनी, देवव्रत मेश्राम, प्रणव ठाकरे, विनायक नरवडे, स्नेहल ढोके, अनिल म्हस्के, गौरव साळुंखे, रणजित यादव, सायली म्हेत्रे, परमानंद दराडे, सुहास गाडे आदी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. नागरी सेवेसाठी प्रशिक्षण देणारी एसआयएसी ही राज्यातील एक आघाडीची संस्था आहे. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसजवळ ही संस्था आहे. आतापर्यंत अनेक नामवंत व कर्तृत्ववान अधिकारी या संस्थेने राज्याला व देशाला दिले आहेत. या संस्थेविषयीची माहिती https://www.siac.org.in/index.html या संकेतस्थळावर मिळेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण

यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेले गुणवंत महाराष्ट्राचे असतील किंवा अन्य कुठल्याही राज्यातले, पण या सर्वांनी देशाला आपला परिवार मानून प्रशासनात करिअर करायचे ठरवले आहे. आपली कुठेही नियुक्ती होवो पण भ्रष्टाचाराचा काळोख दूर करण्याचे आव्हान आपल्याला पेलावे लागणार आहे, राज्यात किंवा देशात कुठेही गेलात तरी सर्वोत्तम काम करून आपापल्या राज्याचेच नव्हे, तर देशाचे नावही मोठे करा. आपल्या यशात मोठा वाटा असलेल्या आईवडील आणि गुरूंना कधीही विसरू नका, अशा शब्दांत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

यूपीएससी परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे. सोबत परिवहन मंत्री ॲड. अनिल परब व पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वर्षा येथील प्रांगणात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या २०२० मधील परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. खुद्द मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव झाल्याबद्दल गुणवंतांनी आपण भारावून गेलो असून पुढील जबाबदारीची प्रेरणा मिळाल्याच्या भावना व्यक्त केल्या. संपूर्ण भारतातून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवलेल्या बिहारच्या शुभम कुमार, तिसरा क्रमांक मिळवलेल्या आणि सद्या मुंबईत नियुक्त असलेल्या अंकिता जैन, चौथा क्रमांक मिळवलेल्या यश जलुका, चौदावा क्रमांक मिळवलेल्या मुंबई स्थित करिश्मा नायर, राज्यात प्रथम क्रमांक मिळवलेल्या मृणाली जोशी, या परीक्षेत ३७ वा आणि राज्यात दुसरा क्रमांक मिळवलेल्या विनायक नरवडे, ४९ वा क्रमांक मिळवलेल्या मुंबईतील रजत उभयकर, ९५ वा क्रमांक मिळवलेल्या लातूरच्या विनायक महामुनी यांनी प्रातिनिधीक मनोगत व्यक्त केले.

या परीक्षेसाठी सारथीने मराठा, कुणबी, कुणबी- मराठा, मराठा-कुणबी विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या तयारीकरिता विद्यावेतन देऊन दिल्ली व पुणे येथील नामांकित प्रशिक्षण संस्थेत नि:शुल्क प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली होती. युपीएससीच्या मुलाखतीच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने वैयक्तिक स्वरूपात तज्ज्ञांचे मार्गदर्शन देण्यात आले.

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास अर्थात सारथी ही संस्था लक्षितगटाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी काम करणारी संस्था आहे. त्यातील उमेदवांराचे स्पर्धात्मक परीक्षेत यश वाढवून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न सारथीकडून केले जातात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी) व राज्य शासनाच्या मदतीने देण्यात आलेल्या प्रशिक्षणातून अनुसूचित जातीतील ९ विद्यार्थ्यांनी युपीएससी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. बार्टीमार्फत दरवर्षी राज्यातील निवडक विद्यार्थ्यांना युपीएससी परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी दिल्ली येथे प्रायोजकत्व देण्यात येते. मागील काही कालावधीत कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावामुळे या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी व मुलाखतीसाठी ऑनलाईन प्रशिक्षण व इतर मदत करण्यात आली.

संस्थेच्या वतीने यूपीएससी नागरी सेवा परीक्षेच्या पूर्वतयारीचे प्रशिक्षण देण्यात येते. या संस्थेच्या वतीने प्रशिक्षण प्राप्त केलेल्या नऊ विद्यार्थ्यांनी यूपीएससी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. यामध्ये सुहास गाडे (रँक-३४९), आदित्य जीवने (रँक-३९९), शरण कांबळे (रँक-५४२), अजिंक्य विद्यागर (रँक-६१७), हेतल पगारे (रँक-६३०), देवव्रत मेश्राम (रँक-७१३), स्वप्नील निसर्गन (रँक-७१४), शुभम भैसारे (रँक-७२७) आणि पीयुष मडके (रँक-७३२) या भावी अधिकाऱ्यांचा समावेश आहे. बार्टीने व्यक्तिमत्त्व चाचणी परीक्षेसाठी पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने केंद्रीय सेवेतील उच्चपदस्थ अधिकारी व विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी मार्गदर्शन उपलब्ध करून दिले. बार्टी संस्था यु-ट्यूबद्वारे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण देत आहे.

राज्यातच तयारी करत यशाला गवसणी

राज्यात अव्वल क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या मृणाली जोशी व दुसऱ्या व देशात ३७ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या नरवडे यांनी आपल्या घरी राहूनच या परीक्षेची तयारी करत घवघवीत यश संपादन केले आहे.

अनेक विद्यार्थ्यांचा कल हा दिल्लीत जाऊन परीक्षेची तयारी करायचा असायचा. मात्र, आता राज्यातील विद्यार्थी या परीक्षेची तयारी मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद येथून करून घवघवीत यश संपादन करत आहेत. यंदाही अनेकांनी दिल्लीत न जाता राज्यात राहूनच तयारी करत यश संपादन केले.

जेवढे लवकर यश, तेवढे पद मोठे

युपीएससीच्या नागरी सेवा परीक्षेत जितक्या लवकर उत्तीर्ण झालात तितकी मोठ्या पदावर पोहोचण्याची संधी ही अधिक प्रमाणावर असते. त्यामुळे कमी वयात मोठ्या पदावर पोहोचण्याची संधीही उपलब्ध होऊ शकते. परीक्षेसाठी पात्र ठरल्यानंतर पहिल्यातच प्रयत्नात वयाच्या २१/२२ व्या वर्षी मिळालेले यश हे केंद्रीय कॅबिनेट सचिव या भारतीय प्रशासकीय सेवेतील सर्वोच्च पदावर तर भारतीय विदेश सेवेतील पद हे परराष्ट्र सचिव या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचू शकते. त्यामुळे शक्य तेवढ्या लवकर या परीक्षेची तयारी करून यश मिळवल्यास पुढे फायदेशीर ठरते.

राज्याचा अर्थसंकल्प : माझ्या मतदारसंघाच्या संदर्भात...

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे विविध प्रबोधनात्मक उपक्रम आयोजित केले जातात. संसदीय लोकशाही अधिक मजबूत व्हावी आणि विविध समाजघटकांचा त्यातील सहभाग वाढावा, या दृष्टीने अशा उपक्रमांचे विशेष महत्त्व आहे. याच मालिकेत ५ आणि ६ ऑक्टोबर २०२१ रोजी दोन्ही सभागृहांच्या सन्माननीय सदस्यांसाठी 'राज्याचा अर्थसंकल्प – माझ्या मतदारसंघाच्या संदर्भात...' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचा थोडक्यात आढावा..

निलेश मदाने

या उपक्रमाची आखणी आणि अंमलबजावणी विधान परिषदेचे सभापती रामराजे नाईक-निंबाळकर, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे मानद सल्लागार हेमंत टकले, प्रधान सचिव राजेंद्र भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यशाळेत माजी विधानसभा अध्यक्ष अरुण गुजराथी यांनी अर्थसंकल्पाची प्रक्रिया, विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय प्रकाशने समजावून घेताना..., जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी अर्थसंकल्पातून होणारी विकासकामे त्यांचे नियोजन आणि पाठपुरावा, उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेत सन्माननीय सदस्यांचा सहभाग, संसदीय कार्य मंत्री ॲड. अनिल परब यांनी विधिमंडळ सदस्यांचा स्थानिक विकासनिधी व त्याचा सुनियोजित वापर अशा विषयांची मांडणी केली. पहिल्या दिवशीच्या सत्राचे अध्यक्षस्थान गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी, तर दुसऱ्या दिवशीच्या सत्राचे अध्यक्षस्थान विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी भूषवले.

अर्थसंकल्प आणि त्यातील आकडेवारी समजणे क्लिष्ट, गुंतागुंतीचे असल्याने या संदर्भात नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यांसाठी कार्यशाळा अथवा मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात यावे जेणेकरून आम्हांला अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत सहभाग घेता येईल. अर्थसंकल्पातील तरतुदी आणि आमच्या मतदारसंघातील विकास योजना यांचा सुयोग्य मेळ साधता येईल, अशी मागणी मा.पीठासीन अधिकारी म्हणून आमच्याकडे नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यांकडून वारंवार करण्यात येत असते. त्या दृष्टीने या दोन दिवसीय कार्यशाळेची आखणी व विषयांची निवड करण्यात आली असे सभापती रामराजे नाईक-निंबाळकर यांनी या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी सांगितले.

अर्थसंकल्प ही ठिपक्यांची रांगोळी असून ठिपके जोडल्यानंतर जसे रांगोळीचे सौंदर्य खुलते त्याचप्रमाणे नकाशावरील महाराष्ट्रातील मतदारसंघाचे ठिपके विकासाने जोडले जावेत, अशी अपेक्षा मुख्यमंत्री महोदयांनी कार्यशाळेचे उद्घाटन करताना व्यक्त केली. सभागृहाचा वेळ वाया जाता कामा नये, चर्चे तून प्रश्न सुटावेत, सभागृहात बोलायची संधी मिळाली आहे त्याचे सोने करा, असे मार्गदर्शनही त्यांनी केले.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे दोन्ही सभागृहांच्या सन्माननीय सदस्यांसाठी आयोजित 'राज्याचा अर्थसंकल्प–माझ्या मतदारसंघाच्या संदर्भात...' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित दोन दिवसीय कार्यशाळेत बोलताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे.

अर्थसंकल्पाची प्रक्रिया समजणे आवश्यक

सन्माननीय सदस्यांनी राज्याच्या अर्थसंकल्पाबरोबरच केंद्राच्या अर्थसंकल्पाचाही अभ्यास करणे आवश्यक आहे. अनेक योजनांसाठी केंद्राकडून निधी येत असतो, ज्याद्वारे मतदारसंघातील विकासयोजना राबवल्या जाऊ शकतात. एकीकडे जनतेची सेवा आणि दुसरीकडे मतदारसंघाचा विकास अशा दोन्ही आघाड्यांवर सन्माननीय सदस्यांना काम करावे लागते, त्यासाठी अर्थसंकल्पाची प्रक्रिया समजून घेणे आवश्यक

आहे. मतदारसंघासाठी निधी आणताना अर्थसंकल्पावरील चर्चेत सहभाग घेत महत्त्वाचे मुद्दे मांडून अर्थमंत्र्यांचे लक्ष वेधून घेणे महत्त्वाचे ठरते, असे माजी विधानसभा अध्यक्ष अरुण गुजराथी यांनी सांगितले.

अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा अभ्यास

अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा अभ्यास अर्थसंकल्प समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. राज्याचा आर्थिक पाहणी अहवाल ज्याचे संकलन आणि प्रकाशन अर्थ व सांख्यिकी विभागाकडून होते, वित्तमंत्री यांचे भाषण भाग-१ व भाग-२, गुलाबी पुस्तक-संक्षिप्त अर्थसंकल्प, हिरवे पुस्तक-वार्षिक विवरणपत्र, पांढरे पुस्तक-अर्थसंकल्पीय अंदाज इ. प्रकाशने बारकाईने अभ्यासणे गरजेचे आहे. कार्यक्रम अंदाजपत्रक हे अर्थसंकल्प विभागवार चर्चे साठी उपयुक्त ठरते, असे विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

अभ्यास आणि नियोजन आवश्यक

केंद्रीय अर्थसंकल्पानंतर राज्याचा अर्थसंकल्प सादर होतो. केंद्राच्या योजना साधारणपणे कोणत्या आहेत, त्याची माहिती केंद्रीय अर्थसंकल्पातून आपल्याला कळते. राज्याच्या अर्थसंकल्पासंदर्भात सप्टेंबरपासून माहिती आणि आकडेवारीचे संकलन सुरू होते. मतदारसंघातील कोणत्या कामांसाठी कोणत्या लेखाशीर्षामधून निधी उपलब्ध करून घ्यायचा आहे, याचा अभ्यास आणि नियोजन सदस्यांनी अगोदरपासूनच करणे आवश्यक असते. लोकोपयोगी कामे आणि विकास योजनांसाठी पाठपुरावा अत्यंत महत्त्वाचा आहे. २५/१५ चे लेखाशीर्ष आता लोकोपयोगी कामांचे लेखाशीर्ष झाले आहे, जे पूर्वी फारसे कोणाला माहीत नव्हते, वापरातही नव्हते, असे जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी सांगितले.

अर्थसंकल्पावरील चर्चेत सहभाग महत्त्वाचा

अर्थसंकल्पावरील चर्चेत सन्माननीय सदस्यांचा सहभाग हा महत्त्वाचा आहे. जनताजनार्दनाने आपल्यावर व्यक्त केलेल्या विश्वासाचा परतावा देण्याचे पवित्र कार्य विधानमंडळाच्या माध्यमातून होते. अर्थसंकल्प आणि त्यावरील चर्चा हे त्याचे महत्त्वाचे साधन आहे. चर्चेत सहभाग घेऊन वित्तमंत्र्यांकडून आपल्या जिल्ह्याला, मतदार संघाला काय मिळवले, याचे आपल्याला समाधान मिळते. आपल्या मतदारसंघापुरतेच मर्यादित न राहता सदस्यांनी महाराष्ट्राचा प्रतिनिधी आहे, असे समजून अर्थसंकल्पावरील चर्चेत सहभाग घेतल्यास त्यांना जे अर्थसंकल्पातून हवे आहे ते पदरात पाडून घेता येते. आपला जाहीरनामा तयार करताना जे करणे शक्य आहे, तेच वचन आपण दिले पाहिजे, असे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी सांगितले.

नियोजन आणि पाठपुरावा

लोकप्रतिनिधींनी आपल्या स्थानिक निधीचा वापर करताना लोकांसाठी आपण काय केले याचा लेखाजोखा द्यावा लागतो, यासाठी निधीचे नियोजन करणे फार महत्त्वाचे आहे. अर्थसंकल्प माझ्या मतदारसंघासाठी कसा आहे, यातून आपल्याला किती निधी मिळणार आहे व तो कोणकोणत्या कामासाठी वापरावा याचे नियोजन केल्यास सदस्यांना मतदारसंघातील कामांचा अंदाज घेता येतो. डीपीडीसीच्या बैठकीस जाताना पूर्वतयारी आवश्यक आहे. मतदारसंघासाठी निधी आणताना नियोजन आणि पाठपुरावा या दोन बाबी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. आपल्या हक्काच्या स्थानिक आमदार विकासनिधीतून छोट्या कामांना प्राधान्य दिले पाहिजे. ज्यायोगे जास्तीत जास्त लोकांपर्यंत आपल्याला पोहोचता येते, असे संसदीय कार्यमंत्री ॲड. अनिल परब यांनी सांगितले.

अधिकतम सदस्यांनी चर्चेत सहभाग घ्यावा

अर्थसंकल्पावरील चर्चेसाठी प्रत्येक पक्षाला वेळ वाटून दिलेला असतो त्यामुळे सदस्यांनी आपापल्या पक्षाचे प्रतोद अथवा गटनेते यांच्याशी विचारविनिमय करणे आवश्यक आहे. अधिकाधिक सदस्यांना चर्चेत सहभाग घेता यावा, असाच पीठासीन अधिकारी यांचा प्रयत्न असतो. राज्याच्या अर्थसंकल्पापूर्वी केंद्राचा अर्थसंकल्प सादर होतो तो वाचायला हवा, त्यामधून राज्याला काय मिळाले व या मिळालेल्या निधीतून आपण मतदारसंघाला काय देऊ शकतो, हे कळते. या अर्थसंकल्पावरील कार्यशाळेप्रमाणे संसदीय आयुधांवरदेखील कार्यशाळा आयोजित करण्याचा आमचा मानस आहे, असे विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले.

सदस्यांचा सक्रिय सहभाग

कार्यशाळेतील प्रत्येक सत्रात व्याख्यानानंतर सदस्यांना प्रश्न विचारण्यासाठी वेळ राखून ठेवण्यात आली होती. या वेळी अनेक सदस्यांनी या संधीचा लाभ घेत विविध प्रश्न वक्त्यांना विचारून आपला सक्रिय सहभाग या कार्यशाळेत नोंदवला. कार्यशाळेचे दोन्ही दिवस सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला लोकप्रतिनिधींचा उत्साह आणि सहभाग प्रकर्षाने जाणवला. यामिनी जाधव, गिता जैन, श्वेता महाले, मुक्ता टिळक, प्रतिभा धानोरकर आदी महिला सदस्यांनी चर्चा आणि प्रश्नोत्तरात सहभाग घेतला. अर्थसंकल्पासारखा महत्त्वाचा परंतु क्लिष्ट विषय कार्यशाळेतील सत्रांमुळे समजावून घेण्यास खूपच मदत झाल्याची भावना सर्व सदस्यांनी व्यक्त केली.

संचालक, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

करू या साजरे

पर्यावरणस्नेही सण

हल्ली अनेक सणावारांना, लग्न समारंभांसारख्या विविध कार्यक्रमांना आतषबाजी करून जल्लोष केला जातो. दिवाळी म्हटले की फराळाइतकेच फटाक्यांना महत्त्व दिले जाते.. हे वर्षानुवर्षांचे समीकरण. पण अलीकडे पूर्वीसारखे फटाके उडवले जात नाहीत, पहाटे पहिला फटाका कोणाचा उडणार याची स्पर्धा लागत नाही किंवा कोणाच्या घरात जास्त फटाके याचीही चर्चा होत नाही. अहो, यात गैर काही नाही. आपण पर्यावरणस्नेही सणांच्या दिशेने टाकलेले हे पहिले पाऊल आहे. खेद नाही, तर ही आनंदाची बाब आहे. आता येथून पुढे सर्व सण-उत्सवांमध्ये पर्यावरणाला हानिकारक फटाके दूर ठेवण्याचा आपण संकल्प करू या..

चैत्राली चांदोरकर

प्रकाशाचा उत्सव असलेल्या दिवाळीला आपल्या सणसमारंभांमध्ये मानाचे स्थान आहे. गणेशोत्सवाची चाहूल लागली पुढे नवरात्र, दसरा अन् दिवाळी अशी उत्सवांची मालिकाच सुरू होते. पण गेल्या काही वर्षात सण साजरे करण्यात झालेल्या बदलांमुळे होणारे प्रदूषण हा टीकेचा विषय ठरला आहे. या सणांमध्ये होणारे ध्वनिप्रदूषण, वायुप्रदूषण, जलप्रदूषण केवळ माणूस नव्हे, तर पशू-पक्षी, वनस्पती आणि वातावरणासाठीही घातक ठरते आहे. त्यामुळे सण साजरे करताना पर्यावरणाचा विचार करा, असे सातत्याने सांगितले जात आहे. जनजागृतीपर अनेक उपक्रम राबवले जात आहेत.

आनंद आणि प्रकाशाचा सण

आपण इतिहासात डोकावून पाहिले तर दिवाळी पूर्वी कशी साजरी होत असे, याचे संदर्भ सापडतात. शेकडो वर्षांपूर्वी आपल्या दीपोत्सवाच्या या परंपरेत फटक्यांचे संदर्भ सापडत नाहीत, किंवा त्यांचा उगम भारतात झाला असे उल्लेखही दिसत नाहीत. प्राचीन ग्रंथांनुसार दिवाळी हा आनंदाचा, प्रकाशाचा सण असल्याचे अधोरेखित केल्याचे दिसते. मग दिवाळी आणि फटाक्यांचा काय संबंध हा प्रश्न पडणे स्वाभाविकच आहे.

फटाक्यांचे मूळ

अभ्यासकांच्या संशोधनानुसार चीनमध्ये फटाक्यांचा उगम झाल्याचे सांगितले जाते. फटाक्यांच्या मोठ्या आवाजामुळे वातावरणातील नकारात्मक विचारांना पळवून लावता येईल आणि सगळी संकटे दूर होतील, अशी चिनी लोकांची अख्यायिका प्रसिद्ध आहे. फटाक्यांबद्दल असलेल्या आकर्षणामुळे त्याचे लोण सर्वदूर पसरले. काही पुराणकथा, अख्यायिकांमध्ये भारतातही फटाकेसदृश ज्वलनशील घटकांचा उल्लेख आढळतो. पण त्याचा वापर लढाई, युद्धांमध्ये केला जात होता. पुढे राजे महाराजांच्या लग्नसमारंभांमध्ये, आनंदोत्सवामध्ये फटाक्यांचा वापर सुरू झाला. भारताबरोबरच सर्वच देशांमध्ये बघता बघता फटक्यांची लोकप्रियता वाढत गेली. गेल्या चार ते पाच दशकांमध्ये जगभरात लग्नसमारंभ, मोठे सांस्कृतिक कार्यक्रम, पुरस्कार सोहळे, नवीन वर्षाचे स्वागत, जागतिक स्पर्धांच्या सुरुवातीला नयनरम्य फटाके उडवणे हा जणू पायंडाच पडला आहे. एवढेच नव्हे, तर काही देशांमध्ये रोषणाई, फॅन्सी फटाक्यांचे महोत्सवही आयोजित केले जातात. रिमोट कंट्रोलच्या साहाय्याने एकापाठोपाठ हे फटाके उडवून आकाशात रोषणाईतून विविध आकार तयार केले जातात. हे महोत्सव लोकप्रिय ठरत असून काही मिनिटांच्या महोत्सवासाठी लाखो रुपये खर्च केले जातात.

फटाकेबंदीचे बीज

फटाक्यांच्या आतषबाजीबद्दल कुतूहल, आकर्षण असण्याबद्दल दुमत नाही, पण आतषबाजीतून बाहेर पडणारा विषारी धूर आणि कर्कश आवाजाचे दुष्परिणाम जसे जाणवायला लागले. तसा फटक्यांना विरोध सुरू झाला. फटाक्यांच्या विरोधात चळवळ उभी राहिली आणि स्वयंसेवी संस्था, पर्यावरण अभ्यासकांनी कायदेशीर लढाई लढून फटाके वाजवण्यावर बंधने आणली. शालेय मुलांमध्ये जागृती केली. त्यामुळे फटाके उडवण्याचे प्रमाण काही अंशी कमी होण्यास सुरुवात झाली.

आकर्षक तेवढेच घातक

फटाक्यांना एकढा विरोध का होतोय, याचे कारण आपण जाणून घेतल्यास त्याचे गांभीर्य कळते. प्रत्यक्षात फटाक्यांच्या निर्मितीपासून तक्रारींचा पाढा सुरू होतो. कारण बाजारात येणारे फटाके वेगवेगळ्या राज्यातील लहान मोठ्या गावातील कारखान्यांमध्ये तयार होतात. धक्कादायक बाब म्हणजे या कामात बालकामगारांचा समावेश असतो. गेल्या काही वर्षात अशा अनेक कारखान्यांवर प्रशासनाने सातत्याने केलेल्या कारवाईमुळे बालकामगारांचे प्रमाण कमी होताना दिसते. फटाक्यांमधील लवंगी,

लक्ष्मी बॉम्ब, सुतळी बॉम्ब यांसारख्या काही फटाक्यांचे आवाज कर्कश असतात. यातून दिवाळीच्या चार दिवसात प्रचंड ध्वनिप्रदूषण होते. या आवाजामुळे डोकेदुखी, बहिरेपणा, चिडचिड, अस्वस्थता आणि मानसिक अशांतता या तक्रारी जाणवतात. या फटाक्यांमध्ये वापरले जाणारे धातू, रासायनिक घटकांमुळे मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होते. या धातूंमध्ये कॅडमियम, जस्त, झिंक, मॅग्नेशियम, तांबे, लोखंडाचे कण, मॅगेनीज असे धातू असतात तर नायट्रेट, फॉस्फेट, नायट्राइड, सल्फेट असे घातक रासायनिक घटक असतात. धातू आणि रासायनिक घटकांच्या ज्वलनातून कार्बन मोनॉक्साईड आणि नायट्रोजन डायऑक्साइड, सूक्ष्म आणि अतिसूक्ष्म धुलिकणांची निर्मिती होते परिणामी हवा प्रदूषित होते. हे प्रदूषण पर्यावरणासाठी घातक असते.

पशुपक्ष्यांनाही त्रास

या प्रदूषणामुळे माणसाला श्वसनाचे आजार, दमा, रक्तदाब, हृदयविकार, चिडचिड, नैराश्य असे आजार होतात. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला, हृदयविकाराच्या रुग्णांसाठी फटाक्यांपासून होणारे प्रदूषण निश्चितच घातक असते. शिवाय कोरोना संकटात तर श्वसनाचे आजार दूर ठेवण्यासाठी फटाक्यांचा वापर टाळणे खूप गरजेचे आहे. माणसाबरोबरच पाळीव प्राणी, कुत्रा, मांजर, गावाजवळ राहणारे वन्यप्राणी यांच्यासाठी देखील फटाके धोकादायक ठरतात. या प्राण्यांची श्रवणक्षमता माणसापेक्षा कितीतरी पट जास्त आणि संवदेनशील असते. फटाक्यांचा आवाज कानात बोटे घालूनही आपल्याला त्रासदायक ठरतो, तर मग मुक्या प्राण्यांना किती त्रास होत असेल याचे उत्तर मिळते. दिवाळीच्या हंगामात आपल्या देशात परदेशी पक्ष्यांच्या स्थलांतरालाही सुरुवात झालेली असते. रोषणाईचे फटाके आणि कर्क्कश आवाजाच्या फटाक्यांमुळे हजारो मैलांचा प्रवास करून आपल्या प्रांतात दाखल होत असलेल्या या पक्ष्यांना प्रचंड त्रास होतो. अनेकांचा मृत्यू होतो. फटाके उडवल्यामुळे होणारे पर्यावरणीय नुकसान हा गंभीर विषय आहेच, शिवाय फटाके उडवताना होणाऱ्या अपघातांना विसरून चालणार नाही. दरवर्षी फटाक्यांमुळे शेकडो लोकांना भाजते, काहींची तर दृष्टीही गेली आहे.

जनजागृतीचा सकारात्मक परिणाम

सकारात्मक बाब म्हणजे, फटाक्यांचे दुष्परिणाम अलीकडे सगळ्यांना जाणवायला लागले आहेत. मुंबईसह विविध शहरांमधील पर्यावरणप्रेमी संस्था, संघटना यांनी कायदेशीर लढाई लढून फटाक्यांच्या वापरावर, वेळांवर बंधने आणली आहेत. राज्य सरकारही या कामात मागे नाही, शालेय पुस्तके, उपक्रमांमध्ये फटाक्यांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागृती केली जाते आहे. गेल्या दहा वर्षात

शहरांमधील शेकडो शाळांमध्ये प्रशासनाने शिक्षकांमार्फत विद्यार्थ्यांना फटाक्यांशिवाय दिवाळीची शपथ दिली आहे. याचा परिणाम म्हणजे दिवाळीत नवीन कपड्यांबरोबर फटाक्यांचा हट्ट करणाऱ्या मुलांचे प्रमाण कमी होते आहे. मुलांचे फटाके उडवण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. उलट मोठ्यांनाही फटाके उडवू नका, असा आग्रह बच्चे कंपनी धरते आहे.

राज्य शासनाचाही पुढाकार

सरकारने उचलेल्या आक्रमक पावलांमुळे ध्वनिप्रदूषणाच्या निकषांमध्येही अलीकडील काही वर्षात बदल झाले आहेत. नवीन कायद्यानुसार १२५ डेसिबल किंवा १४५ डेसिबलपेक्षा जास्त आवाजाची निर्मिती करणाऱ्या फटाक्यांना बंदी घातली आहे. राज्य सरकारने रात्री दहा ते सकाळी सहा या वेळेत फटाके उडवण्यास बंदी केली आहे. नियम तोडणाऱ्यांवर पोलीस कारवाई करत आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे दरवर्षी गणेशोत्सव आणि दिवाळीमध्ये ध्वनी आणि वायू प्रदूषणाच्या नोंदी घेतल्या जातात. त्याचा स्वतंत्र अहवालही प्रसिद्ध होतो. विशेष म्हणजे गेल्या पाच वर्षात महाराष्ट्रात दिवाळीतील ध्वनी प्रदूषणाचे प्रमाण कमी होताना दिसते आहे. नागरिक आवाजाचे फटाके उडवणे टाळत आहेत. पूर्वी दिवाळीच्या पहिल्या दिवसापासून ते तुळशीच्या लग्नापर्यंत फटाके रोज उडवले जात होते. दिवाळीच्या मुख्य चार दिवसात तर फटाक्याच्या आवाजात घरात एकमेकांना संवाद ऐकू येत नसे. कोण फटाके जास्त उडवते याची स्पर्धा असे. आता चित्र बदलल पर्यावरणस्नेही दिवाळीच्या दिशेने आपला प्रवास सुरू झाला आहे. गेल्या दोन ते तीन वर्षात बहुतांश लोक फक्त लक्ष्मी पूजनाच्या रात्रीच मोठ्या प्रमाणात रोषणाईचे फटाके उडवतात. आवाजाच्या फटाक्यांची संख्या घटली आहे. लोकसहभागातून झालेल्या एकत्रित प्रयत्नामुळे आवाजाचे प्रमाण कमी करण्यात आपल्याला यश आले आहेत.

आता अजून एक पाऊल वायुप्रदूषणाला जबाबदार ठरणारे रोषणाईचे, फॅन्सी फटाक्यांचा वापर कमी करण्यावर आपल्याला भर द्यावा लागणार आहे. फटाके मुक्त दिवाळीसाठी आपल्याला सगळ्यांना प्रयत्न करावे लागतील.

फटाक्यांसाठी खर्च होणाऱ्या पैशांमधून काही समाजपयोगी उपक्रम राबवण्याचा संस्कार पालकांनी मुलांवर केला पाहिजे. दिवाळीच्या आनंदोत्सवापासून वंचित राहणाऱ्या घटकांना आपल्यापरीने मदत करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद बघण्याचे अनुभव आपल्या मुलांना दिला पाहिजे. पर्यावरणपूरक आकाशकंदिलांना प्राधान्य देत, प्लास्टिकचा कमीत कमी वापर, फटाक्यांना वगळून पर्यावरणस्नेही दिवाळीचा अनुभव प्रत्येक कुटुंबाने घेतला तर यातून पर्यावरण रक्षणाला हातभार लागेल, असा विश्वास आहे.

लेखिका महाराष्ट्र टाइम्स, पुणे येथे वरिष्ठ पत्रकार आहेत.

पाऊल पडते पुढे

उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्यमंत्री

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्थेला बळ देण्यासाठी राज्य शासनाने अनेक निर्बंध शिथिल केले आहेत. कोविडसाठी लागू असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन नागरिकांना आणि आस्थापनांना करावे लागणार आहे. हे करत असतानाच राज्य शासनाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. लसीकरणात आपण आघाडीवर आहोत. शाळा, महाविद्यालये सुरू होत आहेत. कोविडच्या परिस्थितीतही मोठ्या जिद्दीने आणि धैर्याने शासन सर्व संकटावर मात करत पुढचे पाऊल टाकत आहे. वेळोवेळी घेतलेले निर्णय, प्रकल्पांचा शुभारंभ अशा अनेक बाबींचा थोडक्यात आढावा...

आदिवासी पाड्यांचे पुनर्वसन

गोरेगाव पूर्व येथे गृह विभागाच्या फोर्स वन विशेष सुरक्षा पोलीस पथकासाठी दिलेल्या जागेतून राखीव पाच एकर जागेवर तेथील आदिवासी पाड्यातील कुटुंबांचे कालबद्धरीतीने पुनर्वसन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले.

फोर्स वन प्रशिक्षण केंद्रासंदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या वेळी गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, पालकमंत्री आदित्य ठाकरे, खासदार गजानन कीर्तिकर, खासदार विनायक राऊत, आमदार रवींद्र वायकर, आमदार सुनील प्रभू, मुख्य सचिव सीताराम कुंटे आदी उपस्थित होते.

सिंधुदुर्ग विमानतळाचे लोकार्पण

सिंधुदुर्ग विमानतळामुळे कोकणवासीयांचे स्वप्न पूर्ण झाले आहे. खऱ्या अर्थाने कोकणच्या विकासाने भरारी घेतली आहे. त्यामुळे जगभरातील पर्यटक कोकणात येतील आणि कोकणची संपन्नता जगासमोर येणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले.

ग्रीनफिल्ड विमानतळ सिंधुदुर्ग प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते संपन्न झाला.

नागरी विमान वाहतूक मंत्रालय, महाराष्ट्र शासन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि आयआरबी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लि. यांच्या संयुक्त विद्यमाने उड्डाण प्रादेशिक संपर्कता योजनेंतर्गत ग्रीनफिल्ड विमानतळ सिंधुदुर्ग प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते, दिल्ली येथून ऑनलाईन सहभागी झालेल्या नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्या अध्यक्षतेखाली, सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे, सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, उद्योगमंत्री सुभाष देसाई, पालकमंत्री तथा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, कृषिमंत्री दादाजी भुसे, पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, परिवहन मंत्री ॲड. अनिल परब, पर्यटन राज्यमंत्री कु. आदिती तटकरे, खासदार अरविंद सावंत, जिल्हा परिषद अध्यक्ष संजना सावंत, आमदार निरंजन डावखरे, अनिकेत तटकरे, दीपक केसरकर, वैभव नाईक, नितेश राणे आदी उपस्थित होते.

रस्त्यांसाठी निधी देणार

राज्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील खड्ड्यांच्या दुरुस्ती व उपाययोजनांचा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वर्षा निवासस्थानी आयोजित बैठकीत आढावा घेतला. या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण, उद्योगमंत्री सुभाष देसाई, सार्वजनिक

बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री एकनाथ शिंदे, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार विनायक राऊत, खासदार राहुल शेवाळे, आमदार सुनील प्रभू, मुख्य सचिव सीताराम कुंटे उपस्थित होते.

राज्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, मात्र या निधीचा विनियोग व्यवस्थित झाला नाही, कामचुकारपणा केल्याचे निदर्शनास आले तर संबंधित कंत्राटदाराची गय केली जाणार नाही. या रस्त्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यावर आहे त्यालाही जबाबदार धरून तत्काळ कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले.

शहर वसवण्यास मंजुरी

विमानतळाच्या सभोवतालचा परिसर विकसित करून सर्व सुविधायुक्त शहर वसवण्यासाठी शिर्डीची निवड करण्यात यावी तसेच महाराष्ट्रातील एक उत्तम विकास केंद्र याठिकाणी वसवावे, अशी सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली.

वर्षा येथील समिती कक्षात महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक ७६ वी बैठक झाली. या वेळी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर, विमानचालन विभागाच्या प्रधान सचिव वल्सा नायर-सिंह, सिकॉमचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. नितीन जावळे उपस्थित होते. एरिया अराऊंड शिर्डी हब एअरपोर्ट म्हणजेच 'आशा' असे या भागाचे नाव असेल. या भागाचा महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी नावीन्यपूर्ण आणि सुनियोजित विकास करणार आहे.

उच्चस्तरीय समितीची स्थापना

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाडे तसेच पात्र अतिक्रमणधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी पर्यायी जागेचा शोध घेऊन त्यांचे कायमस्वरूपी पुनर्वसन केले जावे, या जागेच्या निश्चितीसाठी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. या समितीमध्ये वने, आदिवासी, नगरविकास, गृहनिर्माण, पदुम यासह सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

सह्याद्री अतिथिगृहात झालेल्या बैठकीस उद्योगमंत्री सुभाष देसाई, पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, खासदार गजानन कीर्तिकर, मनोज कोटक, राजन विचारे, विधान परिषद सदस्य विद्या चव्हाण, विधानसभा सदस्य सुनील प्रभू, रविंद्र वायकर, प्रकाश सुर्वे, मिहीर कोटेचा, गीता जैन, मुख्य सचिव सीताराम कुंटे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील सरपंचांशी संवाद

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अभियानांतर्गत पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने 'सरपंच-पाणी व स्वच्छता संवाद' उपक्रमाचे आयोजन केले होते. त्या वेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वर्षा येथील समिती कक्षातून राज्यातील २७ हजार ८३२ ग्रामपंचायतींच्या सरपंचांशी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधला.

या कार्यक्रमास नाशिक येथून अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, कृषिमंत्री दादाजी भुसे, आमदार नरेंद्र दराडे, आमदार सरोज अहिरे, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. संजय चहांदे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव किशोरराजे निंबाळकर हे दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते.

'मित्रा'च्या नूतन इमारतीचे ई-उद्घाटन

नाशिक येथील महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्था 'मित्रा'च्या नूतन इमारतीच्या व मुख्य अभियंता कार्यालयाच्या इमारतीचे ई-उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपमुख्यमंत्री अजित पवार हे आभासी पद्धतीने तर अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री छगन भुजबळ, कृषिमंत्री दादाजी भुसे, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील आदी उपस्थित होते.

वृक्षलागवडीचे त्रिपक्षीय करार

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली ६५ हेक्टर अवनत वनक्षेत्रावर ७१ हजार ६६५ वृक्षलागवडीचे त्रिपक्षीय करार करण्यात आले. या वेळी मुख्यमंत्र्यांनी कॉर्पोरेट क्षेत्राला या कामात त्यांच्या सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून सहभागी करून घेण्याचे आवाहन केले. तसेच त्यांना वृक्षलागवडीसाठी जमीन देण्यासाठी विभागवार जागेची निश्चिती करण्यात यावी, असे निर्देशही वन विभागाला दिले.

अवनत वनक्षेत्राचे पुनर्वनीकरण करण्यासाठी खासगी व अशासकीय संस्थांचा सहभाग घेण्यात येत आहे. यासाठी वनमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीची बैठक मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. वन विभागाचे इतर अधिकारी व संबंधित औद्योगिक आस्थापनांचे प्रतिनिधी दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते.

कॉसिस ई-मोबिलिटीसोबत करार

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि 'कॉसिस' ई मोबिलिटी कंपनीदरम्यान पुणेजवळ तळेगाव येथे इलेक्ट्रिक वाहन उत्पादन करण्याबाबत सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या कार्यक्रमात सामंजस्य करार करण्यात आला. शून्य उत्सर्जन व पर्यावरणपूरक वाहन निर्मिती क्षेत्राला चालना देण्यासाठी उद्योग विभाग व इंग्लंडच्या कॉसिस ई-मोबिलीटी कंपनी यांच्यात २८२३ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या वेळी उद्योगमंत्री सुभाष देसाई, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, उद्योग विभागाचे अपर मुख्य सचिव बलदेव सिंग, विकास आयुक्त हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.अन्बलगन, कॉसिस ग्रुपचे संस्थापक आणि संचालक राम तुमुलुरी आदी उपस्थित होते.

रस्ते प्रकल्पांचा आढावा

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली आणि केंद्रीय रस्ते वाहतूक

लोकराज्यच्या विशेषांकाचे प्रकाशन

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे प्रकाशित करण्यात येत असलेल्या लोकराज्य या मासिकाच्या ऑक्टोबर महिन्यातील 'महापर्यटन, संधी, सुविधा आणि प्रबोधन शताब्दी वर्ष विशेष' या अंकाचे प्रकाशन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले.

सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या या प्रकाशन कार्यक्रमाला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) अशोक चव्हाण, शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड, पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे तसेच मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव विकास खारगे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे सचिव तथा महासंचालक डॉ.दिलीप पांढरपट्टे, संचालक (प्रशासन) गणेश रामदासी आदी उपस्थित होते.

आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत सह्याद्री अतिथिगृहात आयोजित बैठकीत राज्यातील रस्ते प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण, जलसंपदा मंत्री जयंत पाटील, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, परिवहन मंत्री ॲड. अनिल परब, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री संजय बनसोडे, खासदार सुनिल तटकरे, खासदार विनायक राऊत यांचेसह मुख्य सचिव सीताराम कुंटे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कृती आराखड्यास मान्यता

वन्यजीवांच्या सुरक्षिततेसाठी आणि संवर्धनासाठी व्यापक उपाययोजना सुचवणाऱ्या राज्य वन्यजीव कृती आराखड्यास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या १७ व्या बैठकीत मान्यता देण्यात आली. २०२१ ते २०३० या दहा वर्षांच्या काळाकरिता हा कृती आराखडा तयार करण्यात आला असून असा आराखडा तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. या आराखड्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जावी असे निर्देश मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी या वेळी दिले.

सह्याद्री अतिथिगृहात झालेल्या या बैठकीस पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, विधानसभा सदस्य धीरज देशमुख, मुख्य सचिव सीताराम कुंटे यांच्यासह राज्य वन्यजीव मंडळाचे सदस्य, वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

'किशोर' दिवाळी अंकाचे प्रकाशन

बालभारतीच्या वतीने प्रकाशित होणाऱ्या 'किशोर' दिवाळी अंकाचे प्रकाशन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड, पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे, बालभारतीचे संचालक विवेक गोसावी, किशोरचे कार्यकारी संपादक किरण केंद्रे आदी उपस्थित होते.

पोलिसांना 'गुड न्यूज'

राज्य शासनाने राज्यातील हजारो पोलीस हवालदारांसाठी एक महत्त्वाचा क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या संदर्भातील प्रस्तावास मान्यता दिली असून, यामुळे राज्यातील अंमलदारांचे पोलीस उपनिरीक्षक होण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

वर्षानुवर्षे सेवेनंतरही त्यांना पोलीस उपनिरीक्षक या अधिकारी पदावर पोहोचता येत नव्हते पण पदोन्नतीच्या या निर्णयाचा थेट फायदा येत्या काही महिन्यात सुमारे ४५ हजार हवालदार, सहायक पोलीस निरीक्षक आणि पोलीस उपनिरीक्षक यांना होणार आहे. या निर्णयामुळे गुन्ह्यांची उकल होण्यास तसेच सामान्य नागरिकांची मदत घेण्यात अधिक सुलभता येऊन पोलीस दलाची प्रतिमा सुधारण्यास मदत तर होणारच आहे, शिवाय पोलीस दलास सद्य:स्थितीत प्रत्यक्ष कामकाजाकरिता मिळणाऱ्या सुमारे २३ कोटी इतक्या मानवी दिवसामध्ये सुमारे ६६ कोटी दिवस इतकी वाढ होईल आणि गुन्हे उघडकीस येण्याच्या व रोखण्याच्या प्रमाणामध्ये निश्चितच भरीव वाढ होईल.

त्रिखंडात्मक ग्रंथांचे प्रकाशन

प्रबोधन नियतकालिकेतील केशव सीताराम ठाकरे यांचे लेख असलेले 'प्रबोधन' मधील प्रबोधनकार या त्रिखंडात्मक ग्रंथांचे प्रकाशन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते सह्याद्री अतिथिगृह येथे झाले. या वेळी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, मराठी भाषा विभागाचे मंत्री सुभाष देसाई, मराठी भाषा विभागाचे राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, खासदार अरविंद सावंत, महापौर किशोरी पेडणेकर, आमदार मंगलप्रभात लोढा, साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष श्रीधर तथा राजा दिक्षित व इतर मान्यवर उपस्थित होते.

शंभर वर्षापूर्वी चुकीच्या रूढी परंपरा तोडण्यासाठी केलेल्या चळवळीच्या

इतिहासातून आजच्या पिढीला शिकता यावे, यासाठी प्रबोधनकार ठाकरे यांचे ग्रंथ साहित्य आजही मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारसाहित्याच्या त्रिखंडात्मक ग्रंथाचे उद्‌घाटन माझ्या हाताने होत आहे, हे मी माझे भाग्य समजतो. माझ्या दृष्टीने मुख्यमंत्री हा बहुमान आणि प्रबोधनकरांचा नातू असणे हे भाग्य आहे, असे उद्‌गार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या वेळी काढले.

'प्रबोधन'च्या शताब्दीनिमित्त प्रसिद्ध झालेल्या या त्रिखंडात्मक ग्रंथाचे संपादक ज्येष्ठ पत्रकार सचिन परब, डॉ. रणधीर शिंदे, ज्ञानेश महाराव, सुनिल कर्णिक व विश्वंभर चौधरी यांना सन्मानित करण्यात आले. तसेच स्व. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाच्या balasahebthakaray.in या संकेतस्थळाचे लोकार्पण मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. 'प्रबोधन' मधील प्रबोधनकार या ग्रंथाच्या तीन खंडांत ऑक्टोबर १९२१ ते मार्च १९३० या कालावधीमध्ये प्रकाशित झालेले 'प्रबोधन' या नियतकालिकाचे ९१ अंकांमधील संपादित २४८ लेख अंतर्भूत करण्यात आले आहेत.

मुंबईतील प्रकल्पांचा आढावा

मुंबईतील रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांना गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. केंद्र शासनाच्या जमिनीवरील मुंबईतील रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांचा सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी आढावा घेतला. या वेळी गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड, परिवहन मंत्री ॲड. अनिल परब, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. सतेज उर्फ बंटी डी. पाटील, बॉम्बे पोर्ट ट्रस्टचे अध्यक्ष राजीव जलोटा, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश लोखंडे व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

केंद्रस्तरीय मंत्रिगटाची स्थापना

वस्तू व सेवा करप्रणालीतील (जीएसटी) त्रूटी दूर करून ती सहज, सोपी करण्यासंदर्भात सुधारणा सुचवण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली विविध राज्यांच्या उपमुख्यमंत्री व अर्थमंत्र्यांचा मंत्रिगट स्थापन करण्यात आला आहे. मंत्रिगटाने शिफारस केलेल्या आणि जीएसटी परिषदेने मंजूर केलेल्या सुधारणांच्या अंमलबजावणीवर देखील हाच

अजित पवार
उपमुख्यमंत्री

मंत्रीगट देखरेख ठेवणार आहे. केंद्रीय अर्थमंत्रालयाने त्या संदर्भातील आदेश नुकतेच जारी केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिगटात दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनिष सिसोदीया, हरयाणाचे उपमुख्यमंत्री दुष्यंत चौताला, आंध्रप्रदेशचे अर्थमंत्री बुग्गना राजेंद्रनाथ, आसामचे अर्थमंत्री अजंटा निओग, छत्तीसगडचे व्यापार करमंत्री टी. एस. सिंगदेव, ओडीसाचे अर्थमंत्री निरंजन पुजारी, तामिळनाडूचे अर्थमंत्री डॉ. पलानीवेल थैगाराजन यांचा समावेश आहे.

डिजिटल बारामती अम्ब्रेला ॲपचे लोकार्पण

सह्याद्री अतिथिगृहात बारामती नगरपरिषद, आयसीआयसीआय फाऊंडेशन, रेव्हमॅक्स टेलिकॉम, उन्नती डिजिटल या संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून तयार करण्यात आलेल्या 'डिजिटल बारामती अम्ब्रेला ॲप'चे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. या वेळी आरोग्य मंत्री राजेश टोपे, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार, बारामती नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे, रेल्वेचे पोलीस आयुक्त कैसर खालिद, आयसीआयसीआय फाऊंडेशनचे विनीत रुंगटा, कौस्तुभ बुटाला उपस्थित होते.

आमदार स्थानिक विकास निधीत वाढ

आमदारांच्या स्थानिक विकास निधीत आणखी एक कोटींची वाढ करण्यात आली असून त्यामुळे आता प्रत्येक आमदारांना त्याच्या मतदारसंघात विकास कामांसाठी प्रत्येक वर्षी चार कोटींचा निधी उपलब्ध होणार आहे.

नियोजन विभागाने या संदर्भात शासन निर्णय जारी केला आहे. राज्यातल्या आमदारांच्या स्थानिक विकास निधीत एक कोटीची वाढ करून तो तीन कोटी करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभागृहात केली होती. तसेच भविष्यात या आमदारांच्या स्थानिक विकास निधीत आणखी वाढ करण्याचा शब्द दिला होता. त्यानुसार आमदारांचा विकास निधी चार कोटी रुपये करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. त्याचबरोबर आमदारांच्या स्थानिक विकास निधीतून, प्रत्येकी एक कोटीचा निधी कोरोनाप्रतिबंधक उपाययोजनांसाठी खर्च करण्यास आमदारांना परवानगी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली होती.

व्याजदर सवलत योजना

कोकणाच्या शाश्वत विकासासाठी कोकणात मत्स्यव्यवसाय, फळबाग, दुग्धव्यवसायासह पर्यटन वाढीसाठी राज्यसरकार विशेष प्रयत्नशील आहे. त्याचबरोबर कोकणातील काजू उत्पादकांना दिलासा देण्यासाठी काजू उत्पादकांना अल्प व्याजदरात भांडवल उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने संबंधित जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या माध्यमातून व्याजदर सवलत योजना राबवण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत घेण्यात आला.

मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्षात काजू उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या बैठकीला कृषिमंत्री दादाजी भुसे, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, फलोत्पादन मंत्री संदिपानराव भुमरे, फलोत्पादन राज्यमंत्री कु. आदिती तटकरे, आमदार शेखर निकम उपस्थित होते.

सातवा वेतन आयोग लागू

ठाणे महानगरपालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याची घोषणा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. ठाणे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी कोरोना काळात जीव धोक्यात घालून केलेल्या

एकनाथ शिंदे
नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री

कामाची दखल घेऊन त्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कोरोनाचा काळ अत्यंत अवघड काळ होता. मात्र अशा वेळीदेखील स्वतःच्या जिवाची पर्वा न करता कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य पार पाडले. सार्वजनिक स्वच्छता, निर्जंतुकीकरण, रुग्णसेवा, स्मशानभूमीत केलेले काम हे निश्चितच कौतुकास्पद होते. त्यामुळे त्यांनी केलेल्या कामाबद्दल त्यांना दिलासा देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे श्री. शिंदे यांनी या वेळी स्पष्ट केले.

ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पाचे लोकार्पण

कळवण उपजिल्हा रुग्णालय येथे ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पाच्या लोकार्पण

जयंत पाटील
जलसंपदा मंत्री

जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या वेळी आमदार नितीन पवार यांच्यासह कळवण उपजिल्हा रुग्णालयातील विशेषज्ञ, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कोविड-१९ च्या दुसऱ्या लाटेमध्ये ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे अनेक अडचणी उद्‌भवल्या होत्या. मात्र आता शासनाच्या प्रयत्नाने संपूर्ण राज्य ऑक्सिजनच्या निर्मितीत स्वयंपूर्ण होत आहे. जिल्ह्यातील महत्त्वाच्या शासकीय रुग्णालयांमध्ये स्वयंनिर्मित ऑक्सिजन तयार करण्याचे आधुनिक तंत्रज्ञान आणि रुग्णालयात पोहोचवण्यासाठी असलेल्या मध्यवर्ती यंत्रणेमुळे आरोग्य यंत्रणेच्या बळकटीकरणाला मोठा फायदा होणार आहे, असे मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले.

योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात बैठक

ई-पीक पाहणी व प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना अंमलबजावणी संदर्भात महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, कृषिमंत्री दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत राज्यातील तहसीलदार, तलाठी, तालुका कृषी अधिकारी, कृषी साहाय्यक यांच्या संघटनांसोबत बैठक संपन्न झाली.

बाळासाहेब थोरात
महसूल मंत्री

ई-पीक पाहणी व प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना या दोन्ही योजना शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असून महसूल व कृषी या दोन्ही विभागांनी समन्वयाची भूमिका घ्यावी व जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या योजनांचा लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या या बैठकीस महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, कृषी विभागाचे सचिव एकनाथ डवले, कृषी आयुक्त धीरजकुमार, जमाबंदी आयुक्त एन.के.सुधांशू यांच्यासह तहसीलदार, तलाठी, तालुका कृषी अधिकारी, कृषी साहाय्यक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महसूल व कृषी विभाग शेतकऱ्यांसाठी कार्य करत असून पिकविमा, नैसर्गिक आपत्ती इत्यादी विषयात दोन्ही विभाग समन्वयाने काम करत असतात. त्याचप्रमाणे ई-पीक पाहणी व प्रधानमंत्री किसान सन्मान निधी या दोन्ही योजनामध्ये टीमवर्क करून योजना राबवताना काही अडचणी असल्यास समन्वयाने मार्ग काढावा. ई-पीक पाहणी प्रकल्पात काही सुधारणा करणे गरजेचे असेल तर त्या अवश्य केल्या जातील, असे कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

वाणिज्य उत्सवाचे उद्‌घाटन

जागतिक व्यापार केंद्र (वर्ल्ड ट्रेड सेंटर) येथे दोन दिवस संपन्न झालेल्या राज्यस्तरीय 'वाणिज्य उत्सव' परिषदेचे उद्‌घाटन उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी केंद्रीय रेल्वे, कोळसा आणि खनिकर्म राज्यमंत्री रावसाहेब दानवे, उद्योग राज्यमंत्री कु. आदिती तटकरे, उद्योग विभागाचे अपर मुख्य सचिव बलदेव सिंग, विदेश व्यापार महानिदेशालयाचे अतिरिक्त महासंचालक एस. बी. एस. रेड्डी, जेम्स ॲण्ड ज्वेलरी निर्यात परिषदेचे अध्यक्ष संजय शाह, जागतिक व्यापार केंद्राचे उपाध्यक्ष विजय कलंत्री, उद्योग विकास आयुक्त डॉ. हर्षदिप कांबळे उपस्थित होते.

आजादी का अमृतमहोत्सव - ७५व्या स्वातंत्रदिनाच्या वर्धापन दिनानिमित्त केंद्र

सुभाष देसाई
उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री

शासनाच्या वाणिज्य विभागामार्फत २० ते २६ सप्टेंबर २०२१ या कालावधीत वाणिज्य सप्ताह साजरा करण्यात आला. या अंतर्गत ही परिषद आयोजित करण्यात आली होती.

प्रकल्पाचे सादरीकरण

मरीन ड्राईव्ह येथे उभारण्यात येणाऱ्या मराठी भाषा भवन प्रकल्पाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासमोर सादरीकरण करण्यात आले. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार व मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई उपस्थित होते. मराठी भाषा विभागातर्फे मराठी भाषा भवन मुख्य केंद्र प्रस्तावित आहे. या इमारतीच्या बांधकाम आराखड्यासाठी स्पर्धा घेऊन वास्तुविशारदाची निवड करण्यासाठी मागवण्यात आलेल्या निविदांबाबत वास्तुविशारदांनी सादरीकरण केले.

पुस्तक प्रकाशन

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकल्पचित्र मंडळातर्फे तयार करण्यात आलेल्या 'पूलवजा बंधाऱ्याचे संकल्पचित्र आणि मार्गदर्शक तत्त्वे' या पुस्तकाचे सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

अशोक चव्हाण
सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

मंत्रालयात आयोजित या कार्यक्रमास सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव उल्हास देबडवार यांचेसह तज्ज्ञ समितीचे निवृत्त प्रधान सचिव प्रमोद बोंगिरवार, निवृत्त सचिव (रस्ते) कृष्णा जांगडे, राष्ट्रीय महामार्ग मंडळाचे अधीक्षक अभियंता मनोज जयस्वाल, नागपूरच्या व्हीएनआयटी कॉलेजचे प्रा. डॉ. रमाकांत इंगळे, नागपूरच्या इनोव्हेटिव्ह कन्स्ट्रक्शनचे संचालक गरीबदास आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते. पूलाचे रुपांतर पूल-वजा-बंधाऱ्यात कसे करायचे याविषयीची सविस्तर माहिती 'पूल-वजा-बंधाऱ्याचे संकल्पचित्र आणि मार्गदर्शक तत्त्वे' या पुस्तकात देण्यात आली आहे.

राज्याच्या ज्या भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवते त्या भागात पूल-वजा-बंधारे करण्याच्या नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे आवाहन करतानाच कमी खर्चात शेतीसाठी आणि पिण्यासाठी पाणी उपलब्ध होणाऱ्या या तंत्रज्ञानाची माहिती सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे निर्देश मंत्री श्री.चव्हाण यांनी या वेळी दिले.

अभ्यासगटाची बैठक

अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राआधारे सेवेत रुजू झालेल्या व जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय

छगन भुजबळ
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

करावयाच्या सेवा व सेवानिवृत्तीविषयक लाभांबाबत अभ्यास करण्यासाठी नेमलेला अभ्यासगट हा आपला अहवाल लवकरच मंत्रिमंडळाला सादर करणार असल्याची माहिती अभ्यासगटाचे अध्यक्ष तथा अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.

मंत्रालयातील परिषद सभागृहात, अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत रुजू झालेल्या व जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय करावयाच्या सेवा व सेवानिवृत्तीविषयक लाभांबाबत शासनास शिफारशी करण्यासाठी गठित केलेल्या अभ्यासगटाची बैठक अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. आदिवासी विकास मंत्री ॲड. के.सी. पाडवी, गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड, सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे या बैठकीस उपस्थिती होती. बैठकीस सामान्य प्रशासन विभागाचे सचिव सुमंत भांगे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

अमली पदार्थविरोधी कारवाईचा आढावा

राज्यात अमली पदार्थांचे वाढते व्यवहार रोखण्यासाठी गृह विभागाने कठोर धोरण स्वीकारले असून अमली पदार्थांच्या विरोधात कारवाईसाठी प्रत्येक जिल्ह्यात पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर 'अमली पदार्थ विरोधी कक्ष निर्माण करण्याचे निर्देश गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी दिले.

राज्यातील व विशेषता मुंबईतील अमली पदार्थविरोधी कारवाईचा आढावा मंत्रालयात आयोजित बैठकीत गृहमंत्री दिलीप वळसे -पाटील यांनी घेतला. या बैठकीला अपर मुख्य सचिव, गृह मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, अपील व सुरक्षा, आनंद लिमये, पोलीस महासंचालक संजय पांडे, मुंबई पोलीस आयुक्त हेमंत नगराळे, अपर पोलीस महासंचालक कायदा व सुव्यवस्था राजेंद्र सिंग, विनीत अग्रवाल, सहआयुक्त विश्वास नांगरे-पाटील, मिलिंद भारंबे उपस्थित होते.

दिलीप वळसे-पाटील
गृहमंत्री

महिला सुरक्षेसाठी मार्गदर्शक नियमावली

विविध संघटित व असंघटित क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर महिला नोकरी करीत

आहेत. या सर्व महिलांची सुरक्षा हा राज्य शासनाच्या दृष्टीने प्राधान्याचा विषय असून गृह विभागाने यासंदर्भात सर्वसमावेशक मार्गदर्शक नियमावली तत्काळ तयार करून जाहीर करण्याचे निर्देश गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी दिले.

राज्यातील माहिती तंत्रज्ञान प्रकल्प असलेल्या ठिकाणी काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेसंदर्भात उपाययोजना करण्यासाठी गठित समितीने सुचवलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला अपर मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, पोलीस महासंचालक संजय पांडे, पोलीस आयुक्त हेमंत नगराळे, माहिती तंत्रज्ञान सचिव आभा शुक्ला, अपर पोलीस महासंचालक रितेश कुमार, सह आयुक्त वाहतूक राजवर्धन यांसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ॲपचे उद्घाटन

कोविड लसीकरणामध्ये गोंदिया जिल्हा सर्वांत जास्त लसीकरण झालेला जिल्हा असून यापुढे दुर्गम आणि अतिदुर्गम भागातही लसीकरण मोठ्या प्रमाणात होण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. याचाच भाग म्हणून महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी, जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया आणि नवाना टेक प्रा.लि. यांच्यात सामंजस्य करार होऊन व्हॉट्सॲपद्वारे कोविड लसीकरण नोंदणीच्या ॲपचे उद्घाटन कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मंत्री नवाब मलिक यांच्या हस्ते मुंबईत करण्यात आले.

या वेळी विभागाच्या प्रधान सचिव मनीषा वर्मा, महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र सिंह कुशवाह, गोंदिया जिल्हाधिकारी नयना गुंडे, साहाय्यक जिल्हाधिकारी अनमोल सागर, नवाना टेकचे राऊल नानावटी, गोंदिया जिल्ह्यातील आरोग्य विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

सामंजस्य करार

महाराष्ट्र आणि ग्रेटर मँचेस्टर (यू.के.) यांच्यातील व राजनैतिक दोन्ही बाजूंचे आर्थिक संबंध अधिक मजबूत करण्यासाठी तसेच स्टार्टअप परीसंस्थेस चालना देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग आणि ग्रेटर मँचेस्टर यांच्यामध्ये मैत्रीपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारावर कौशल्य विकास विभागाचे आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह आणि मँचेस्टरचे महापौर अँडी बर्नहॅम यांनी स्वाक्षरी केल्या.

या ऑनलाईन कार्यक्रमास कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विकास मंत्री नवाब मलिक, प्रधान सचिव मनीषा वर्मा त्याचबरोबर व्यापार वाणिज्यदूत लन गेमेल, मँचेस्टर इंडिया पार्टनरशिपच्या (एमआयपी) कार्यकारी संचालक स्नेहला हसन, तसेच नावीन्यता सोसायटी व मँचेस्टरचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

नवाब मलिक
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री

विद्यार्थ्यांना रोख रक्कम

अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राज्यात विविध ठिकाणी शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आली असून त्यामध्ये राहणाऱ्या व उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना त्यांच्या आहाराकरिता रोख रक्कम देण्यात येणार आहे. ही रक्कम विद्यार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे, अशी माहिती अल्पसंख्याक विकास मंत्री नवाब मलिक यांनी दिली. अ, ब आणि क वर्ग महापालिका तसेच विभागीय शहरातील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना मासिक रक्कम ३ हजार ५०० रुपये, तर जिल्हा व तालुकास्तरावरील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना मासिक रक्कम ३ हजार रुपये देण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. या संदर्भातील शासन निर्णय नुकताच निर्गमित करण्यात आला असून चालू शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासूनच या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येईल.

तपासणी मोहीम राबवावी

राज्यातील जनतेला सकस, निर्भेळ आणि भेसळमुक्त मिठाई व इतर अन्न पदार्थ मिळणे गरजचे आहे. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने भेसळीसंदर्भात तपासणी मोहीम प्रभावीपणे राबवून या पदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी दिले आहेत.

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कामाचा बांद्रा येथील कार्यालयात डॉ.शिंगणे यांनी आढावा घेतला. त्या वेळी ते बोलत होते. या बैठकीला अन्न व औषध प्रशासन आयुक्त परिमल सिंग, सर्व सहआयुक्त प्रत्यक्ष व इतर जिल्हास्तरीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते.

जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांनी मिठाई व इतर खाद्य पदार्थांच्या उत्पादकांसोबत बैठक घ्यावी. त्यांना योग्य ते निर्देश द्यावेत. मिठाई व इतर पदार्थांच्या वेष्टनावर तयार करण्याची आणि वापरण्यास योग्य असण्याचा दिनांक टाकणे आवश्यक आहे, याबाबत

डॉ. राजेंद्र शिंगणे
अन्न व औषध प्रशासन मंत्री

जनजागृती करावी. त्याचबरोबर दूध व दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ तपासणी वाढवावी आणि त्याचा सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा, असे निर्देशही डॉ. शिंगणे यांनी दिले.

स्टेमी प्रकल्पाचे लोकार्पण

हृदयविकाराचा झटका आल्यावर रुग्णांवर पहिल्या तासातच उपचार होण्याची आवश्यकता असते. स्टेमी महाराष्ट्र प्रकल्पामुळे पहिल्या तासात उपचार करणे शक्य होईल, असे सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी सांगितले.

'स्टेमी महाराष्ट्र' प्रकल्पाचे श्री. टोपे यांनी उपजिल्हा रुग्णालय, कामठी, नागपूर येथून व्हर्चुअल पद्धतीने उद्घाटन केले. हृदयविकाराचा झटका आल्यानंतरचा पहिला तास सुवर्णतास म्हणून ओळखला जातो. या पहिल्या तासात योग्य आणि त्वरित उपचार स्टेम प्रकल्पाच्या साहाय्याने घ्यावेत. स्टेमी

राजेश टोपे
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

महाराष्ट्र प्रकल्प राज्यात १२ जिल्ह्यांमध्ये सुरू करण्यात आला आहे. आतापर्यंत ३० हजार रुग्णांना ईसीजी सेवा मिळाली आहे. त्यापैकी ३१७ स्टेमीची प्रकरणे प्रकल्पात आढळली. त्यांना पुढील उपचारासाठी उच्च केंद्राकडे पाठवण्यात आले. येत्या काळात हा प्रकल्प आधिक गतिमान करण्यात येईल. येत्या काही वर्षांत संपूर्ण महाराष्ट्रात या प्रकल्पाचा विस्तार केला जाईल, असे श्री. टोपे यांनी सांगितले.

कल्याणकारी मंडळास मंजुरी

राज्यातील टोरिक्षा चालक, टॅक्सी चालक, ट्रक चालक यासारख्या असंघटित वाहनचालकांच्या हितासाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यास कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांनी तत्त्वत: मंजुरी दिली.

तामिळनाडूच्या धर्तीवर राज्यात असंघटित वाहनचालकांसाठी कल्याणकारी बोर्ड स्थापन करण्याबाबत मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल, असंघटित विकास आयुक्त डॉ. अश्विनी जोशी, परिवहन आयुक्त डॉ. अविनाश ढाकणे, कामगार उपायुक्त शैलेंद्र पोळ, परिवहन विभागाचे सहसचिव राजेंद्र होळकर आदी उपस्थित होते.

हसन मुश्रीफ
ग्रामविकास, कामगार मंत्री

'कृषी कर्ज मित्र' योजना

इच्छुक पात्र शेतकऱ्यांना वेळेत व सुलभरीत्या कर्ज उपलब्ध होण्यासाठी जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून कृषी कर्ज मित्र योजनेस शासनाने मान्यता दिली असून या संदर्भातील शासन निर्णय ग्रामविकास विभागाने निर्गमित केला असल्याचे ग्रामविकास व कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामाकरिता राष्ट्रीयकृत बँका, सहकारी तसेच खासगी बँका आणि पतपेढ्यांमार्फत मोठ्या प्रमाणावर कर्ज पुरवठा केला जातो. यात शेतकऱ्यांचा कल हा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे जास्त असतो. सहकारी बँकेकडून विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्यांमार्फत कर्जाचे वितरण केले जाते. शेतकरी नवीन पीक कर्ज, मध्यम व दीर्घ मुदतीचे कर्ज घेत असतांना त्याला सात-बारा उताऱ्यापासून ते बँकांचे ना-हरकत प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे गोळा करताना बराच कालावधी लागतो व कधी कधी हंगामही संपून जातो. नाइलाजाने शेतकऱ्यांना खासगी सावकाराकडून जास्तीच्या व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. यास्तव शेतकऱ्यांना वेळेत व सुलभरीत्या कर्ज उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कृषी कर्ज मित्र योजना राबवण्यात येत आहे.

उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न

कोळसा टंचाईमुळे राज्यातील वीज निर्मिती कमी झाली असून गरजेनुसार खुल्या बाजारातून महागड्या दराने वीज खरेदी करून ग्राहकांची वीजेची गरज भागवली जात आहे. राज्यात कुठेही भारनियमन केले जात नसून वीज उत्पादन वाढवण्यासाठी योग्य नियोजन केले जात आहे, अशी माहिती ऊर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिली आहे.

राज्यात मागणीच्या तुलनेत ३ हजार मेगावॅट वीजेची कमतरता जाणवत आहे. ही विजेची तूट भरून काढण्यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. राज्यातील महानिर्मितीच्या औष्णिक प्रकल्पांना कोळशाचा नियमित पुरवठा व्हावा, यासाठी दोन महिन्यांपासून केंद्रीय कोळसा मंत्री प्रल्हाद जोशी व केंद्रीय ऊर्जा मंत्री आर.के.सिंग यांच्याशी नियमित संपर्कात असून लवकरच या संकटावर मात करू, असा विश्वास ऊर्जा मंत्री डॉ. राऊत यांनी व्यक्त केला.

डॉ. नितीन राऊत
ऊर्जा मंत्री

'इंडिया ग्रीन एनर्जी' पुरस्कार

महाराष्ट्र सरकारच्या ऊर्जा विभागांतर्गत कार्यरत महानिर्मितीची प्रतिष्ठेच्या इंडियन फेडरेशन ऑफ ग्रीन एनर्जी संस्थेतर्फे सन २०२१ करिता इंडिया ग्रीन एनर्जी पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल ऊर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी महानिर्मितीचे अभिनंदन केले आहे.

पर्यावरणपूरक हरित ऊर्जा निर्मितीकरिता

हा पुरस्कार देण्यात येतो. मुख्यमंत्री कृषी वाहिनी योजनेंतर्गत उभारण्यात आलेले व नियोजित सौर ऊर्जा प्रकल्पांकरिता हा पुरस्कार महानिर्मितीला देण्यात आला आहे. पर्यावरण रक्षण आणि शेतकऱ्यांना दिवसाही ऊर्जा मिळवून देण्यासाठी आम्ही हरित ऊर्जा वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहोत. या पुरस्काराने आमच्या प्रयत्नांची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली. यामुळे हा पुरस्कार या प्रयत्नांना नवे बळ देणारा आहे, असे डॉ. राऊत यांनी सांगितले.

आदर्श शाळा योजनेचा आढावा

निजामकालीन शाळांचा विकास आणि आदर्श शाळा योजनेबाबत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्यासाठी दूरदृश्य प्रणालीद्वारे शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी

प्रा. वर्षा गायकवाड
शालेय शिक्षण मंत्री

शालेय शिक्षण विभागाच्या अप्पर मुख्य सचिव वंदना कृष्णा, शालेय शिक्षण आयुक्त विशाल सोलंकी, प्राथमिक शिक्षण विभागाचे संचालक श्री.टेमकर, पालघर जिल्हा परिषद अध्यक्ष वैदही वाढाण आदींसह सर्व जिल्ह्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा परिषद शाळांचा शैक्षणिक आणि भौतिक विकास करून आदर्श शाळा योजना राबवणे आणि निजामकालीन शाळांचा विकास करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा. शाळांच्या पायाभूत सुविधांबरोबरच शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे शासनाचे उद्दिष्ट असल्याचे शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी सांगितले.

प्रत्येक जिल्ह्यात आदर्श शाळा योजनेची आणि संबंधित जिल्ह्यांमध्ये निजामकालीन शाळांच्या विकासाच्या कामांची अंमलबजावणी तातडीने होणे गरजेचे आहे. रायगड जिल्ह्यातील आपत्तिग्रस्त भागातील शाळांच्या देखभालीचा निधी वितरित करण्यात येईल. कोविडच्या पार्श्वभूमीवर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लसीकरण पूर्ण करण्यात यावे, काही अडचणी असल्यास त्या सोडवण्यास सहकार्य करण्यात येईल. शाळा दुरुस्तीसाठी नियोजन आवश्यक असून, सामाजिक संस्थांच्या माध्यमातून निधी उभा करावा. जिल्ह्यांनी आतापर्यंत केलेल्या कामांची माहिती त्वरित सादर करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

संत्रा उत्पादकांची कार्यशाळा

भारतीय कृषी अनुसंधान केंद्र अंतर्गत केंद्रीय लिंबूवर्गीय फळ अनुसंधान संस्था (आयसीएआर-सीसीआरआय) मार्फत फळ गळती व्यवस्थापन कार्यशाळा पदुम, क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. या वेळी आयसीएआर-सीसीआरआयचे संचालक डॉ. दिलीप घोष, उपमहासंचालक डॉ. बी. के. पांडे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाचे संशोधन विभागाचे संचालक डॉ. विलास खर्चे, संशोधक डॉ. आर. के सोनकर, नागपूर कृषी विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. डी. एम. पंचभाई आदी उपस्थित होते.

संत्रा फळाच्या गळतीमुळे उत्पादक सध्या त्रस्त आहेत. यावर संशोधन झाले पाहिजे. त्यासाठी संत्रा उत्पादक शेतकरी, केंद्रीय लिंबूवर्गीय फळ अनुसंधान संस्था,

सुनील केदार
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास,
क्रीडा व युवक कल्याण मंत्री

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला या संस्था मिळून दर महिन्याला कार्यशाळा आयोजित करावी, असे निर्देश मंत्री श्री. केदार यांनी दिले. अमरावती व नागपूर विभागातील संत्रा उत्पादक या कार्यशाळेला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतपिकाच्या नुकसानीसाठी निधी

गारपीट व अवेळी पावसामुळे मार्च, एप्रिल व मे २०२१ या कालावधीत कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या विभागांतील जिल्ह्यांमध्ये शेतीपिकांचे, फळपिकांचे नुकसान झाले. गारपीट व अवेळी पावसामुळे झालेल्या

विजय वडेट्टीवार
आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री

नुकसानीसाठी मदत देण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांच्या पुढाकाराने शेतपिकाच्या नुकसानीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचे वाटप करण्यासाठी १२२ कोटी २६ लाख ३० हजार इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. ज्या शेतीचे ३३ टक्के किंवा त्याहून अधिक नुकसान झाले आहे अशा शेतकऱ्यांना ही मदत मिळणार आहे.

गारपीट व अवेळी पावसामुळे शेतीपिकाच्या झालेल्या नुकसानासाठी मदत करण्याकरिता केंद्रीय आपत्ती प्रतिसाद निधी व राज्य आपत्ती प्रतिसाद निधी दरानुसार मदत अनुज्ञेय करून एकूण १२२ कोटी २६ लाख ३० हजार इतका निधी विभागीय आयुक्त यांच्यामार्फत जिल्ह्यांना वितरित करण्यास मंजुरी देण्यात आली असून श्री. वडेट्टीवार यांनी तातडीने विभागीय आयुक्तांना निधी वितरित करण्याचे निर्देश दिले आहेत.

शेतकऱ्यांना शासनाचा दिलासा

राज्यात जुलै २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यात विविध जिल्ह्यात पूरपरिस्थिती उद्‌भवली होती. यात शेतपिकांच्या नुकसानाकरिता बाधितांना आर्थिक मदत म्हणून एकूण ३६५ कोटी ६७ लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. या मदतीमुळे अतिवृष्टिग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तरी, सर्व कार्यान्वयन यंत्रणांनी तत्काळ मदत बाधितांपर्यंत पोहोचेल, याची दक्षता घेण्याचे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिले आहेत.

अतिवृष्टीमुळे शेतपिकांच्या झालेल्या नुकसानीकरिता बाधितांना मदतीचे वाटप करण्यासाठी पुणे विभागासाठी १५० कोटी १२ लाख रुपये, कोकण विभागासाठी ८ कोटी ५१ लाख रुपये, अमरावती विभागासाठी ११८ कोटी ४१ लाख रुपये, नाशिक विभागासाठी १ लाख रुपये, औरंगाबाद विभागासाठी ७७ कोटी ९७ लाख रुपये, नागपूर विभागासाठी १० कोटी ६५ लाख रुपये याप्रमाणे एकूण ३६५ कोटी ६७ लाख इतका निधी मंजूर झाला आहे.

निर्मिती संस्थांना सवलत

कोविडच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात सुरक्षिततेच्या कारणास्तव लॉकडाऊन करण्यात आला होता. या काळात वेगवेगळ्या माध्यमांतील चित्रीकरण बंद असल्याने निर्मिती संस्थांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले होते. त्यामुळे निर्मिती संस्थांना चित्रीकरण स्थळाच्या आणि दीर्घ मुदतवाढ तत्त्वावरील संस्थांच्या भाड्यात १५ एप्रिल २०२१ ते ६ जून २०२१ या कालावधीकरिता सवलत देण्यात येणार असून ही सवलत मूळ निर्धारित भाड्याच्या ४० टक्क्यांपर्यंत असेल, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांनी दिली.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाची १५८ वी बैठक ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. बैठकीस सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव सौरभ विजय, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक कैलास पगारे आणि सह व्यवस्थापकीय संचालक कुमार खैरे यांच्यासह सांस्कृतिक कार्य विभागाचे तसेच महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

अमित देशमुख
वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री

किल्ल्यांसाठी विकास आराखडा

मुंबईतील शिवडी, वरळी, वांद्रे, धारावी, सेंट जॉर्ज आणि माहिम अशा सहा किल्ल्यांसाठी एकत्रित विकास आराखडा तातडीने तयार करण्यात यावा, अशा सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांनी दिल्या. गड-किल्ल्यांसंदर्भातील आढावा बैठक मंत्रालयात सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचिव विलास थोरात, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाचे संचालक डॉ. तेजस गर्गे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

शैक्षणिक लेखापरीक्षण पोर्टल

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली शैक्षणिक लेखापरीक्षण पोर्टलचे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सादरीकरण करण्यात आले. या बैठकीला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उच्च शिक्षण विभागाचे संचालक धनराज माने, तंत्र शिक्षण संचालक डॉ. अभय वाघ, सर्व अकृषी विद्यापीठाचे कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, समन्वयक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना उत्तम शैक्षणिक सुविधा, दर्जेदार गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे. शैक्षणिक सुविधासाठी असलेला निधीसुद्धा दर्जेदार शैक्षणिक सुविधा देण्यासाठीच खर्च झाला पाहिजे. ग्रामीण भागात शैक्षणिक सुविधा अधिकाधिक कशा उपलब्ध होतील, यासाठी विद्यापीठाने पुढाकार घेऊन ग्रामीण भागातील अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा, ग्रामीण भागात महाविद्यालयांच्या अडचणी, नवीन महाविद्यालय सुरू करणे, यासाठी शासनाला सहकार्य करावे. या पोर्टलच्या माध्यमातून राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये एकसमानता येण्यास मदत होईल. यामध्ये विद्यापीठाशी संलग्न असलेली महाविद्यालये, परिसंस्था व त्यांचे अभ्यासक्रम, विद्या शाखा, विषय, तुकड्या इत्यादी शैक्षणिक ऑडिट करण्याकरिता हे पोर्टल तयार करण्यात आले आहे. असेही श्री. सामंत यांनी या वेळी सांगितले.

उदय सामंत
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

विद्यार्थ्यांसाठी लसीकरण मोहीम

कोविडच्या पार्श्वभूमीवर गेली दोन वर्षे महाविद्यालय ऑनलाईन सुरू होती. शैक्षणिक संस्थानी अडचणीच्या काळातसुद्धा विद्यार्थी हित जोपासून ऑनलाईन शिक्षण दिले. यामध्ये महाराष्ट्र आघाडीवर राहिला आहे. ऑफलाईन महाविद्यालय सुरू होत असताना एकही विद्यार्थी लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी विशेष लसीकरण मोहीम राबवण्यात येणार आहे, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

माटुंगा येथे वीर जिजाबाई तंत्रज्ञान संस्थेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी व त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात श्री. सामंत बोलत होते. या वेळी रसायन तंत्रज्ञान संस्थेचे कुलगुरू डॉ. अनिरुद्ध पंडित, तंत्रशिक्षण

संचालक डॉ. अभय वाघ, व्ही.जे.टी.आय. संचालक डॉ. धीरेन पटेल, उपसंचालक डॉ. सुनील भिरुड, सहसंचालक डॉ. प्रमोद नाईक उपस्थित होते.

कृषी सिंचन योजनेचा आढावा

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेच्या अंमलबजावणी व कामाचा आढावा कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी मंत्रालयात घेतला. या वेळी कृषी विभागाचे उपसचिव सुशील खोडवेकर, फलोत्पादन संचालक कैलास मोते, 'इरिगेशन असोसिएशन ऑफ इंडिया'चे अध्यक्ष के. एम. महामुलकर यांच्यासह कृषी विभागाचे अन्य अधिकारी उपस्थित होते. कृषी आयुक्त धीरजकुमार हे ऑनलाईन पद्धतीने सहभागी झाले होते.

दादाजी भुसे
कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत सुधारणा सुचवण्यासाठी व पारदर्शकता आणण्यासाठी तातडीने समिती स्थापन करावी. महाडीबीटी पोर्टलवरील अर्ज छाननी टप्पे कमी करणे, क्षेत्रीय स्तरावर अधिकारी, कर्मचारी यांना अर्ज छाननी करावयासाठी कालमर्यादा ठरवणे, महाडीबीटी पोर्टलमध्ये सुधारणा करणे, संच कंपनीतून निघाल्यावर शेतकऱ्याच्या शेतात जाईपर्यंतची माहिती होण्यासाठी ट्रॅकिंग यंत्रणा उभारणे, शेतकऱ्यांकडून माहिती भरताना चूक झाल्यास ते दुरुस्त करण्याची संधी देण्यासाठी पोर्टलमध्ये आवश्यक ते बदल करणे याबाबत सुधारणा करण्यासाठी समितीने शिफारशी कराव्यात व अहवाल सादर करावा, असे निर्देश श्री.भुसे यांनी दिले.

मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना

विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्याप्रवण १४ जिल्हे, ३ नक्षलग्रस्त जिल्हे अशा १७ जिल्ह्यांतील सर्व तालुके, तसेच उर्वरित महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण तालुके अशा एकूण २४४ तालुक्यांमध्ये मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना राबवण्यात येत होती. या योजनेमध्ये राज्यातील उर्वरित सर्व १०६ तालुक्यांचा समावेश केला असल्याची माहिती कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी दिली.

मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचन संच बसवण्यासाठी प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजनेमध्ये देय असलेल्या अनुदानाशिवाय अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी २५ टक्के व इतर शेतकऱ्यांसाठी ३० टक्के पुरक अनुदान राज्य शासनातर्फे अतिरिक्त अनुदान देण्यात येते. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आता ही योजना उर्वरित सर्व तालुक्यात राबवण्यास मंजूरी दिली आहे. राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये या योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचनासाठी ८० टक्के अनुदान तर इतर शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदान देय राहणार आहे.

सातवा वेतन आयोग लागू

राज्य शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे अशी माहिती, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाने तसेच उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांच्या सहकार्यामुळेच हा निर्णय घेण्यात आला असल्याचे मंत्री श्री.पाटील यांनी सांगितले.

प्राधिकरणातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना १ जानेवारी २०१६ पासून सातव्या वेतन आयोगाचा लाभ देण्यात येईल. प्राधिकरणातील सध्या कार्यरत असणाऱ्या २ हजार ११८ अधिकारी, कर्मचाऱ्यांना तसेच ११ हजार सेवानिवृत्त कर्मचारी अशा एकूण १३ हजार ११८ कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ होईल. १ ऑक्टोबर, २०२१ पासून कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन श्रेणीनुसार वेतन अदा करण्यात येईल.

गुलाबराव पाटील
पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री

स्वच्छ भारत ग्रामीण सर्व्हेक्षण कार्यशाळा

मंत्रालयात स्वच्छ भारत ग्रामीण सर्व्हेक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. या वेळी पाणी पुरवठा राज्यमंत्री संजय बनसोडे, पाणी पुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव संजय चहांदे, प्रकल्प संचालक रवींद्र शिंदे, जिल्हा स्तरावरून सर्व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी, ग्रामसेवक, सरपंच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत २०२१-२२ या वर्षात केंद्र स्तरावरुन राज्यात ३४ जिल्ह्यांतील ९१२ गावांमध्ये स्वच्छ सर्वेक्षण २०२१ केले जाणार आहे. या वर्षीही स्वच्छ भारत सर्वेक्षणात महाराष्ट्र अग्रेसर राहण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले आहे.

मागण्यांचा सकारात्मक विचार

हजेरी सहायकांच्या पेन्शनसह विविध मागण्यासंदर्भात सकारात्मक विचार करणार असल्याचे रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री संदिपानराव भुमरे यांनी सांगितले. मंत्रालयात रोजगार हमी योजनेंतर्गत कामांविषयी विविध बैठकांचे आयोजन

संदीपानराव भुमरे
फलोत्पादन मंत्री

करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी आमदार मनोहर चंद्रिकापुरे, किसन कथोरे, माजी आमदार विजय गव्हाणे, रोजगार हमी योजना विभागाचे अपर मुख्य सचिव नंद कुमार, नरेगा आयुक्त शंतनु गोयल, जालना जिल्हाधिकारी विजय राठोड यांच्यासह विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत रोजगार सहायकांच्या सेवानिवृत्ती, शासकीय सेवेत नियमित करणे, रूजू झालेल्या तारखेपासून सेवा गृहित धरावे, अशा विविध मागण्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. शक्य असणाऱ्या मागण्यांवर लवकर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. काही विषय न्यायप्रविष्ट असल्याचेही श्री. भुमरे यांनी या वेळी सांगितले.

कापूस खरेदीचे नियोजन

हंगाम २०२१-२२ मधील कापूस खरेदी नियोजनाबाबत सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आढावा बैठक झाली. या वेळी सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार, सहकारी कापूस पणन

बाळासाहेब पाटील
सहकार व पणन मंत्री

महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक अरुण उन्हाळे, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे संचालक सतीश सोनी, सीसीआयचे जनरल मॅनेजर अतुल काला, संजय पाणीग्रही व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील हंगाम २०२१-२२ मधील कापूस खरेदीचे योग्य नियोजन करून शेतकरी हितासाठी कापूस खरेदीला नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात सुरुवात करावी, त्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशा सूचना सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिल्या.

राज्यात खरीप हंगाम २०२१-२२ मध्ये ३९.३७ लाख हेक्टरवर कापसाचा पेरा झालेला आहे. मागील वर्षी ४२.०८ लाख हेक्टरवर कापसाचा पेरा झालेला होता. या वर्षी कापूस पेरा ६.४४ टक्के घटला असली तरी सद्य:स्थितीत कापूस पिकाची परिस्थिती समाधानकारक आहे. त्यानुसार राज्यात ८०-८५ लाख गाठी एवढे उत्पन्न अपेक्षित आहे. त्यानुसार योग्य नियोजन करून खरेदीकेंद्र नोव्हेंबरमध्ये सुरू करण्यासाठी सर्व यंत्रणा कार्यरत करावी आणि या केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरा बसवण्यात यावेत, असेही श्री. पाटील यांनी या वेळी सांगितले.

परिवहन महामंडळाला निधी

परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष ॲड. अनिल परब यांच्या पाठपुराव्यामुळे राज्य शासनाकडून एसटी महामंडळाला मानव विकास कार्यक्रमातंर्गत दुसऱ्या टप्प्यातील २३१ कोटी ३० लाख रुपयांचा निधी मिळणार आहे. या संदर्भातील शासन निर्णय १२ ऑक्टोबर २०२१ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे एसटी महामंडळाच्या ९३ हजार कर्मचाऱ्यांचा प्रलंबित वेतनाचा प्रश्न सुटणार असून, लवकरच त्यांना सप्टेंबर महिन्याचे वेतन देण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष ॲड. अनिल परब यांनी दिली.

पर्यावरणपूरक गाड्यांसाठी निधी

कोरोना संकटामुळे घटलेली प्रवासी संख्या आणि इंधनाच्या वाढत्या किमतीमुळे एसटी महामंडळाच्या तिजोरीवर आर्थिक बोजा पडत आहे. महामंडळावरील आर्थिक बोजा कमी करण्यासाठी एसटी महामंडळाने आपल्या ताफ्यातील १ हजार गाड्या सीएनजीमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष ॲड. अनिल परब यांनी दिली.

कोरोना संकटामुळे एसटीची प्रवासी संख्या कमी झाल्याने त्याचा उत्पन्नाला फटका बसला आहे. त्यातच डिझेलच्या दरातही दिवसेंदिवस वाढ होत आहे. एसटी महामंडळाच्या ताफ्यात डिझेलवर धावणाऱ्या १७ हजार बसेस असून डिझेलवर होणारा खर्च हा एकूण खर्चाच्या ३४ टक्के इतका होता. वाढत्या डिझेल किमतीमुळे तो आता ३८ ते ४० टक्क्यांवर पोहोचला आहे.

ॲड. अनिल परब
परिवहन मंत्री

डिझेलवर होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या खर्चाचा गांभीर्याने विचार करत डिझेलला पर्यायी इंधनाचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. एसटीच्या ताफ्यात लवकरच सीएनजी बरोबरच इलेक्ट्रिक, एलएनजी अशा पर्यावरणपूरक इंधनावर धावणाऱ्या बसेस दाखल होणार आहेत. त्यामुळे भविष्यात इंधनावरील खर्चाच्या बचतीबरोबरच पर्यावरणपूरक प्रवासाला एसटी प्राधान्य देणार आहे. इंधनाचा खर्च कमी करण्यासाठी सीएनजीबरोबरच इतर पर्यायांचाही वापर करण्याचे निर्देश श्री. परब यांनी दिले आहेत.

'मिशन मुक्ता' मोहीम राबवणार

महिला कैद्यांच्या मुक्ततेसाठी 'मिशन मुक्ता' ही मोहीम राबवण्यात येणार आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री

ॲड. यशोमती ठाकूर
महिला व बालविकास मंत्री

ॲड. यशोमती ठाकूर यांनी दिली.

महिला कारागृहातील कच्चे कैदी, त्यांची प्रलंबित प्रकरणे, तसेच त्यांना विधिसेवेचे सहकार्य देऊन त्यांना मुक्त करणेबाबत महिला बालविकास विभागाची भूमिका याबाबत मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीस महिला आयोगाच्या सदस्य सचिव अनिता पाटील, ॲड. अविनाश गोखले आदी उपस्थित होते.

किरकोळ कारणासाठी कारागृहात बंदी असलेल्या महिला कैदी, कायदेशीर मदत मिळत नसल्यामुळे कारागृहात राहावे लागणाऱ्या, अशा महिलांना कायदेशीर मदत करून त्यांना कारागृहातून सोडवणुकीसाठी सहकार्य करणे व त्यांचे समुपदेशन करणे याकरिता महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण, तुरुंग प्रशासन यांच्यासमवेत अशा महिलांच्या कायदेशीर सहकार्याकरिता राज्य महिला आयोगाचा सहभाग घेऊन 'मिशन मुक्ता' ही मोहीम राबवण्यात येणार आहे, असेही ॲड. ठाकूर यांनी या वेळी सांगितले.

सर्वसमावेशक महिला धोरण

महिला धोरण २०१४ मध्ये सुधारणा करून सुधारित चौथ्या महिला धोरणाबाबत प्रारूप मसुदा सादरीकरण व चर्चा करण्याकरिता स्थापन समित्यांची बैठक महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली.

महिलांचे आर्थिक, सामाजिक सक्षमीकरण करणे, त्यांना दर्जा आणि संधीची समानता उपलब्ध करून देण्यासाठी नियम, कायद्यांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याला प्राधान्य देऊन सर्व विभागांच्या निर्देशानुसार जास्तीत जास्त सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचा प्रयत्न आम्ही करू, असे महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी सांगितले.

समाजातील प्रत्येक घटकातील महिलेला महिला धोरणाच्या मसुदा निर्मितीमध्ये सहभागी करून त्यांचे मत घेणे गरजेचे आहे. चौथ्या महिला धोरणाच्या मसुद्याबाबत नऊ समित्या तयार करण्यात आल्या आहेत. या समितीतील सदस्यांनी आपले अभिप्राय व सूचना मांडल्या. या अभिप्राय व सूचनांचा विचार करून महिला धोरणाचा मसुदा तयार करून तो सर्व विभागांना पाठवून त्यांचे अभिप्राय घेण्यात येतील, असेही महिला व बालविकास मंत्री ॲड. ठाकूर यांनी सांगितले.

दुरुस्तीच्या कामांचा आढावा

मांजरा व तेरणा नदीवरील उस्मानाबाद व कळंब तालुक्यातील ९ कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याचे उच्च पातळी बंधाऱ्यामध्ये रूपांतर करणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ व मालवण तालुक्यातील जलसंधारणाच्या प्रकल्पांचा, जळगाव ग्रामीण मतदारसंघातील जलसंधारणाच्या अंतर्गत दुरुस्तीची कामे आणि बुलडाणा जिल्ह्यातील मोताळा व बुलडाणा तालुक्यातील

शंकरराव गडाख
मृद् व जलसंधारण मंत्री

जलसंधारण विभाग अंतर्गत करावयाच्या दुरुस्तीच्या कामांचा आढावा जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.

राज्यातील विविध योजनांमधून जलसंधारणाची कामे करण्यात आली आहेत. त्यांच्या देखभाल व दुरुस्तीअभावी आवश्यक तेवढा जलसंचय होत नसल्याने 'मुख्यमंत्री जलसंवर्धन' ही नवीन योजना सुरू करण्यात आली. राज्यातील जलसाठ्यात मोठी वाढ होणार आहे, यासाठी दुरुस्ती करण्यात येणाऱ्या कामांचे अंदाजपत्रकासह प्रस्ताव सादर करण्यात यावे, अशा सूचना मंत्री श्री. गडाख यांनी या वेळी दिल्या.

या वेळी पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार वैभव नाईक, संजय गायकवाड, ज्ञानराज चौघुले, मृद व जलसंधारण विभागाचे अपर मुख्य सचिव नंद कुमार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ऊसतोड कामगार नोंदणी

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागांतर्गत लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ प्रत्यक्ष ऊसतोड कामगारांना देता यावा, यासाठी जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यातील ऊसतोड कामगार व त्यांच्या कुटुंबीयांची नोंदणी ग्रामसेवकामार्फत करून त्यांना ओळखपत्र देण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. कुठल्याही दस्तऐवजात 'ऊसतोड कामगार' अशी नोंदणी नसलेल्या लाखो असंघटित ऊसतोड कामगारांच्या जीवनाशी निगडित, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाचे हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

नोंदणी या वर्षीच्या सिझनला कामगार स्थलांतरित होण्यापूर्वीच केली जावी; नोंदणी करताना स्थानिक राजकारण, गाव स्तरावरील गटबाजी किंवा पक्षपात अशा कोणत्याही बाबीचा परिणाम नोंदणीवर न होऊ देता पारदर्शक पद्धतीने सरसकट ऊसतोडणी कामगारांची नोंदणी करून त्यांना ओळखपत्र दिले जावे, अशा स्पष्ट सूचना सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी केल्या आहेत.

उच्चस्तरीय समिती गठित

राज्यातील ६५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या ज्येष्ठ नागरिकांची वर्षातून किमान एकदा आरोग्य तपासणी करणे, त्यांना 'शरद शतम्' आरोग्य कवच विमा योजना लागू

धनंजय मुंडे
सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री

करणे या सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांच्या महत्त्वाकांक्षी योजनेला कार्यान्वित करण्यासाठी श्री. मुंडे यांच्या निर्देशानुसार राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे.

राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुधाकर शिंदे यांची या समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, एकात्मिक बालविकास सेवा आयुक्त रुबल अग्रवाल, एन. यु. एच. एमचे अतिरिक्त संचालक डॉ. सतीश पवार, डी. एम. ई. आरचे उपसंचालक डॉ. अजय चांदनवाले, जे. जे. रुग्णालयातील डॉ. विनायक सावर्डेकर, समाज कल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, ग्रामविकास विभागातील आस्थापना उपसचिव, तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाचे आस्थापना उपसचिव हे या समितीमध्ये सदस्य म्हणून काम पाहणार आहेत.

'ई-ऊसतोड कल्याण' ॲपचे लोकार्पण

बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयात सामाजिक न्याय विभागाच्या वतीने बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांची डिजिटल पद्धतीने नोंदणी करून त्यांना तत्काळ ओळखपत्र देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'ई-ऊसतोड कल्याण' या ॲपचे लोकार्पण सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास खासदार रजनीताई पाटील, आमदार प्रकाश सोळंके, आमदार बाळासाहेब आजबे, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार लक्ष्मण पवार, आमदार विनायक मेटे आदी मान्यवर उपस्थित होते.

हे ॲप प्रायोगिक तत्वावर बीड जिल्ह्यातील कामगारांची नोंदणी कमीत कमी वेळेत करण्यासाठी तयार करण्यात आले असून यानंतर सबंध राज्यात राबवण्यात येणार आहे. गोपीनाथगड (पांगरी) ता. परळी येथील गणेश एकनाथ मस्के हे या डिजिटल नोंदणीद्वारे राज्यातील पहिले ओळखपत्र धारक ऊसतोड कामगार ठरले आहेत. त्यांच्यासह इतर कामगारांना मंत्री श्री.मुंडे यांच्या हस्ते ओळखपत्र देण्यात आले.

कृती कार्यक्रमांचा आढावा

वातावरणीय कृती कार्यक्रमांचा आढावा वेबिनारचे आयोजन करून घेण्यात आला. पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री आदित्य ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली या वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पर्यावरण राज्यमंत्री संजय बनसोडे, प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष आबासाहेब जन्हाड, बेस्टचे महाव्यवस्थापक लोकेश चंद्रा, सर्व विभागीय

आदित्य ठाकरे
पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री

आयुक्त, जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अमृत नगरपरिषदांचे मुख्याधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव अशोक शिनगारे, माझी वसुंधरा अभियान संचालक सुधाकर बोबडे आदी सहभागी झाले होते.

या वेबिनारमध्ये माझी वसुंधरा-१चे विश्लेषण तसेच माझी वसुंधरा-२ची तयारी, पाणथळ क्षेत्रे, वृक्षांचे संरक्षण व जतन अधिनियमात करण्यात आलेली सुधारणा, रेस टू झिरो आणि कार्बन न्यूट्रॅलिटी त्याचबरोबर इलेक्ट्रिक वाहन धोरण व राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमाची एककेंद्राभिमुखता या विषयांचा आढावा घेण्यात आला.

शून्य कार्बन उत्सर्जन परिषद

राज्यातील शहरे कार्बन न्यूट्रल व नेट झिरो होण्यासाठी राज्य शासनामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. या अनुषंगाने सह्याद्री अतिथिगृह येथे शून्य कार्बन उत्सर्जन परिषदेचे आयोजन पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. या वेळी पर्यावरण राज्यमंत्री संजय बनसोडे, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव महेश पाठक, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष आबासाहेब जन्हाड, सदस्य सचिव अशोक शिनगारे आदी उपस्थित होते.

नूतन इमारतीचे काम प्राधान्याने

मंत्रालयातील दालनात पोलीस अधीक्षक कार्यालयाचे नवीन इमारत व सातारा जिल्ह्यातील पोलीस वसाहतींच्या नवीन बांधकामाबाबत गृह (ग्रामीण) राज्यमंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या वेळी बैठकीला अपर पोलीस महासंचालक, नियोजन व समन्वय संजय वर्मा, अति. महासंचालक, गृहनिर्माण अर्चना त्यागी, सातारा पोलीस अधीक्षक अजय बन्सल, वित्त विभागाचे अवर सचिव श्री. कातकाडे उपस्थित होते.

सातारा जिल्ह्याचे वाढते नागरीकरण व लोकसंख्या लक्षात घेता पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या नूतन इमारतीचे बांधकाम प्राधान्याने करण्यात यावे. जेणेकरून

शंभूराज देसाई
वित्त व नियोजन, राज्यमंत्री

जिल्ह्यातील पोलीस विभागाच्या कामात सुसूत्रता येईल तसेच ढेबेवाडी, कोरेगाव, म्हसवड व मसूर या ठिकाणच्या पोलीस वसाहतींच्या बांधकामाबाबत तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश गृह (ग्रामीण) राज्यमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

त्रुटी दूर करण्याबाबत सकारात्मक

राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांसाठी लागू केलेल्या डीसीपीएस योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटींचा अभ्यास करून संघटनांच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही वित्त व नियोजन राज्यमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

मंत्रालयातील परिषद सभागृह येथे राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेच्या त्रुटींसंदर्भात गठीत करण्यात आलेल्या अभ्यासगटाचे अध्यक्ष तथा वित्त व नियोजन राज्यमंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीस वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन गद्रे, लेखा व कोषागारे संचालक जयगोपाल मेनन, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक व मुख्य सल्लागार ग. दि. कुलथे, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस विश्वास काटकर व अभ्यासगटाचे राज्यातील पंधरा संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

स्वच्छ भारत अभियानाचा आढावा

उदगीर आणि जळकोट तालुक्यातील जलजीवन अभियान व स्वच्छ भारत अभियान अंतर्गत कामांचा तसेच नागरी पाणीपुरवठा योजनांबाबतची आढावा बैठक पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीला आमदार बाबासाहेब पाटील, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव किशोर राजे निंबाळकर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जलजीवन मिशन अंतर्गत नवीन प्रस्तावित योजनासंदर्भातील सर्व अंदाजपत्रक प्राधान्याने ऑक्टोबर २०२१ अखेर तयार करण्यात यावे. नवीन योजना आणि रेट्रोफिटिंग योजनासंदर्भात अंदाजपत्रक

संजय बनसोडे
पाणी पुरवठा व स्वच्छता, राज्यमंत्री

तयार करत असताना या योजना लवकरात लवकर कार्यान्वित कशा होतील याबाबत नियोजन करण्यात यावे. तसेच नवीन योजना कार्यान्वित करताना त्या लवकरात लवकर कशा सुरू होतील हे पाहणे आवश्यक आहे. वांजरवाडा हे लातूर जिल्ह्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्याने त्या गावासाठी जलजीवन अभियानमधून प्राधान्याने योजना आखण्यात यावी, असेही आदेश राज्यमंत्री श्री.बनसोडे यांनी दिले.

धर्मादाय रुग्णालयांनी दर्जेदार सेवा द्यावी

धर्मादाय रुग्णालयांनी निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना प्राधान्याने दर्जेदार सेवा देवून त्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश विधी व न्याय राज्यमंत्री कु. आदिती तटकरे यांनी दिले.

कु. आदिती तटकरे
पर्यटन, राज्यमंत्री

निर्धन व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी खासगी रुग्णालयात वैद्यकीय सेवा मिळण्याबाबत अंमलबजावणीसाठी गठीत करण्यात आलेल्या 'धर्मादाय खासगी रुग्णालयांची तपासणी करणे' या तदर्थ समितीची बैठक विधी व न्याय राज्यमंत्री तथा समितीप्रमुख कु. आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी समिती सदस्य ॲड. अशोक पवार, अबू आझमी, अजय चौधरी, बबनराव शिंदे, डॉ. किरण लहामटे व धीरज देशमुख तसेच धर्मादाय आयुक्त प्रमोद तरारे, सचिव व वरिष्ठ विधी सल्लागार राजेंद्र सावंत व विधान मंडळाचे प्रधान सचिव राजेंद्र भागवत व संबंधित अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

वातानुकूलित बससेवेचा शुभारंभ

गं. द. आंबेकर मार्गावरील श्रावण यशवंते चौक ते दादर रेल्वे स्थानक या दरम्यान वातानुकूलित मिनी बेस्ट बस सेवेचा शुभारंभ पर्यटन राज्यमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या हस्ते झाला. या वेळी बेस्ट समिती सदस्य बबन कनावजे, विजय वाडकर, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते, उमेश येवले व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुंबईतील ऐतिहासिक घडामोडी अनुभवलेल्या काळाचौकी परिसरासतील गं. द. आंबेकर मार्गावरून दादर रेल्वे स्थानकापर्यंत थेट वातानुकूलित मिनी बेस्ट बससेवेच्या सुविधेमुळे सर्वसामान्य नागरिकांच्या वेळ आणि पैशाची नक्कीच बचत होणार, असा विश्वास या वेळी पर्यटन राज्यमंत्री कु. आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.

टीम लोकराज्य

मंत्रिमंडळात ठरले

राज्य मंत्रिमंडळाच्या २८ सप्टेंबर, ६, १३ आणि २७ ऑक्टोबर २०२१ रोजीच्या बैठकीत उच्च व तंत्रशिक्षण, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय, अन्न व नागरी पुरवठा, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य, वैद्यकीय शिक्षण, महसूल, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, सामान्य प्रशासन, सहकार, उच्च व तंत्रशिक्षण, नगरविकास, सहकार, ग्रामविकास, जलसंपदा आदी विभागांचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती..

वेळापत्रक एक महिना पुढे

नवीन महाविद्यालय तसेच अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी निश्चित केलेले वेळापत्रक कोविडमुळे एक महिना पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मध्ये नवीन महाविद्यालय, परिसंस्था सुरू करणे तसेच नवीन अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाईट केंद्र सुरू करण्यासाठी परवानगी देण्याची पद्धत निश्चित केली आहे. कोविडमुळे वर्ष २०२१-२२ मध्ये विहित वेळेत कार्यवाही होऊ न शकल्याने हे वेळापत्रक एक महिन्याने पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. या संदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मध्ये सुधारणा करण्यासाठी अध्यादेश काढण्यात येईल.

अधिनियमात सुधारणा

अनधिकृत मासेमारीस आळा घालण्यासाठी तसेच राज्यातील मासेमारी नियमनाचे कामकाज प्रभावी करण्यासाठी महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या अधिनियमाच्या तरतुदीत ४० वर्षात कोणत्याही सुधारणा करण्यात आलेल्या नाहीत. आधुनिक यंत्रसामग्रीमुळे कमी श्रमात मोठ्या प्रमाणावर मासे उपलब्ध होत आहेत. मासेमारी व्यवसायात पारंपरिक मच्छीमारांचे हितसंबंध जोपासणे आणि मत्स्य उत्पादन वाढवणे. त्याचप्रमाणे पर्ससीन मासेमारी, ट्रॉलिंग मासेमारी, एलईडी लाईट वापरून केली जाणारी मासेमारी यांचे नियमन आवश्यक असल्यामुळे या सुधारणा करण्यात येत आहेत.

वाहतूक खर्चाच्या तरतुदीस मान्यता

किमान आधारभूत किंमत योजनेंतील २०२०-२१ मधील खरीप व रब्बी या दोन्ही पणन हंगामात धान खरेदीतील तांदळाच्या वाहतुकीच्या ४२२ कोटी ५२ लाख रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली.

केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेत (विकेंद्रीत खरेदी योजना) खरीप हंगाम २०२०-२१ मध्ये १ कोटी ३६ लाख ७६ हजार क्विंटल धान खरेदी करण्यात आले आहे. तर रब्बी हंगाम २०२१-२२ मध्ये ५३ लाख १५ हजार क्विंटल धान खरेदी होणार आहे. यातून तयार होणारा तांदूळ अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला वाटप केला जातो. विदर्भातील जिल्ह्यातून महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा तसेच प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेत धान व तांदळाची वाहतूक करण्यासाठी सुमारे ४२२ कोटी ५२ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. हा वाहतूक दर राज्य शासनाचा धान व सीएमआर वाहतूक दर २०१९-२० च्या मंजूर दरांप्रमाणे आहे.

वेतन आयोग लागू

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक समकक्ष संवर्गांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुषंगाने सातव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचना लागू करण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी १ जानेवारी २०१६ ते ३१ मार्च २०१९ पर्यंत ५२ कोटी ७४ लाख ५७ हजार ६०० एवढा खर्च थकबाकीसाठी येणार आहे. त्यामध्ये केंद्र व राज्य शासनाचा असा प्रत्येकी ५० टक्के हिस्सा आहे.

पदे भरण्यास मान्यता

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे सक्षमीकरण करण्यासाठी पदे निर्माण करण्यास व क्षेत्रीय कार्यालये सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. संचालनालयातील विविध संवर्गातील ५० पदे समर्पित करून १९ नियमित पदे निर्माण

करण्यास तसेच १४ (डाटा एंट्री ऑपरेटर तथा लिपिक) यांच्या सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. याशिवाय क्षेत्रीय स्तरावर २ प्रादेशिक कार्यालये सुरू करण्यासाठी २२ नियमित पदे निर्माण करण्यास तसेच ६ (डाटा एंट्री ऑपरेटर तथा लिपिक) यांच्या सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

संरक्षण विभागास जमीन

जुन्या पुणे-मुंबई रस्ता रुंदीकरणासाठी खडकी कॅन्टोन्मेंट हद्दीतील संरक्षण विभागाच्या जमिनीच्या बदल्यात राज्य शासनाच्या मालकीची जमीन संरक्षण विभागास देण्याबाबत मान्यता देण्यात आली. संरक्षण विभागाची १०.४९ एकर इतकी जमीन पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित करून त्या बदल्यात मौ.येरवडा येथील जमीन कामयस्वरूपी संरक्षण विभागास देण्यात येईल. पुणे महानगरपालिकेस रस्ता रुंदीकरणासाठी हस्तांतरित होणाऱ्या १०.४९ एकर जमिनीपैकी ३ एकर ३४.१ आर जमीन राईट ऑफ वे पद्धतीने पुणे मेट्रो प्रकल्पास देण्यात येईल.

६१५ खाटांचे रुग्णालय

नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय व अनुसंधान केंद्रात नवीन पदव्युतर आणि अतिविशेषोपचार अभ्यासक्रम तसेच ६१५ खाटांचे रुग्णालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. या

संस्थेचे श्रेणीवर्धन करून तेथे १७ पदव्युत्तर, ११ अतिविशेषोपचार अभ्यासक्रम, रुग्णालयीन प्रशासन/व्यवस्थापन विभाग व दंत बाह्यरुग्ण विभाग तसेच अभ्यासक्रमांशी संबंधित ६१५ खाटांचे रुग्णालय सुरू करण्यात येईल. त्याचप्रमाणे या संस्थेचे नाव डॉ.बाबासाहेब आंबेडकर अतिविशेषोपचार, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संस्था असे करण्यात येईल.

मुद्रांक शुल्क माफी

मे. झोडियाक हिलोट्रॉनिक्स प्रा.लि. यांनी वडाळा येथे सुपर स्पेशालिटी दवाखाना उभारण्याकरिता मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्यासमवेत सार्वजनिक-खासगी भागिदारी तत्त्वावर भाडेपट्टा करार केला आहे. या करारास मुद्रांक शुल्क व दंड माफ करण्याबाबतचा निर्णयास मान्यता देण्यात आली. या रुग्णालयाने ६०० खाटांपैकी ७५ म्हणजेच १२.५ टक्के खाटा राज्य शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी तसेच गरीब, आरक्षित व सर्वसाधारण जनतेसाठी ठेवाव्यात या अटीच्या अधीन राहून ही मान्यता देण्यात आली.

मंत्रिमंडळाकडून खेद व्यक्त

उत्तरप्रदेशातील लखीमपूर खेरी येथील घटनेत शेतकऱ्यांच्या झालेल्या दुर्दैवी मृत्यूसंदर्भात आज राज्य मंत्रिमंडळाने खेद व्यक्त करण्याचा ठराव केला. या वेळी मंत्रिमंडळाने दोन मिनिटे उभे राहून मरण पावलेल्या शेतकऱ्यांना श्रद्धांजलीदेखील वाहिली. या संदर्भात जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी प्रारंभी निवेदन केले आणि महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी अनुमोदन दिले.

अतिवृष्टी व पूरग्रस्तांसाठी अर्थसाहाय्य

राज्यातील अतिवृष्टी व पुरामुळे शेती पिकाच्या झालेल्या नुकसानीपोटी १० हजार कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी चर्चा करून मंत्रिमंडळ बैठकीत यासंदर्भात घोषणा केली.

राज्यात जून ते ऑक्टोबर २०२१ पर्यंत अतिवृष्टी त्याचप्रमाणे पुरामुळे ५५ लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील शेती पिकाचे नुकसान झाले. या नैसर्गिक संकटामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना एनडीआरएफच्या निकषांची वाट न पाहता १० हजार कोटींचे अर्थसाहाय्य (पॅकेज) जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही मदत पुढीलप्रमाणे राहील. जिरायतीसाठी १० हजार रुपये प्रतिहेक्टर, बागायतीसाठी १५ हजार रुपये प्रतिहेक्टर, बहुवार्षिक पिकांसाठी २५ हजार रुपये प्रतिहेक्टर. ही मदत २ हेक्टर मर्यादेत करण्यात येईल.

पदोन्नतीमधील आरक्षण

पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयात असलेल्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ मध्ये शासनाची बाजू मांडण्यासंदर्भात राज्य मंत्रिमंडळात चर्चा झाली. या वेळी पदोन्नतीमधील आरक्षण कायम ठेवण्याबाबत सर्वोच्च न्यायालयातील या याचिकेत अतिरिक्त शपथपत्र दाखल करण्याचा निर्णय झाला. मागासवर्गीयांची पदोन्नती व सरळ सेवेतील प्रतिनिधित्वाची माहिती संकलित करून त्यांचे शासन सेवेतील आरक्षण निश्चित करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालावर देखील चर्चा करण्यात आली.

प्रतिबंधात्मक कृती योजना राबवणार

मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृती योजना ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यात राबवण्यास मान्यता देण्यात आली. मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक

राष्ट्रीय कृती योजना ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना आहे. ही योजना २०२३ पर्यंत राबवण्यात येणार आहे. योजनेच्या १३ कोटी ७० लाख रुपये खर्चासही मंजुरी देण्यात आली.

मादक पदार्थांचा गैरवापर, त्यांचे सेवन या समस्या वाढू लागल्या आहेत. या समस्येच्या मुख्य कारणांमध्ये मुख्यत: मानसिक तणाव, जीवनशैलीतील बदल, सामाजिक व आर्थिक विवंचना आदी कारणे आहेत. त्यासाठी योजना तयार करून त्यास प्रतिबंध घालणे ही काळाची गरज आहे. नागरिकांचे आरोग्य, पोषण आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी तसेच मद्यपान, आणि अमली पदार्थांचे सेवन टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्या लागणार आहेत. त्यादृष्टीने सामाजिक न्याय विभागामार्फत ही कृती योजना राज्यात राबवली जाणार आहे.

सहकारी संस्था : अधिनियमात सुधारणा

कोविडमुळे निवडणुका पुढे ढकलण्यात आल्यामुळे नियमित सदस्यांना संरक्षण देण्यासंदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ मधील पोट कलम (३) मध्ये सुधारणा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

सहकारी संस्थांच्या निवडणूका कोविड-१९ साथीच्या आजारामुळे पुढे ढकलण्यात आल्यामुळे बऱ्याचशा सहकारी संस्थांची समितीच्या सदस्यांना नियमित असल्याचे सरंक्षण देण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ मधील पोट कलम (३) मध्ये परंतुक, समाविष्ट करण्यासंदर्भात १० जुलै, २०२० रोजी अध्यादेश प्रख्यापित करण्यात आला होता.

तथापि, २४ मार्च २०२० ते ९ जुलै २०२० या कालावधीसाठी शासनाने ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूका पूढे ढकलण्यात आल्या. त्या संस्थांच्या समिती सदस्यांना नियमित सदस्य असल्याचे संरक्षण देण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ चे पोट-कलम (३) च्या विद्यमान परंतुकाऐवजी खालील परंतुकदाखल करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. परंतु जर २४ मार्च २०२० पासून, संस्थेच्या समितीची निवडणूक, संस्थेच्या समितींच्या सदस्यांना जबाबदार धरता येणार नाही अशा कोणत्याही कारणासाठी घेतली जाऊ शकत नसेल तर, समितीचे विद्यमान सदस्य, नवीन समिती यथोचितरीत्या गठित होईपर्यंत नियमितपणे सदस्य असल्याचे मानण्यात येईल.

अध्यापकांना सेवानिवृत्तीचे लाभ

राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील बिगर नेट तसेच सेट अध्यापकांना निवृत्तिवेतनाचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला. जे अध्यापक २३ ऑक्टोबर

१९९२ ते ३ एप्रिल २००० या कालावधीत नियुक्त होते अशांना हे निवृत्तिवेतन देण्यात येईल. शासन निर्णय १८ ऑक्टोबर २००१ व २७ जून २०१३ नुसार उपरोक्त कालावधीतील बिगर नेट सेट अध्यापकांच्या सेवा सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरू ठेवण्यात आल्या असल्याने त्यांच्या मूळ नियुक्तीचा दिनांक गृहीत धरून सेवानिवृत्ती वेतन देण्यात येईल.

कलाकार व संस्थांना अर्थसाहाय्य

कोरोनामुळे सांस्कृतिक आणि कला क्षेत्रातील विविध कलाकारांची आर्थिक कुचंबणा झाली असून त्यांना आर्थिक साहाय्य करण्याचा निर्णय घेण्यात आला.

देशात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झाल्याने राज्यासह संपूर्ण देशात लॉकडाऊन लागू होता, तसेच लॉकडाऊन शिथिल करण्यात आल्यानंतरही सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन, नाट्यगृहे, चित्रपटगृहे यांच्यावर बंदी असल्याने, व प्रयोगात्मक कला क्षेत्रातील संघटित व असंघटित विविध कला प्रकारातील कलाकार, ज्यांचे उपजीविकेचे साधन केवळ सांस्कृतिक कार्यक्रम व कला सादर करणे असे आहे, त्यांची आर्थिक कुचंबणा झाल्याची बाब लक्षात घेता, त्यांना आर्थिक साह्य देण्याची मागणी शासनाच्या विचाराधीन होती. ही मागणी विचारात घेऊन राज्यातील अशा प्रयोगात्मक कलांवर उदरनिर्वाह असलेल्या एकल कलावंतांना व प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रातील संस्थांना आर्थिक साहाय्य देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

शेत-पाणंद रस्ते योजना

राज्यातील गावा-गावात शेत रस्ते, पाणंद रस्ते तयार करण्यासाठी 'मातोश्री ग्रामसमृद्धी शेत-पाणंद रस्ते योजना' राबवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. राज्यातील शेतकरी आणि गावकरी समृद्ध व्हावेत, या दृष्टिकोनातून 'मी समृद्ध, तर गाव समृद्ध' आणि 'गाव समृद्ध, तर माझा महाराष्ट्र समृद्ध' ही संकल्पना मनरेगा व राज्य रोहयोच्या माध्यमातून राबवण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत राज्यात पालकमंत्री शेत, पाणंद रस्ते योजना राबवण्यात येत आहे. ही योजना राबवताना येणाऱ्या अडचणी दूर करून या योजनेतील कामांसाठी मनरेगामधून आवश्यक असा निधी उपलब्ध व्हावा, यासाठी मनरेगा आणि राज्याची रोहयो यांचे एकत्रीकरण करण्यात येणार आहे. यातून मनरेगामध्ये होणाऱ्या विविध कामांमधील अकुशल व कुशलच्या संयोजनातून शेत-पाणंद रस्ते बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच या योजनेचे नामकरण 'मातोश्री ग्राम समृद्धी शेत, पाणंद रस्ते योजना' असे करण्यात आले आहे.

निर्वाचित सदस्यांच्या संख्येत वाढ

राज्यातील झपाट्याने वाढलेली लोकसंख्या तसेच नागरी विकास योजनांचा वेग वाढवण्याची गरज लक्षात घेऊन महानगरपालिका व नगरपरिषदांमधील निर्वाचित सदस्यांच्या संख्येमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सध्या महानगरपालिकांतील सदस्य संख्या किमान ६५ सदस्य व कमाल १७५ इतकी आहे, तर नगरपरिषदांमधील सदस्य संख्या किमान १७ सदस्य व कमाल ६५ इतकी आहे. महानगरांमधील व लहान नागरी क्षेत्रांमध्ये झालेले रचनात्मक परिवर्तन व नागरी समस्यांची उकल व विकास योजनांचा वेग वाढवणे, यासाठी सर्व कार्यक्षेत्राला योग्य न्याय देण्याच्या दृष्टीने सदस्य संख्या वाढवण्याची आवश्यकता आहे.

२०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारावर महानगरपालिका व नगरपरिषदांमधील सदस्य संख्या निर्धारित आहे. कोविड-१९ च्या प्रार्दुभावामुळे २०२१ च्या जनगणनेचे निष्कर्ष अप्राप्त आहेत. त्यास आणखी काही कालावधी लागणार आहे. या कालावधीत लोकसंख्या वाढीचा सरासरी वेग गृहीत धरून अधिनियमात नमुद केलेल्या महानगरपालिका व नगरपरिषदांच्या किमान सदस्य संख्येत १७ टक्के इतकी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. किमान सदस्य संख्या वाढवल्यामुळे पुढील सदस्य संख्यादेखील वाढेल व त्यामुळे पर्याप्त सदस्य संख्या निश्चित होईल.

- महानगरपालिकांमध्ये ३ लाखांपेक्षा अधिक व ६ लाखांपर्यंत लोकसंख्येसाठी निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या ७६ व अधिकतम संख्या ९६ पेक्षा अधिक नसेल.
- ६ लाखांपेक्षा अधिक व १२ लाखांपर्यंत लोकसंख्येसाठी निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या ९६ व अधिकतम संख्या १२६ पेक्षा अधिक नसेल.
- १२ लाखांपेक्षा अधिक व १४ लाखापर्यंत लोकसंख्येसाठी निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या १२६ व अधिकतम संख्या १५६ पेक्षा अधिक नसेल.
- २४ लाखांपेक्षा अधिक व ३० लाखापर्यंत लोकसंख्येसाठी निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या १५६ व अधिकतम संख्या १६८ पेक्षा अधिक नसेल.
- ३० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्येसाठी निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या १६८ व अधिकतम संख्या १८५ पेक्षा अधिक नसेल.
- 'अ' वर्ग नगरपरिषदांमध्ये निवडून आलेल्या परिषद सदस्यांची किमान संख्या ४० व अधिक संख्या ७५ हून अधिक नसेल.
- 'ब' वर्ग नगरपरिषदांमध्ये निवडून आलेल्या परिषद सदस्यांची किमान संख्या २५ व अधिक संख्या ३७ हून अधिक नसेल.
- 'क' वर्ग नगरपरिषदांमध्ये निवडून आलेल्या परिषद सदस्यांची किमान संख्या २० व अधिक संख्या २५ हून अधिक नसेल.

सुधारित प्रशासकीय मान्यता

सांगली जिल्ह्यातील वाकुर्डे (ता. शिराळा) येथील उपसा सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला.

वाकुर्डे उपसा सिंचन योजना या प्रकल्पाचा ९०८ कोटी ४४ लाख रुपये किंमतीचा दुसरा सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात आला. या योजनेमुळे सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील ७ हजार २७० हेक्टर, वाळवा तालुक्यातील १८ हजार ५६५ हेक्टर आणि सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील २ हजार २०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. यामुळे ११० गावांतील सिंचनापासून वंचित अशा क्षेत्राला पाणी मिळण्याने २८ हजार ०३५ हेक्टर क्षेत्राला फायदा होणार आहे.

भांडवली मूल्य सुधारित न करण्याचा निर्णय

बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोणत्याही इमारतीचे भांडवली मूल्य कोविड परिस्थितीमुळे सुधारित न करण्याचा निर्णय घेण्यात आला. कोरोना विषाणुमुळे उद्‌भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या विविध अडचणींमुळे भांडवली मूल्य सुधारित करण्यास २०२१-२२ करिता सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही सवलत दिल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेचा अंदाजे १०४२ कोटी रुपये इतका महसूल तोटा होणार आहे.

सैनिकी शाळेस वाढीव अनुदान

जालना येथे मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या पार्थ सैनिकी शाळेस वाढीव २० टक्के अनुदान मंजूर करण्याचा निर्णय आला. पार्थ सैनिकी शाळेची इयत्ता सहावी ते दहावीची प्रत्येकी एक तुकडी याप्रमाणे एकूण अतिरिक्त पाच तुकड्यांवरील १० शिक्षकपदांना २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासून वाढीव २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आले.

मंत्रिमंडळातील निर्णयांच्या अधिक माहितीसाठी www.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

टीम लोकराज्य

श्री. उद्धव ठाकरे
मा. मुख्यमंत्री

महाराष्ट्र शासन

माझे विद्यार्थी
माझी जबाबदारी

शिक्षणाची नवी सुरुवात करू या, उज्ज्वल भविष्य घडवू या.

अभियानाची प्रमुख वैशिष्ट्ये

- कोरोनाच्या आव्हानात्मक परिस्थितीमध्येही विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू राहावे यासाठी अभियान.
- विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण अध्ययन ही शिक्षक आणि शिक्षण विभागातील प्रत्येक घटकाची जबाबदारी.
- सातत्यपूर्ण अध्ययन आराखड्याद्वारे अभियानाची अंमलबजावणी.
- पालक, समाज, शिक्षक व पर्यवेक्षीय यंत्रणा यांची महत्त्वाची भूमिका.
- सातत्यपूर्ण अध्ययनासाठी शालेय स्तरावर शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन.
- सरल प्रणालीद्वारे सातत्यपूर्ण अध्ययनाचे माहिती संकलन.

शिक्षक व मुख्याध्यापक यांची जबाबदारी

- उपलब्ध असणाऱ्या डिजीटल उपकरणांच्या आधारे ऑनलाईन व ऑफलाईन अध्ययनाचे नियोजन करणे.
- स्वयं-अध्ययनाचे विविध स्रोत उपलब्ध करून देणे.
- नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे आनंददायी अध्ययन सुरू ठेवणे.
- मूल्यमापन व उपचारात्मक अध्यापन करणे.
- शैक्षणिक मार्गदर्शन व समुपदेशन करणे.

पालक व समाज यांची जबाबदारी

- पाल्यास शिक्षणासाठी आवश्यक सहाय्य करणे.
- समाजातील तज्ज्ञ व्यक्ती, स्वयंसेवक यांनी गरजेनुसार शाळा, विद्यार्थी व शिक्षक यांना सहाय्य करणे.
- मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी मदत करणे.

पर्यवेक्षीय यंत्रणेतील घटकांची जबाबदारी

- अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शाळा, शिक्षक, मुख्याध्यापकांना शैक्षणिक सहाय्य व मार्गदर्शन करणे.
- अभियानाचे संनियंत्रण, प्रसिद्धी व वेळोवेळी अंमलबजावणीबाबत पाठपुरावा करणे.

सातत्यपूर्ण अध्ययनासाठी शैक्षणिक उपक्रम

- स्वाध्याय • शैक्षणिक दिनदर्शिका • मैत्री करूया विज्ञान गणिताशी • सेतू अभ्यासक्रम • अभ्यासमाला • दूरदर्शनवरील ज्ञानगंगा शैक्षणिक कार्यक्रम • शिकू आनंदे • दीक्षा ॲप
- गुगल क्लासरूम ऑनलाईन प्रशिक्षण • निपुण भारत अभियान
- गोष्टींचा शनिवार • शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण • विषयनिहाय प्रश्नपेढी • ऑनलाईन करिअर मार्गदर्शन व महाकरिअर पोर्टल
- पूरक अध्ययन साहित्य

राज्यातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शालेय शिक्षण विभाग कटिबद्ध.

महाराष्ट्र शिकतोय... महाराष्ट्र घडतोय!

श्री. अजितदादा पवार
मा. उप मुख्यमंत्री

श्री. बाळासाहेब थोरात
मा. मंत्री, महसूल

प्रा. वर्षा गायकवाड
मा. मंत्री, शालेय शिक्षण

श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू
मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

If undelivered, please return to:

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंट प्लस प्रा.लि., ई-१, जय जलाराम इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१ ३११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: डॉ. दिलीप पांढरपट्टे